Orien
Mar

THE

CHILD'S BOOK

ON

REPENTANCE.

पश्चात्तापाविषयीं लेंकराची

पोथी.

मुंबईमध्यें आमेरिकान मिशन छापखान्यांत छापिलें.

सन १८४८.

BOMBAY:

AMERICAN MISSION PRESS

T. Graham, Printer.

1848.

अनुक्रमणिका.

पश्चात्तापाविषयीं लेंकराची पोथी.

THE CHILD'S BOOK ON REPENTANCE.

संभाषण १.

हें पुस्तक मायलेंकरांच्या संवादरूपें कां लिहिलें असें जर कोणी विचारील, तर त्यानें समजावें कीं वाचणाऱ्याला आनंद व्हावा आणि याची समज सुलभरीतीनें पडावी ह्मणून असें केलें.

कोणीएक धार्मिक स्त्री होती; ती आपल्या लेंकरांसाठीं स्वतां आणि त्यांबरोबरहि देवाची प्रार्थना करीत असे. आणि आपल्या लेंकरानी येशू ख्रीस्ताचे शिष्य व सुभक्त व्हावें, असी तिची फार इच्छा होती. ती एका आदितवाराच्या संध्याकाळीं लेंकरांबरोबर बसली होती, तेव्हां पुढें लिहिलेलें संभाषण झालें. त्या स्त्रीचें नांव ताई, व जो बारा वर्षांचा वडील मुलगा त्याचें नांव महादू, व जी नऊ वर्षांची कन्या तिचें नांव चिमणी, व जो धाकटा साहा वर्षांचा त्याचें नांव नाना. मुलानी आपल्याबरोबर मोकळ्या मनानें संभाषण करावें ह्मणून ती त्यांजवर फार प्रीति करीत असे. आणि मुलेंहि आई आह्मावर फार प्रीति करिती व आह्मी उपयोगी विद्या शिकावी ह्मणून इच्छिती असें समजून तिजसीं बोलत असत.

नाना जो धाकटा तो भाषण करूं लागला. अगे आई, पश्चात्ताप करणें ह्मणजे काय आहे हें मला बरोबर समजत नाहीं, तर तूं आतां सांग बरें.

आई.—सांगत्यें, माझ्या मुला, जरी तुह्मा सर्वांस याविषयीं म्या बहुत सांगितलें आहे तरीं तुह्मास ही गोष्ट चांगली स्पष्ट समजावी ह्मणून म्या अणखी वेळ लावून प्रयत्न करावा असा माझ्या मनांत कांहीं वेळापासून विचार वागला आहे.

AMERICAN MISSION PRESS. — BOMBAY, 1848.

चिमणी.—आई, पश्चात्ताप करणें याचा अर्थ मला ठाऊक आहे; पापामुळें जो खेद तो.

महादू.—अगे बहिणी, हा अर्थ तर आह्मा सर्वांस ठाऊक आहे. पण याविषयीं नानाने आईला विचारिलें हें मला बरें वाटतें, कारण कीं याचा अर्थ मला पुरता समजला नसेल असें वेळोवेळ माझ्या मनांत येतें.

आ०—अहो माझ्या लेंकरानो, याचा सगळा अर्थ समजणें व अनुभव घेणें ही कांहीं हलकी गोष्ट नव्हे, आणि जे ज्ञातारे व सुभक्त आहेत ते देखील तुह्माला असेंच सांगतील. खरा पश्चात्ताप ह्मणजे काय याचा समज होण्यास व अनुभव घेण्यास आह्माला पवित्र आत्म्याची गरज आहे. आणि त्याचा अर्थ काय आहे, हें तुह्मास दाखविण्यास मी प्रयत्न करीत असतां ईश्वराने तुह्माला पवित्र आत्मा द्यावा, यासाठीं कीं पश्चात्ताप याचा अनुभव तुमच्या मनांत होऊन तुह्मी त्याचा खरा अर्थ समजावा, ह्मणून मी ख्रीस्ताकडून परात्पर देवाची प्रार्थना करित्यें. अगे चिमणे, "पश्चात्ताप ह्मणजे पापामुळें जो खेद तो," असें तूं ठीकच बोललीस, पण खेदाचे निरनिराळे प्रकार आहेत, हें तुह्मा सर्वांस ठाऊक आहे. आणि आपल्या पापांचा योग्य प्रकारचा खेद असावा, नाहीं तर आह्मी पापाचा पश्चात्ताप केला असें ह्मणतां येत नाहीं.

चि०—अगे आई, गेल्या शनिवारीं पाऊस पडला त्यामुळें आपण नेमाप्रमाणें फिरावयास गेलों नाहीं ह्मणून मला खेद वाटला, त्याची तुला आठवण आहे कीं नाहीं?

ना०—आणि मला काकाने जो चेंडू दिल्हा तो म्या गमावला त्या वेळेस मला किती खेद झाला.

आ०—खेदाचे किती प्रकार आहेत व ते कसे आहेत याचा विचार थोडसा आपण करूं. चिमणे, गेल्या शनवारीं आपणाला फिरावयास जाण्याचा अडथळा झाला, यांत कोणाचा दोष होता कीं काय?

चि०—कोणाचाहि नाहीं. देवाने पाऊस पाडिला, आणि आह्मी कुठं

नये व कुरकूर करूं नये, कारण कीं परमेश्वर आपल्या इच्छेप्रमाणेंच हवा बदलितो. आणि जें तो करितो तें योग्य आणि चांगलें आहे, असें तूं आह्मास त्या वेळेस सांगितलेस, याची मला आठवण आहे.

आ०—तर आह्मी किंवा कोणी दुसऱ्यानें वाईट केलें नसतां आमच्या इच्छेविरुद्ध कधीं कधीं गोष्ट घडती, त्यामुळें एक प्रकारचा खेद होतो.

म०—एका दिवसीं नाना खेळतां खेळतां पडला आणि त्याला फार लागलें; त्या वेळेस या प्रकारचा खेद मला झाला. त्वां त्याला खेळावयास मोकळीक दिल्हीस आणि तो कांहीं वाईट करीत नव्हता, पण त्याला दुखापत झाली; ती पाहून मला फार खेद वाटला. जर त्याला दुःख झालें नसतें तर माझ्या मनाजोगें होतें.

आ०—या प्रकारच्या खेदाचें दुसरें उदाहरण तुह्मांतील कोण सांगेल?

ना०—मी पडलों त्या वेळेस मलाहि खेद झाला, आणि तें आतांहि मनांत आणिलें असतां कांहींसा खेद होतो. अगोदर असी दुखापत मला कधींहि झाली नव्हती, असें वाटतें.

आ०—जर म्या तुला खेळावयाला मना केलें असतें तर मग तुला कसें वाटलें असतें?

ना०—तर मग पडल्यावर घरीं येत असतां म्या आपल्या आईच्या आज्ञा मोडिल्या असें मनांत आणून मला त्यामुळें खेद झाला असता, असें वाटतें.

आ०—त्यावरून तुला खेद कां झाला असता?

ना०—तूं मला शिक्षा करसील असें भय धरिलें असतें ह्मणून.

आ०—तर हा दुसऱ्या प्रकारचा खेद आहे. आह्मी वाईट केल्यामुळें आह्मास दुःख झालें किंवा होईल असें भय वाटतें, तेव्हां जो आह्माला खेद होतो तो हा दुसऱ्या प्रकारचा खेद जाणावा.

म०—आई, मी स्वतां कांहीं वाईट केलें नसतां या लेंकराला वाईट कर-

तांना पाहून, आणि यामुळें तुला राग येईल, असें समजून मला कधीं कधीं खेद होतो, असें वाटतें.

चि०—खरें, आणि त्याविषयीं तूं आह्माला आईसारिखें धमकावीत असतोस.

आ०—अगे माझ्या मुली, तूं आपल्या भावाला सुध्या रीतीचें बोलती नाहींस; तुमच्याहून तो वडील आहे. मी जवळ नाहीं तेव्हां तुह्मी खोडी करीत असतां त्यानें तुह्माला धमकावावें हें बरें आहे, पण त्यानें प्रीतीनें धमकावावें. माझ्या लेंकरांतील कोणीएकाला आपला भाऊ किंवा बहीण खोडी करितां पाहून खेद व्हावा हें मला बरें वाटतें. दुसऱ्या कोणाला वाईट करितां पाहतों त्या वेळेस आह्माला खेद व्हावा, आणि त्यानें असें करूं नये ह्मणून शिकवावें हें योग्य आहे. हा दुसऱ्या प्रकारचा खेद, असें समजा. अणखी जें काम आह्मी करावें तें केलें नसतां आह्माला कधीं कधीं खेद होतो कीं नाहीं?

चि०—होय, आई; गेल्या आठवड्यांत तूं मला असें सांगितलेंस कीं, "निवळ बसून तूं आपला शाब्बाथ दिवसाचा धडा पाठ कर," पण मी तसें न करून तुझी आज्ञा मोडिली. मग तूं घरीं येण्यापूर्वी मला त्याविषयीं खेद वाटूं लागला, पण धडा पाठ करण्यास वेळ राहिली नव्हती.

ना०—आई, जेव्हां महादू दुखणाईत पडला होता आणि मी तुझें न ऐकून गडबड करितांना राहोना त्या दिवसीं मलाहि खेद झाला, कां कीं माझी लाहान गाडी मजपासून घेतलीस आणि तीन दिवसपर्यंत परत दिल्ही नाहींस, ह्मणून मला फार खेद वाटला.

आ०—अगे चिमणे, जेव्हां त्वां माझी आज्ञा मोडून शाब्बाथ दिवसाचा धडा पाठ केला नाहीं त्या वेळेस तुला खेद कां वाटला?

चि०—तुला ठाऊकच आहे, आई. तूं मला सांगितलें होतेंस कीं, "जर तूं धडा पाठ करणार नाहींस तर उद्यां तुला माझ्याबरोबर

फिरायाला नेणार नाहीं." पण मी खेळण्यामुळें तुझ्याबरोबर फिरायाला जाण्याची आशा सोडिली, इतकें माझें मूर्खपण.

आ०—तर हा एक दुसऱ्या प्रकारचा खेद ह्मणावा. जें करायाचें तें न केल्यामुळें जें दुःख झालें किंवा होईल ह्मणून भय वाटतें यामुळें जो खेद तो हाच आहे.

म०—दुसऱ्या कोणीएकाने जें न करायाचें तें केलें हें पाहून जसा आह्माला खेद होतो तसाच दुसऱ्याने जें करायाचें तें केलें नाहीं हें पाहून आह्मास खेद होतो, असें वाटतें.

आ०—खरें, मुला; आणि हा अणखी एका प्रकारचा खेद आहे, असें समजा, दुसऱ्यानी चांगल्या रीतीनें चालावें ह्मणून आह्मी त्यांस समजून सांगावें असा आमचा धर्म आहे, हें ध्यानांत ठेवा.

चि०—अगे आई, ज्या प्रकारच्या खेदांविषयीं आह्मी आतां बोललों, त्यांत पश्चात्तापाचा खेद एक आहे कीं काय?

आ०—त्यांतील कित्येक प्रकार खरा पश्चात्ताप नाहींत, हें उघडें आहे. पाहा, जो कोणी पश्चात्ताप करितो तो आपल्याच पापाचा करितो; त्याच्याने दुसऱ्याच्या पापाचा पश्चात्ताप करवत नाहीं. दुसऱ्याचें विपरीत आचरण पाहून खेद होईल, परंतु हा पश्चात्ताप ह्मणावयास योग्य नाहीं. तुह्मीच स्वतां वाईट केलें असतां ज्याचा त्याने आपल्या पापाचा पश्चात्ताप करावा, असी तुह्माला देवाची आज्ञा आहे. जर कांहीं गोष्ट करण्याने किंवा न करण्याने आह्माला दोष लागत नाहीं, तर तिचा पश्चात्ताप करितों असें ह्मणतां येत नाहीं. आह्माला त्याविषयीं कदाचित् खेद वाटेल, पण त्याला पश्चात्ताप ह्मणूं नये. काल महादू दार उघडीत असतां त्याची कडी नानाच्या डोक्यास लागली तेव्हां तो रडूं लागला, याचें स्मरण आहे कीं नाहीं? पण यांत महादूकडे कांहीं दोष नव्हता. नाना इतका जवळ आहे असें त्याच्या मनांत नव्हतें. जें झालें त्यामुळें महादूला फार खेद वाटला परंतु त्याने त्याविषयीं पश्चात्ताप केला, असें ह्मणण्यास योग्य नाहीं. तसें रात्रीं नानाच्या

जिवाला बरें वाटत नव्हतें हें सकाळपर्यंत मला माहीत नव्हतें. अगोदर कळलें असतें तर मी उठून त्याना संभाळ करावयास गेलें असतें. त्या वेळेस कळलें नाहीं, आणि मी त्याच्या समाचारास गेलें नाहीं ह्मणून मला खेद वाटतो, पण मी त्याविषयीं पश्चात्ताप करितें असें नाहीं, कारण कीं मजकडे कांहींच दोष नव्हता. नाना रोगी झाला हें ठाऊकच नव्हतें.

परंतु आतां या गोष्टीचा विचार पुरे; उद्यां अणखी करूं. अरे महादू, संध्याकाळच्या प्रार्थनेची वेळ झाली, ह्मणून धर्म शास्त्र घेऊन ये, आणि साळूला हाक मार.

संभाषण २.

दुसऱ्या दिवसीं संध्याकाळीं ताई आपल्या लेंकरांबरोबर फिरून बसून पश्चात्तापाविषयीं संभाषण करूं लागली. तिला या गोष्टीविषयीं जें सांगावयाचें होतें तें सर्व समाप्त होई तोंपर्यंत बहुतकरून दर संध्याकाळीं संभाषण करीत बसत, असें समजा.

आ०—प्रिय मुलानो, खऱ्या पश्चात्तापाविषयीं विचार करितांना ज्या गोष्टी मी तुह्मास सांगेन त्या चित्त देऊन ऐका. ही गोष्ट ऐकतांना कथेसारिखी मौज वाटणार नाहीं, परंतु कथेपेक्षां इजपासून फार हित आहे. कां, ह्मणाल; तर आपल्या पापाविषयीं मनांत खऱ्या पश्चात्तापाचा अनुभव घेतल्यावांचून व त्याप्रमाणें आचरण केल्यावांचून तुह्मी आकाश लोकांत कधींहि जाणार नाहीं.

ना०—आई, आकाशांत जे दूत आहेत त्यानी कधीं पश्चात्ताप केला कीं काय?

आ०—नाना, त्यानी कशाकरितां पश्चात्ताप करावा? कोणी तरी केवळ आपल्याच पापाचा पश्चात्ताप करितो, हें काल संध्याकाळीं सांगितलें, त्याचें तुला स्मरण नाहीं कीं काय? आकाशांतील दूतानी कधीं पाप केलें नाहीं, ह्मणून त्यांच्याने पश्चात्ताप करवत नाहीं. पश्चात्ताप केवळ पापाविषयीं आहे आणि तो आमच्याच पापाविषयीं आह्माला कर-

वतो. देवाच्या आज्ञांप्रमाणें आह्मी पवित्र नाहीं, जें न करावयाचें तें केलें आणि जें करावयाचें तें केलें नाहीं, याविषयींच पश्चात्ताप करितां येतो. तर आपल्या पापाविषयीं जो मनापासून खेद होतो तोच खरा पश्चात्ताप आहे.

चि०—अगे आई, पाप ह्मणजे काय?

आ०—याविषयीं आतां विचार करूं, ह्मणजे खरा पश्चात्ताप काय आहे हें समजेल. माझें घड्याळ पाहा, आज एक घटकेचें अंतर अधिक पडलें; काल एका घटकेनें कमी होतें, असें आठ दिवसांपासून बरोबर चालत नाहीं. याला काय झालें हें माझ्यानें सांगवत नाहीं.

ना०—महादूच्या हातीं सोनाराकडे पाठवावें, असें मला वाटतें, आई.

आ०—घड्याळ बिघडलें ह्मणून जर मी त्याचा निषेध करून, "अरे घड्याळा, त्वां चांगलें चालावें हा तुझा धर्म आहे," असें मी त्याला समजून सांगितलें, तर मग?

ना०—आई, घड्याळ्यास असें बोलून काय उपयोग? बरें वाईट हें त्याला काय कळतें?

आ०—खरें, मुला; त्यास विचार व अनुभव नाहीं, कां कीं त्यास जीवच नाहीं. बरें व वाईट काय आहे हें त्यास समजावितां येत नाहीं.

म०—कुत्रें कधीं मधीं विचार करितें व त्याला सुख दुःखाचा अनुभव आहे, असें तर आह्मास खचीत वाटतें. तें बरें वाईट जाणतें बरें? आणि त्यानें वाईट केलें असतां त्याविषयीं त्याला पश्चात्ताप होईल काय?

आ०—पश्चात्ताप होईल असें वाटत नाहीं, पण काय करावें व काय करूं नये, आणि वाईट केलें असतां शिक्षा मिळेल, हें त्यास समजावतां येतें. घरच्या मांजरावर कुत्रें धांवून गेलें असतां त्याला कांहीं वेळां छडीनें मारिलें तर तें पुढें असें करणार नाहीं. मारिलें तर त्याला दुःख होतें, आणि मारण्याचा धाक पडल्यावरून पुन्हा त्याला त्रास देत नाहीं. परंतु त्यानें जें केलें त्याचें स्मरण करून त्याला खेद

होतो, असें कांहीं नाहीं. त्या जें केलें तें वाईट होतें आणि मी अपराधी आणि दंडास योग्य आहें, असा त्याला समज नाहीं. सर्व जनावरांची गोष्ट असीच. बरें काय व वाईट काय हें त्यांच्यानें जाणवत नाहीं. याविषयीं मनुष्यें व जनावरें यांचा मोठा भेद आहे. जनावरांस देवाविषयीं व धर्मशास्त्राविषयीं थोडें देखील शिकविण्यास किती जरी उपाय केले तरी ते व्यर्थच जातील. देव व धर्म व आकाश लोक व नरक यांविषयीं तीं कांहींच समजत नाहींत, ह्मणून त्यांस पाप लागत नाहीं. आणि त्यांच्यानें पश्चात्तापहि करवत नाहीं.

म०—बरें वाईट जाणण्यामुळें आमचा व जनावरांचा केवढा मोठा भेद आहे, हें माझ्या ध्यानांत जसें आतां आलें तसें अगोदर कधींहि आलें नव्हतें.

चि०—अगे आई, कधीं कधीं फार वाईट माणसांला असें वाटत असेल कीं आपण जनावर झालों असतों तर बरें.

आ०—माझ्या मुली, असें कशावरून तुला वाटतें?

चि०—वाईट करण्यामुळें जो खेद त्याचें इतकें दुःख होतें कीं, ज्यानी फार मोठें दुष्कर्म केलें त्यांस असें वाटत असेल कीं आपण जनावर झालों असतों तर बरें, मग आपणाला पापाचा समज झाला नसता.

आ०—खरें मुली, फार दुष्ट माणसाला असी इच्छा एखाद्या वेळेस झाली आहे, परंतु काय उपयोग? जे पाप करितात त्यांस आपल्या पापाचा विचार येईलच येईल. पापाचा विसर पडावा ह्मणून इहलोकीं कदाचित् उपाय होईल, परंतु परलोकीं होणार नाहीं. आपल्या पापाचा पश्चाताप न करून व येशू ख्रीस्तावर विश्वास न ठेवून जे मरतात ते परलोकीं आपल्या सर्व पापांची आणि आपलें मूर्खपण व दोष यांची आठवण करितील, ते त्यांची आठवण निरंतर करितील. ते त्यांविषयीं फार दुःख पावून आठवण करितील. आपल्या मागल्या आचरणाविषयीं विचार करून त्यांस लाज व तिरस्कार वाटेल, आणि पुढें आपली अवस्था कसी होईल व काय दुःख

प्राप्त होईल, हें पाहून ते अतिशय निराश होतील. माझ्या मुलांनो, या गोष्टीचा तुह्मी विचार करा. आणि पाप काय आहे, याचा जसा जसा आह्मी विचार करीत जातों तसा तसी आठवण करा कीं, आपण पापी आहों, आणि आपल्या पापाचा विसर होणार नाहीं, आणि जर इहलोकीं विसर पडावा ह्मणून आपण यत्न करून त्याचा पश्चात्ताप करीत नाहीं तर मरणानंतर त्याची आठवण होऊन अतिशय दुःख आह्माला प्राप्त होईल. तें दुःख किती भयंकर होईल हें तुमच्याने आतां ध्यानांत आणवत नाहीं. बरें वाईट जाणण्यामुळें आमचा व जनावरांचा मोठा भेद आहे, हें महादूनें खरेंच सांगितलें. पापामुळें निरंतर दुःख व यातना ह्या ज्याला लागतात असा जीवात्मा आपल्याला आहे; त्यामुळेंहि त्यांचें व आपलें अंतर फार आहे. शरीराचें दुःख जनावरांस व आह्मासहि सोसितां येईल. परंतु पापाचा पश्चात्ताप न करून व क्षमा न पावून जर आत्मा परलोकीं जातो तर त्याला तेथें ज्या यातना होतील त्यांपुढें शरीराच्या यातना कांहींच नाहींत. ज्यानें जनावरांचें व तुमचें मोठें अंतर केलें तो परमेश्वर आहे. जो बरें वाईट समजतो आणि बरें वाईट केलें तर त्याच्या सुख दुःखाचा अनुभव ज्याला होतो असा जीवात्मा देवानें तुह्माला दिल्हा आहे. मनाच्या साक्षीवरून बरें वाईट समजावें, आणि बरें केल्यावरून सुख व्हावें आणि वाईट केल्यावरून दुःख व्हावें असें ईश्वरानें मनुष्याचें मन केलें आहे.

अगे चिमणे, जेव्हां तूं माझें न ऐकून आपला शाब्बाथ दिवसाचा धडा पाठ केला नाहींस तेव्हां असें करण्याचें तुला अगत्य होतें कीं काय? माझें ऐकून शांत बसून आपला धडा शिकण्याची तुला शक्ति नव्हती कीं काय?

चि०—होय, आई; असें करण्याची इच्छा असती तर शक्ति होती, असें वाटतें.

आ०—तर त्वां आपल्या खुषीप्रमाणें ह्मणजे आपल्या मुखत्यारीनें केलें आहे, ह्मणून तूं आपल्या करण्याविषयीं स्वतंत्र आहेस.

ना०—आई, मीहि स्वतंत्र आहें काय?

आ०—बरें आपण पाहूं जा, तें पुस्तक घेऊन ये. (नाना पुस्तक घेऊन आईकडे आला.) जसें म्या सांगितलें तसें त्वां केलें, माझी आज्ञा मानिलीस, तूं चांगला आहेस. माझी आज्ञा मोडावयाला तुला शक्ति होती कीं काय?

ना०—होती, असें वाटतें. म्या कधीं कधीं तुझी आज्ञा मोडिली, आणि आतांहि मोडण्याची इच्छा असती तर तसें करण्याची शक्ति आहे.

आ०—नाना, जर मी तुला सांगेन कीं अभ्रापर्यंत उडून जा, तर उडतां येईल काय?

ना०—नाहीं, कारण कीं मला पंखच नाहींत.

आ०—असें केलें नसतें तर तूं आपला अन्याय पदरीं घेतला असता काय?

ना०—नसता.

आ०—तूं दारापर्यंत चालत जा, असें जर म्या तुला सांगितलें, आणि तूं गेला नाहींस, तर तूं दोष पदरीं घेतला असता काय?

ना०—होय, खचीत घेतला असता. इच्छा असली तर चालतां येतें, पण किती जरी इच्छा झाली तरी उडतां येत नाहीं.

आ०—तर मुला, कांहीं प्रकारच्या करण्यांत तुला मुखत्यारी आहे, आणि कांहीं प्रकारच्या करण्यांत मुखत्यारी नाहीं, असें समजावें. या गोष्टीविषयीं उद्यां आपण अणखी कांहीं बोलूं.

संभाषण ३.

आ०—बरें, माझ्या लेंकरानो, तुह्मी सर्व करण्याविषयीं स्वतंत्र आहां, असें मला दिसूं येतें; कारण कीं, "साहा वाजतां एथें माझ्याजवळ या, उशीर करूं नका," असें म्या तुह्माला आज सकाळीं सांगितलें

होतें, आणि तुह्मी त्याप्रमाणेंच सर्व आलांत, तुह्मास येऊन किती वेळ झाला असेल बरें ?

म०—थोडा वेळ झाला, आई.

आ०—जर तुह्माला येण्याची इच्छा नसती तर माझी आज्ञा मोडण्याची शक्ति होती.

ना०—अगे आई, साळू मला चित्रें दाखवीत होती; तीं थोडा वेळ पाहावीं असी कांहीं माझी इच्छा होती.

आ०—तसें करण्याची इच्छा असती तर शक्ति होती.

ना०—खरें, पण तसें करण्याची माझी इच्छा नव्हती.

आ०—इकडे येण्यापेक्षां साळूजवळ राहावें असी इच्छा कां धरिली नाहीं?

ना०—तूं मजवर रागें भरसील आणि तुझी आज्ञा मोडिल्यावरून मला दुःख होईल, असें माझ्या मनांत आलें. चित्रें पाहण्याची इच्छा होती खरी, परंतु तुझी गोष्ट ऐकण्याचीहि इच्छा होती.

आ०—तसेंच तुह्मी सर्व वेळोवेळ कांहींएक काम करायाला इच्छितां, परंतु हें योग्य नाहीं असा त्याच वेळेस विचार मनांत येतो; आणि कधीं कधीं कांहीं एक काम करायाला इच्छीत नाहीं, परंतु करावें असा विचार येतो; तेव्हां या दोन गोष्टींतून आपण कोणतें करावें असें तुह्मी निवडून घेतां. चांगलें केलें तर तुह्मी सुख पावतां, आणि वाईट केलें तर दुःख पावतां.

चि०—आई, माझ्या मनांतील गोष्ट तूं किती चांगली समजतीस. तूं बोललीस त्याप्रमाणेंच मला शेंकडोवेळ अनुभव आला.

म०—तसाच मला आला.

ना०—आणि मलाहि जेव्हां खोंपा काढावयासाठीं झाडावर चढावें असें माझ्या मनांत आलें, परंतु आईनें मना केलें होतें ह्मणून हें करणें योग्य नाहीं असें मी समजलों, त्या वेळेस असा अनुभव आला.

आ०—तूं झाडावर चढलास कीं काय?

ना०—नाहीं; आणि तुझी आज्ञा मोडिली नाहीं, यावरून पुढें मला फार संतोष झाला.

आ०—माझ्या मुलानो, बहुतेक गोष्टींविषयीं तुह्मी स्वतंत्र आहां असें तुह्मी समजतां, कारण कीं तुह्मी बरें व वाईट जाणतां, आणि बरें व वाईट तुह्माला खुशीप्रमाणें करितां येतें. आतां मला एका गोष्टीचें उत्तर द्या, तुह्मी चांगली बुद्धि धरून बरें केलें आणि सुखी झालां, किंवा वाईट बुद्धि धरून वाईट केलें आणि दुःखी झालां, तेव्हां तुह्मी खुशीप्रमाणें बुद्धि धरिली आणि करणें केलें कीं नाहीं? लेंकरें ह्मणतात, होय्, होय्, होय्.

आ०—जें तुह्मी केलेंत तें करावयाला तुह्मावर कोणी जबरी केली, असें तुह्माला वाटतें कीं काय?

म०—नाहीं, आई; पण कधीं कधीं बरें करायाला फार कठीण वाटतें.

आ०—कशामुळें असें कठीण वाटतें?

म०—हा प्रश्न कठीण आहे, आई. चांगल्या मुलासारिखा होऊन तुजवर प्रीति करून तुला संतोषवावें, आणि चिमणी व नाना यांजवर प्रीति करून यांचें बरें करावें, असें जेव्हां मी इच्छितों तेव्हां बरें करणें हें फार सोपें आहे. परंतु कधीं कधीं माझी इच्छा असी नाहीं, केवळ आपल्याला संतोष व्हावा असी इच्छा धरून दुसऱ्याची कांहीं चिंता करीत नाहीं, त्या वेळेस चांगलें करणें मला फार कठीण आहे.

आ०—असी बुद्धि धरिली असतां आपणाला दोष लागतो, असें तुला वाटतें कीं नाहीं?

म०—होय; आणि त्यामुळें मला अधिक दुःख होतें.

आ०—बरें, माझ्या लेंकरानो, तुह्मी करण्याविषयीं स्वतंत्र आहां असें तुह्मी सर्व समजतां, आणि तुमच्या अनुभवासहि आलें आहे. बहुत गोष्टीविषयीं बरें काय आणि वाईट काय हें तुह्मी समजतां, जर

चांगली बुद्धि धरून बरें करितां तर तुह्मी खुषीनें करितां, आणि जर दुष्ट बुद्धि धरून वाईट करितां तर तुह्मी आपणच खुषीनें करितां. चांगली बुद्धि धरून बरें करितां तेव्हां तुमच्या मनास येतें आणि सुख प्राप्त होतें; आणि जेव्हां तुह्मी दुष्ट बुद्धि धरून वाईट करितां तेव्हां तुमच्या मनास येत नाहीं, आणि दुःख प्राप्त होतें. तर तुह्मी पापी आहां असें तुह्मी समजतां, कारण कीं तुह्मी बहुत वेळ खोड्या केल्या; जें अयोग्य तें केलें, आणि जें योग्य तें केलें नाहीं.

चि०—आई, सर्व माणसें पापी आहेत काय?

आ०—होय, माझ्या मुली, सगळ्यानी पाप केलें आहे; आणि क्षमा व तारण होण्याविषयीं सर्वांस पापाचा पश्चाताप करून येशू ख्रीस्तावर विश्वास ठेविला पाहिजे. माझ्या मुलांनो, दुसऱ्यांविषयीं नाहीं परंतु आपल्याविषयीं विचार करावा, असी माझी इच्छा आहे. आपण पापी आहों असें तुह्मी समजावें, नाहींतर तुह्मी पापाचा पश्चात्ताप करणार नाहीं, आणि तारणासाठीं येशू ख्रीस्तावर भरवसा ठेवणार नाहीं.

म०—म्या पाप केलें, आणि यामुळें मी दोषी आहें, हें मला ठाऊक आहे. परंतु आई, पाप काय हें आतांपेक्षां चांगलें समजावें असी माझी इच्छा आहे.

आ०—त्याचा अर्थ तुह्माला स्पष्ट करून दाखविणार होतें, आणि आतां मी सांगत असतां तुह्मी सर्व चित्त देऊन ऐका. महादू, तुला कसें वाटतें? जर मी तुमचा बंदोबस्त न करितां तुह्मा सर्वांस व साळूस आपल्या इच्छेप्रमाणें चालूं दिल्हें, तर आमच्या लाहान कुटुंबाची काय अवस्था होईल बरें?

म०—काय होईल तें दिसतच आहे, तूं आत्याच्या घरीं गेलीस त्या दिवसीं भांडण व गडबड व गोंधळ फार झाले, तसें होईल.

चि०—होय, महादू; तूं धनी होण्यास इच्छिलेंस ह्मणूनच तें सर्व झालें.

ना०—असें नव्हतें, चिमणे; परंतु तूं साळूवर हुकूम मिरवूं लागलास तेव्हां हें योग्य नाहीं असें महादू तुला बोलला.

आ०—चप, चप, लेंकरानो; मीं घरीं आल्यावर चौकसी करून बंदोबस्त केला त्याला पुष्कळ दिवस झाले, आतां ती गोष्ट पुन्हा काढूं नका; उकरून कलागत काढावी असा तुमचा स्वभाव पाहून मला दुःख वाटतें. यावरून असें दिसून येतें कीं या कुटुंबावर धनी असावा, आणि ह्या त्यावर अधिकार करून बंदोबस्त ठेवावा, याचें किती अगत्य आहे.

म०—तूं आह्मा सर्वांचा बंदोबस्त करितेस, यावरून मला तर संतोष वाटतो जर असा केला नाहींस तर आह्मांत लवकरच मोठा गोंधळ होईल.

आ०—गोंधळ होण्याचें कारण काय?

म०—तूं बाहेर गेलीस त्या दिवसींचेंच, आई, आह्मी एक चित्त नसून एकानें एकादें काम करायाला इच्छिलें असतां दुसऱ्यानें ह्मणावें, "तें नको, आह्मी दुसरेंच करूं," असें होईल मी सर्वांचा धनी होईन असें प्रत्येकाला वाटेल, त्यामुळें कोणाचीच सत्ता न चालून फार गडबड होईल, असें वाटतें.

आ०—माझ्या लेंकरानो, याचें मुख्य कारण हेंच आहे कीं दुसऱ्याचें कांहीं होवो पण आपलेंच हित व्हावें, असी सर्वांची इच्छा होईल. पाहा बरें, जर मी आपल्याच सुखावर सर्वकाळ दृष्टि देऊन तुमचें समाधान व सुख याची चिंता करीत नाहीं तर तुमचें कसें होईल?

ना०—मग आह्माला वेळच्या वेळेस न्याहारी व जेवण मिळणार नाहीं, असें वाटतें; आणि वस्त्रें फाटलीं तर कोण नीट करील?

चि०—खरें, मग स्वयंपाकाला सर्पण कोण आणून देईल?

म०—आणि आह्माला पुस्तकें देऊन शाळेंत कोण पाठवील, व धर्म पुस्तकें आह्माला कोण शिकवील?

आ०—अणखी पाहा, बरें; आह्मा सर्वांचें समाधान व कल्याण ज्याकडून होईल तें सोडून आपापल्या इच्छेप्रमाणें चालावें ह्मणून जर मोकळीक दिल्ही तर कसें होईल?

म०—मग तर आपल्या कुटुंबाची अवस्था आतांपेक्षां फार निराळी होईल, असें मला भय वाटतें.

आ०—असें होईलच होईल. कुटुंबांतील मनुष्यांस समाधान व सुख व्हावें ह्मणून प्रत्येकाला आपली स्वार्थबुद्धि सोडण्याचें किती अगत्य आहे, तें तुह्माला लौकर समजेल. जेणेंकरून सर्वांचें कल्याण होईल तें प्रत्येकाला केलें पाहिजे, हें समजेल. जर कांहींएक कामानें आपलें हित होईल असें कोणाला वाटलें, तरी त्याकडून सर्वांचें हित न होतां उलटें नड येती, तर तें काम त्याला सोडिलें पाहिजे, आणि जर तो खुषीनें सोडीत नाहीं तर तो सोडी असें केलें पाहिजे. आणि ज्यांप्रमाणें सर्वांनी चालावें असे नेम पाहिजेत. आणि जे नेम सोडितात त्यांस शिक्षाहि असाव्या, आणि हे नेम कुटुंबांतील सर्व मनुष्यें पाळितात कीं नाहीं असी देखरेख करण्याकरितां आणि जे नेम मोडितात त्यांस शिक्षा करण्याकरितां आणि कुटुंबाला बंदोबस्तानें सुखी ठेवण्याकरितां एक धनी असावा, असें तुह्मी समजाल.

म०—अगे आई, ही सर्व गोष्ट माझ्या मनांत अगोदर पुरती आली नव्हती. मी किती स्वार्थी व उनाड होतों, आणि माझ्या दुराचरणानें तुला किती त्रास झाला असेल, हें मी आतां समजलों.

आ०—असें तुझें बोलणें ऐकून मला संतोष वाटतो, मुला; स्वार्थी आणि उनाड असण्याचा किती दोष आणि त्याचें किती वाईट फळ आहे, हें तुह्मी पक्कें समजावें, असी माझी इच्छा आहे.

ना०—स्वार्थी असणें ह्मणजे काय?

आ०—काल चिमणीनें तुझ्याजवळ नारिंगाचा तुकडा मागितला, पण तूं देईनास, याची तुला आठवण आहे काय?

ना०—बरें, पण परवां तीहि आपलें कांहीं मला देईना.

आ०—तर तुह्मी दोघेहि स्वार्थी आहां; आणि स्वार्थी असणें ह्मणजे काय, हें तुह्मा दोघांस समजतें. जेव्हां तुह्मी आपल्यासाठींच कांहीं चांगलें मिळवावें, किंवा आपलेंच कल्याण व सुख व्हावें

ह्मणून पाहतां, आणि आपल्याप्रमाणें दुसऱ्याचेंहि हित व कल्याण आणि सुख व्हावें ह्मणून इच्छा धरीत नाहीं, आणि शक्तीप्रमाणें प्रयत्न करीत नाहीं तेव्हां तुह्मी स्वार्थी आहां. तुह्मी सर्व माझा अभिप्राय समजतां, परंतु पुढल्या संभाषणांत अणखी कांहीं उघड करून सांगेन.

संभाषण ४.

आ०—माझ्या लेंकरानो, स्वार्थबुद्धीविषयीं आपण काल बोलत होतों त्याचा विचार आतां अणखी करूं, कारण कीं अस्याने पाप ह्मणजे काय आहे याची चांगली समज होईल. हे महादू, तूं जेव्हां कांहीं बोलतोस किंवा करितोस तेव्हां आपण असें कां बोलतों किंवा असें कां करितों, हें तुझ्या मनांत येतें कीं नाहीं? असें बोलण्याने किंवा असें करण्याने आपणाला किंवा दुसऱ्याला कांहीं प्राप्त होईल, असी तुझी इच्छा असती कीं नाहीं?

म०—होय, आई, एका दिवसीं सकाळीं धान्य सांठवीत होतों तेव्हां तुझ्या बोलण्याची आठवण झाली कीं, हें काम दोन घटकांत अटपलें तर तुला बाहेर फिरावयाला नेईन, ह्मणून म्या तें काम फारच झटून केलें; फिरायाला जाण्याची माझी इच्छा होती ह्मणून इतकें झटून केलें.

आ०—आणि चिमणे, तूं आज दुपारीं तांदूळ इतके लौकर कां निवडलेस?

चि०—आई, त्वां मला सांगितलें कीं, त्या बिचाऱ्या मुलीला हे तांदूळ आतांच पाहिजेत ह्मणून. माझ्याने होईल तितकें लौकर निवडण्याची इच्छा होती.

आ०—ज्या कारणावरून आह्मी अमुक काम करितों किंवा अमुक काम करीत नाहीं त्याला हेतु असें ह्मणतात. अमुक बोलणें किंवा अमुक करणें यांत आमचा हेतु काय आहे, हें जर समजलें तर तें बोलणें किंवा करणें यांत आपण स्वार्थी आहों किंवा नाहीं, हें सहज

समजेल. दुसऱ्याचें हित सोडून आपलेंच हित व्हावें असा जर हेतु आहे तर आपण स्वार्थी आहों, असें समजावें.

चि०—तर आई, आह्मी आपलें सुख पाहूं नये कीं काय?

आ०—पाहावें, माझ्या मुली. जें क्षणिक नव्हे पण स्थीर आणि अक्षय आहे जें केवळ इहलोकींचें नव्हे पण सर्वकाळीक आहे, असें जें वास्तविक सुख तें जर तूं पाहतीस तर योग्य आहे. परंतु जर तूं केवळ आपल्याच सुखावर लक्ष्य ठेवून दुसऱ्याच्या कल्याणाविषयीं अडचण आणितेस किंवा शक्तीप्रमाणें आपल्यासारिखें दुसऱ्याचें हित व कल्याण पाहत नाहींस तर तूं स्वार्थी आहेस.

म०—आई, जस जसें तूं या गोष्टी आह्माला अधिक समजवितीस, तसतसी मला दहाशत वाटते कीं म्या केवळ स्वार्थबुद्धि धरिली आहे, हेतु ह्मणजे काय हें मला समजतें. माझ्या बोलण्यांत आणि करण्यांत माझा काय हेतु होता असा जेव्हां मी विचार करितों, तेव्हां दुसऱ्याच्या कल्याणाची चिंता म्या थोडीच केली, आणि फारकरून आपल्याच कल्याणाची चिंता केली असें मला कबूल करणें प्राप्त आहे.

आ०—होय, माझ्या मुला; आणि तूं पहिल्यापासून असेंच करीत आला आहेस, असें मला वाटतें. माझ्या लेंकरानो, मला हें तुह्मास साफ सांगितलें पाहिजे कीं जो स्वभाव आह्मामध्यें असावा ह्मणून देव इच्छितो तो तुह्मांतील कोणोएकामध्यें आहे असें माझ्या दिसण्यांत अझून आलें नाहीं. जसी आपणावर तसी दुसऱ्यावर प्रीति करावी, असें शास्त्रांत सांगितलें. अरे माझ्या प्रिय मुलानो, असी प्रीति तुह्मी केव्हां कराल? दुसऱ्याचें कल्याण करण्यांत जें वास्तविक सुख आहे तें तुह्मी कधीं शोधाल? आपल्या लाहान कुटुंबांत देखील जर एक एक आपल्या स्वच्छंदानें चालत असतां आणि जर कोणी धनी किंवा कांहीं नेम नसते तर स्वार्थबुद्धीनें किती अनर्थ घडते हें तुमच्या लक्षांत आलें आहे.

म०—अगे आई, एका दिवसीं पंतोजीला शाळेंत यावयाला दोन चार घट-

का उशीर लागला तेव्हां तेथें किती गलबला आणि गोंधळ झाला तो तुह्मास सांगतां पुरवत नाहीं. त्या दिवसीं फार हिंव पडलें होतें, ह्मणून शेकाटीजवळ मुलें दाटी करून इतकीं रेंटारेंटी करूं लागलीं कीं शेवटीं तीं मारामारीवर आलीं. कोणा कोणाला शेकावयाची इच्छा नसतांहि केवळ गलबला करण्याची आवड धरून त्यानी तसेंच केलें.

आ०—मुला, ते सगळे दुसऱ्याची चिंता न करितां केवळ आपलेंच सुख पाहत होते. ते आपल्या हेतूनी आणि वर्त्तणुकीने स्वार्थी होते. कित्येकानी तर केवळ दुष्ट स्वभावाची आणि उपद्रव देण्याची इच्छा तृप्त करण्यासाठीं असें केलें. पाहा, जर आपल्या गांवांतील सर्व लोक त्याप्रमाणें स्वार्थी असते आणि बंदोबस्तीकरितां कांहीं कायदे नसते, आणि जर ते त्या पोरांसारिखे कज्जा व दांडगाई करीत असते, आणि एक एक जण दुसऱ्यास दुःख होईल याची चिंता न करितां आपलेंच समाधान व सुख वाढावें किंवा आपल्या दुर्वासना तृप्त व्हाव्या ह्मणून यत्न करीत असता, तर कसें होईल?

म०—अश्या ठिकाणीं मला राहणें नको. पंतोजी नसतां जसें शाळेंत घडलें त्यापेक्षां देखील फार वाईट होईल.

आ०—मुलानो, याचा अणखी थोडा विचार करा जर जगांतील सर्व लोक तसेच असते, ह्मणजे दुसऱ्यांस किती दुःख असो; पण आपणच मोठे व सुखी असावें ह्मणून स्वार्थबुद्धि धरून दुष्ट उपाय चालवीत असते, तर कसें होईल?

म०—आई, तूं घरीं नव्हतीस त्या दिवसीं आपल्या लाहान कुटुंबांत देखील जो गोंधळ झाला त्यावरून किती गडबड व दुःख होईल हें माझ्या लक्षांत आहे.

आ०—पण हा विचार अझून पुरता झाला नाहीं. जे प्राणी देवानें उत्पन्न केले त्यांतील जे या पृथ्वीवर राहतात ते केवळ थोडकेच आहेत. ज्यांत लोक राहतात असीं अणखी किती जगें आहेत, हें देवानें आह्मास सांगितलें नाहीं. आकाश लोकांत पवित्र व सुखी आणि

नरकलोकांत पापी व दुःखी असे बहुत लोक भरले आहेत, हें आह्मास ठाऊक आहे. त्याशिवाय लक्षावधी लोक दुसऱ्या जगांत असतील, असें वाटतें. असें असतां जर देवाची सत्ता सर्वांवर नसती, आणि दंडाचें भय सोडून सर्व लोक आपल्या इच्छेप्रमाणें चालत असते, आणि दुसऱ्याच्या हिताकडे लक्ष्य न देतां आणि आपण दुसऱ्याचें किती वाईट करितों याची चिंता न करितां केवळ अतिशय स्वार्थी व पापी असते, तर सर्वत्र किती भयंकर दुःख होईल.

म०—असें नाहीं, ह्मणून मला फार आनंद आहे.

आ०—तुला आनंद होण्याचें कारण आहे खरें, मुला. देव आपली सत्ता चालवितो, आणि ज्या प्राणिमात्रांस त्यानें उत्पन्न केलें त्या सर्वांचा तो धनी आहे, आणि त्याचे नेम पवित्र व न्यायी व चांगले आहेत, ह्मणून हर्ष करावा. त्याला पापिष्ठ स्वभाव आणि स्वार्थबुद्धि अगदीं नाहीं. आपले प्राणी सुखी असावे असें तो इच्छितो, आणि आपण किती उत्तम आहें असें तो हजारों प्रमाणानी आह्मास नेहमी दाखवीत आहे. तो प्रीतिरूप आहे असें शास्त्रांत सांगितलें आहे. त्यानें आपला प्रियपुत्र आह्मासाठीं मरावयास दिल्हा, यांत आह्मावर त्यानें केवढी प्रीति केली. आणि जो दंड आमच्या पापास योग्य होता त्यापासून आह्मास सोडण्याकरितां येशू ख्रीस्त आकाशापासून उतरला, आणि आयुष्यभर दुःख सोसून फार क्रूर व लाजेचें मरण पावला, यांत त्याची प्रीति आह्मावर किती होती. येशू ख्रीस्ताची प्रीति मनांत आणिली असतां आमचा स्वार्थीपणा किती तुच्छ व कंटाळवाणा व पापी दिसतो. ज्यांसाठीं येशू ख्रीस्त मरण पावला ते आह्मी आपल्याच सुखावर लक्ष्य देऊन दुसऱ्याचें हित न पाहतां केवळ आपलेंच हित पाहतों, आणि दुसऱ्यास कितीहि दुःख लागो तरी तें मनांत न आणून आपलाच किंचित् स्वार्थ सोडीत नाहीं किंवा आपलें थोडेसें सुख व सोई टाकीत नाहीं, हें किती वाईट आहे. आणि विशेषेंकरून ज्याकडून आपलें हित होणार नाहीं अशा दुसऱ्यास उपद्रव देणें हें किती दुष्टपण आहे. मी घरीं नव्हतें त्या दिवसीं तु-

ह्यामध्यें इतकें दुःख झालें याचें कारण हीच स्वार्थबुद्धि आहे. तुह्मी दांडगाई केली आणि कधीं कधीं माझ्या आज्ञा मानण्याचा कंटाळा केला, याचें कारण हेंच आहे. होय, माझ्यापेक्षां मोठा जो ईश्वर त्याच्या देखील आज्ञा या स्वार्थबुद्धीमुळेंच मोडिल्या. तुह्मी आपल्यासारिखी दुसऱ्यांवर प्रीति करून त्यांचें कल्याण पाहावें, असी देवाची इच्छा आहे. शास्त्रांत ज्या आज्ञा त्यानें आह्मास सांगितल्या त्या सर्व पवित्र व न्यायी व चांगल्या आहेत. त्यानें आह्मावर सत्ता करावी हें योग्य आहे, कारण कीं त्यानें आह्मास उत्पन्न केलें व तो आमचें बहुतप्रकारें कल्याण करितो. संपूर्ण बुद्धीनें व आचरणानें त्याची सेवा आह्मास केली पाहिजे. ज्या लोकांस त्यानें उत्पन्न केलें त्यांच्या कल्याणासाठीं त्यानें आपले नेम लावून दिल्हे. त्याच्या आज्ञाप्रमाणें आह्मी व सर्व लोक चालतील तर सर्व ठिकाणीं नेहमीचें परिपूर्ण सुख प्राप्त होईल. परंतु अरेरे माझ्या प्रिय मुलांनो, तुह्मी देवाच्या आज्ञा मोडिल्या. जसें तुह्मी आपल्या स्वार्थबुद्धीनें माझ्या मोडिल्या तसेंच देवाच्या आज्ञा मोडिल्या. जे देवाचे नेम धर्मशास्त्रांत लिहिले आहेत किंवा दुसऱ्या उपायानें समजतात ते मोडणें पाप आहे. त्याच्या मुख्य आज्ञा दोन आहेत, अशा कीं प्रभु जो तुझा देव त्यावर तूं आपल्या सर्व अंतःकरणानें व आपल्या सर्व जीवानें व आपल्या सर्व बुद्धीनें व आपल्या सर्व सामर्थ्यानें प्रीति कर, आणि जसी आपणावर तसी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर; हें ध्यानांत ठेवा. आपल्या स्वार्थी व पापिष्ट बुद्धीमुळें त्या आज्ञांत राहण्याचा तुह्माला कंटाळा येतो ह्मणून तुह्मी त्या मोडितां, आणि हें पाप आहे.

संभाषण ९.

म०—आई, देवाच्या आज्ञा मोडणें हें पाप आहे, असें काल त्वां आह्मास सांगितलें पण लाहानपणीं मला देवाविषयीं व त्याच्या नेमांविषयीं कांहीं समजलें नाहीं तेव्हां म्या पाप केलें कीं काय ?

आ०—माझ्या मुला, तूं पापांत जन्मलास आणि पहिल्यापासून तूं बहकला आहेस, आणि जर तुझें अंतःकरण पवित्र आत्म्याकडून शुद्ध न झालें तर तें सर्वांपेक्षां कपटी व फारच दुष्ट आहे, असें धर्मशास्त्रांत लिहिलें आहे. पाहा, आतां ही गोष्ट सत्य आहे असी तुमची खातरी व्हावी ह्मणून मी तुह्मा सर्वांस एक प्रश्न करितें, मग ही गोष्ट तुह्माला खरी वाटेल. तुह्मी फार लाहान होतां त्या वेळेस आपण वाईट केलें असें वेळोवेळ तुह्माला वाटलें कीं नाहीं?

म०—होय, वाटलें, आई.

चि०—तसेंच मला.

ना०—आणि मलाहि.

मा०—परंतु आई, त्वां आह्मास सांगितलें कीं पाप ह्मणजे देवाचा नेम मोडणें; परंतु आह्माला त्याच्या आज्ञा कांहीं कळल्या नव्हत्या तेव्हां आह्मी पाप कसें केलें, हें अझून मला समजत नाहीं.

आ०—त्या काल खरेंच सांगितलें कीं देवाचे नेम जे धर्मशास्त्रांत लिहिले आहेत किंवा दुसऱ्या उपायानें समजतात ते मोडणें पाप आहे. त्या नेमांप्रमाणें आह्मी पवित्र असावें, ह्मणजे देवावर उत्तम प्रीति करावी आणि सर्व प्रकारें त्याच्या आज्ञा मानाव्या आणि जसी आपणावर तसी दुसऱ्यावर प्रीति करावी. देव तर अनेक उपायानी आपले नेम आह्मास कळवितो. देव कसा आहे आणि आह्मी कसें व्हावें व काय करावें, आणि त्याचे नेम काय आहेत, हें बहुतकरून धर्मशास्त्रांत लिहिलें आहे. जें त्यानें उत्पन्न केलें त्याकडूनहि तो आह्माला प्रगट होतो आणि ज्या नेमांप्रमाणें तो सृष्टीला चालवितो त्यांतील बहुतेक नेम आह्माला समजतां येतील. सूर्याचा उदय व अस्त अमक्याच वेळेस होतो, आणि उन्हाळा व हिंवाळा नेमल्याकाळीं येतात, हें आह्माला समजलें आहे, आणि त्या नेमाप्रमाणें आह्माला आपली वहिवाट करावी लागती. जर माणसें दिवसभर निजतील व रात्रीं काम करितील व केवळ उन्हाळ्यांत बीज पेरितील, तर तीं

आपलें मूर्खपण असें केवळ नव्हे पण आपली दुष्टाईहि दाखवितील. जसें धर्मशास्त्रांतले नेम मोडले असतां पाप होतें तसें हे नेम मोडले असतां पाप होईल. त्याप्रमाणें कोणीएकाला असुक पदार्थ खाण्यापिण्यानें विषाप्रमाणें बाधक होतो व प्रकृति बिघडून शक्ति क्षीण होती, असें जर कोणाला समजलें आहे, तर त्या पदार्थाविषयीं देवाचा नेम त्याला कळला आहे आणि यापुढें जर तो खातो पितो तर तो देवाचा नेम मोडितो आणि पाप करितो.

म०— आई, भांग, दारू इत्यादि अमलकारक पदार्थ पोटांत घेणें हें या कारणास्तव पापिष्ठ आहे कीं नाहीं?

आ०— होय, माझ्या मुला; माझ्या बोलण्याचा अर्थ तूं चांगला समजलास ह्मणून मला संतोष आहे. उदाहरण चांगलें दिल्हेंस.

चिं०— ज्याकडून प्रकृति बिघडेल व शक्ति कमी होईल असा पदार्थ खाणें पिणें कशावरून पाप आहे, आई?

आ०— आमचें शरीर दुखणाईत व अशक्त झालें तर त्याकडून आपलें मनहि बिघडेल. आपल्या संपूर्ण जिवानें व शक्तीनें व अंतःकरणानें देवावर प्रीति करण्याचें व दुसऱ्यांचें कल्याण करण्याचें जें सामर्थ्य आह्माला आहे तें कमी होईल, आणि बहुत प्रकारें आपला धर्म आचरण्याचें सामर्थ्य कमी होईल; यावरून असें दिसतें कीं देवाचे जे नेम धर्मशास्त्रांत सांगितले आहेत किंवा दुसऱ्या उपायानें आमच्या समजण्यांत येतात, त्यांतील एक जर आह्मी मोडला तर त्यामुळें दुसरेहि मोडले जातात. हा पापाचा एक मोठा वाईटपणा आहे. एक पाप केल्यानें दुसरीं पापें करण्यास मार्ग सिद्ध होतो. जो ईश्वराचा एक नेम मोडितो तो त्याच वेळेस त्याचे दुसरे नेमहि मोडीत आहे किंवा मोडण्यास सिद्ध होत आहे. लाहान लेंकरांस कोणी शिकविलें नसतांहि त्यांस देखील देवाच्या कांहीं आज्ञा समजतात बऱ्या वाईट कांहीं गोष्टी तीं स्वतां समजतात. लेंकरें ज्या गोष्टी बोलतात व करितात त्यांतून कांहीं कांहीं गोष्टीनी दुसऱ्यास सुख किंवा दुःख होतें हें त्यांस लौकर कळूं लागतें. दुसऱ्यांस सुख द्यावें हें योग्य आहे, आणि दुःख

द्यावें हें अयोग्य आहे, हें त्यांस कळतें. घरांमध्यें आपल्यापेक्षां वडील व शाहाणे असे आपले आईबाप कुटुंबाचे धनी आहेत, असें तीं पाहतात. आईबापांस आपण मानावें हें योग्य आहे, आणि जे त्यांस मानीत नाहींत ते शिक्षा पावण्यास योग्य आहेत, असें त्यांस कळतें. भाऊ व बहिणी यांजवर प्रीति करावी आणि जसें त्यानी आह्मासीं वर्त्तावें ह्मणून आह्मी इच्छितों तसें आह्मी त्यांसीं वर्त्तावें हें योग्य आहे, असें तीं समजतात. आपले आईबाप व भाऊ बहिणी यांसीं त्याप्रमाणें आपण वर्त्तलें नसतां वाईट आहे, हेंहि तीं समजतात. तर या गोष्टी समजण्यासाठीं देवाने लेंकरांस बुद्धि दिल्ही व त्यांचा अनुभव घेण्यास अंतःकरणहि दिल्हें. इतकें केवळ नव्हे, पण आपल्या व दुसऱ्याच्या वर्त्तणुकी पाहून त्या गोष्टोचा समज व अनुभव त्यांस खचीत व्हावा असें देव करितो. ह्या गोष्टी त्यानी समजाव्या व अनुभव घ्यावा हे ईश्वराचे नेम आहेत, असें समजा. तर जी गोष्ट योग्य आहे ह्मणून मन साक्ष देतें तिजविरूद्ध जर लेंकरें करितात, तर तीं देवाच्या आज्ञा मोडितात आणि यांत दोष आहे, असें त्यांच्या अनुभवास येतें. असे लेंकरांच्या मनांत कांहीं नेम लिहिले आहेत. तर देवाला जरी अगदी ओळखत नाहींत, तरी देवाचे हे नेम मोडिल्याने तीं पाप करितात. यांत तीं आपल्या अंतःकरणाचें वाईटपण दाखवितात, असें कीं जर त्यांस देवाचे नेम कळले तर तीं आपलेंच सुख व समाधान यासाठीं मोडितील.

ना० — आई, मी लाहान आहें, पण तुझें बोलणें खरें हें मला ठाऊक आहे. बरें व वाईट याविषयीं लेंकरांचे विचार व अनुभव जे त्वां सांगितले तसेच मला वेळोवेळ घडले आहेत, याची मला आठवण आहे.

आ० — होय; सर्व लेंकरांला हें ठाऊक आहे. बरें काय आणि वाईट काय हें त्यांस आईबाप व पंतोजी वेळोवेळ शिकवितात हेंहि त्यांस ठाऊक आहे; आणि जरी लाहानपणांत तीं देवाविषयीं कांहीं बरोबर समजत नाहींत, तरी आईबापांचें बोलणें नीट आहे असें त्यांचें मन साक्ष देतें; आईबाप व पंतोजी आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहेत हें त्यांस समजतें, आणि त्यांला मानावें हें योग्य आहे असें त्यांच्या अनुभवास येतें. जर

लेंकरें आईबापाचें व पंतोजोचें शिकविणें ऐकत नाहींत आणि त्यांच्या आज्ञा मानीत नाहींत, तर त्यांला देवाविषयीं जरी कांहीं बरोबर समजलें नाहीं तरी तीं देवाचे नेम मोडून पाप करितात. तीं आईबापांच्या सत्तेंत राहत नाहींत, यावरून असें दाखवितात कीं जर देवाची सत्ता आपल्या स्वार्थबुद्धीला आडवी येती तर तींतहि आपण चालणार नाहीं. तर माझ्या मुलानो, शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें मनानें किंवा वर्तणुकीनें देवाचे नेम मोडणें हेंच पाप आहे, हें तुह्मास कळलें, लाहान लेंकरांस पाप करितां येतें, आणि देव व धर्मशास्त्र यांविषयीं कांहीं समजल्या अगोदर तीं पाप करितात, हेंहि तुह्माला कळलें आहे; जगांतील पाप व दुःख याचें मूळ कारण जें आदाम व हावा यांचें पाप त्या पापाचें फळ आपणास प्राप्त होतें, हें तीं लाहानपणांत दाखवितात. आपल्या अंतःकरणांत देवाची कांहीं प्रीति नाहीं आणि देवाच्या आज्ञा पाळाव्या असा आपला स्वभाव नाहीं, हेंहि तीं लाहानपणांत दाखवितात. शास्त्रांत जी देवाची इच्छा दाखविली ती ज्याकडून मोडती असा पापिष्ठ स्वभाव व स्वार्थबुद्धि व योग्य सत्तेंत चालण्याचा कंटाळा आहे, हेंहि लाहानपणांत दाखवितात. देवाच्या आज्ञा लेंकरांस कळूं लागतात त्याच वेळेपासून त्या आज्ञा मोडाव्या असा हा पापिष्ठ स्वभाव प्रगट होतो, आणि पवित्र आत्म्याकडून त्यांचें मन पालटेल तोंपर्यंत हा स्वभाव तसाच प्रगट होत जातो.

ना० — आई, पाप फार वाईट आहे, पण इतकें वाईट आहे, असें मी अगोदर समजलों नाहीं.

आ० — तुझें बोलणें ठीक आहे, पाप लाहान लेंकरांत देखील फार वाईट आहे. त्याचें फळ कितो वाईट आहे हें तुला ठाऊक आहे, पापामुळें लेंकरें व त्यांचे सोबती दुःखित होतात, आणि त्यामुळें कुटुंबाचा बंदोबस्त व सुख नाहींसें होतें. आणि लेंकरें दुराचरण करितात ह्मणून त्यांचे आईबाप शोक करितात मोठीं झाल्यावर तीं कशीं वर्त्ततील याविषयीं त्यांच्या आईबापांला पापामुळें फार भय आहे. जों जों वय अधिक होतें तों तों पाप वाढतें, असा लेंकरांच्या पापिष्ठ स्वभावाचा सर्वांहून

फार वाईट गुण आहे. पापाचा पश्चात्ताप करून त्याला जिंकिलें नाहीं तर तें नेहमी अधिक वाढत जातें. जें हेंकड लेंकरूं आई-बापांच्या आज्ञा मानीत नाहीं आणि आईबाप मना करीत असतां बहुत वाईट गोष्टी करितें त्याचें मन जर पालटत नाहीं तर त्याचें पाप वाढत जाईल, आणि त्याचा हेंका व स्वार्थबुद्धिहि वाढतील. त्याचें अंतःकरण पापामुळें कदाचित् इतकें कठोर होईल कीं देवाच्या व मनुष्याच्या आज्ञा तुच्छ मानून मोठाले अनर्थ करील. आणि यामुळें कदाचित् मरण दंडहि लागेल. अणखी माझ्या लेंकरानो, श्रेष्ठ व पवित्र जो देव त्याला तुमच्या पापामुळें किती राग येतो, याचा तुह्मी विचार करा. पाप करण्यानें तुह्मी त्याच्या आज्ञा मोडितां आणि त्याची सत्ता तुच्छ मानितां. त्यानें तुह्माकरितां मरण पावण्यासाठीं आपला प्रिय पुत्र जगांत पाठविला, इतकी ज्यानें तुह्मावर प्रीति केली त्याचे उपकार तुह्मी मानीत नाहीं. आपले लोक सुखी व्हावे ह्मणून जे उपाय देव करितो त्यांला तुह्मी प्रतिकूळ आहां, आणि दुसऱ्यांच्या कल्याणाविषयीं तुह्मी कांहीं चिंता करीत नाहीं, आणि जेथें देवाची प्रीति व सेवा करण्यांत व आपल्या सोबत्यांवर प्रीति करण्यांत लोक सुखी आहेत तेथें जायाला तुह्मी योग्य नाहीं, हेंहि तुमच्या पापावरून दिसतें. माझ्या लेंकरानो, या गोष्टीचा विचार तुह्मी करा. माझ्या बोलण्यावरून तुमचें कल्याण व्हावें ह्मणून तुह्माला पवित्र आत्म्याचें साह्य होवो, असी देवाला माझी विनंती आहे.

संभाषण ६.

म० — अगे आई, नव्या गोष्टी सांगण्याच्या अगोदर मागें सांगितलेल्या गोष्टीचा कांहो कांहीं सारांश आह्माला फिरून सांग; मग दुसरें बोल.

आ० — होय, मुला; संतोषानें सांगेन, कारण कीं पापाचा पश्चात्ताप ह्मणजे काय हें समजण्याकरितां आधीं पाप ह्मणजे काय हें तुह्माला पक्कें समजावें, असी माझी इच्छा आहे. तर मजकडे नीट चित्त द्या. तुमचीं अंतःकरणें वाईट आहेत आणि तुह्मी स्वतंत्र आहां, हें तुह्माला कळवि-

लें होतें. चांगलें व वाईट जाणण्याची तुह्माला बुद्धि आहे. चांगलें करण्यामुळें तुह्माला सुख व्हावें आणि वाईट करण्यामुळें तुह्माला दुःख व्हावें असा देवानें तुमचा जीवात्मा केला आहे. चांगल्यास कबूल व वाईटास नाकबूल करणारें असें मन तुह्मास दिल्हें आहे. अणखी बरें व वाईट करावें ह्मणून तुह्मावर कोणाची जबरदस्ती नाहीं, परंतु तुह्मी आपल्या खुशीनेंच चांगलें व वाईट करितां, असा तुह्माला अनुभव आहे. आतां पाहा, योग्य व अयोग्य याविषयीं देवानें तुह्माला अज्ञानी ठेविलें नाहीं; त्याविषयीं त्यानें आपले नेम अगत्यानें तुह्मास कळविले आहेत. तुह्मी काय करावें व काय करूं नये असे बहुत गोष्टींविषयीं देवाचे नेम काय आहेत, हें तुह्मी स्वतां समजून घ्यावें, असें देवानें केलें आहे, आणि तुह्मास धर्माविषयीं शिकविणारे आईबाप व उपदेशक देवानें दिल्हे आहेत. आणि त्यांनी व तुह्मी आणि सर्वांनी देवाची इच्छा पक्की समजावी ह्मणून देवानें आपले नेम धर्मशास्त्रांत सर्वांला प्रगट केले आहेत. त्या नेमाप्रमाणें जर आह्मी चालतों तर इहलोकीं सुख व परलोकीं सर्वकाळचें जीवन आह्माला व आह्माकडून दुसऱ्यांला प्राप्त होईल. देवाची इच्छा काय आहे, आणि तो किती थोर व ज्ञानी व चांगला व पवित्र व न्यायी आहे, आणि त्यानें सर्व वस्तु आणि प्राणीमात्र यांवर धनीपण करावें ह्मणून योग्य आहे, हें सर्वांलोकांस समजण्यासाठीं देवानें आपले नेम दिल्हे. त्याच्या आज्ञा पाळण्यानें लोकांनी देवासारिखें चांगलें व पवित्र होऊन त्याची प्रीति व मान यथास्थित करावा, यासाठीं देवानें आपल्या आज्ञा आह्मास दिल्ह्या, त्या आज्ञा पाळण्यानें आतां व सर्वकाळपर्यंत लोकांनी अतिशय सुखी असावें ह्मणून दिल्ह्या. त्या आज्ञा पाळण्यानें सर्व लोक प्रीतिरूप मोठें कुटुंब व्हावें, आणि सर्वांनी आपला उत्पन्न व पोषण व कल्याण करणारा जो देव त्यावर प्रीति करून व त्याच्या आज्ञा पाळून व एकमेकांवर प्रीति करून व त्यांचें कल्याण पाहून सुखी व्हावें, ह्मणून देवानें आज्ञा दिल्ह्या. जर कोणी मनुष्य देवाचे सर्व उपकार मनांत न आणून त्याच्या आज्ञा पाळण्याला अमान्य आहे, तर अश्या मनुष्याला दंड लाविल्यावरून तो आपली सत्ता सर्वांवर चालवीलच चालवील, असें सर्वांनी सम-

जावें ह्मणून त्याने आपले नेम दिल्हे. जर देव सर्व प्राणीमात्रांवर सत्ता चालवीत नसता परंतु सर्वांला आपल्या इच्छेप्रमाणें चालूं देता, तर किती गोंधळ व दुःख होतें, हें आमच्या लक्षांत आलें. देव आपली सत्ता चालवीलच. तो चांगला व न्यायी आहे, आणि त्याच्या आज्ञेनें जे चालत नाहींत त्या सर्वांवर तो राग दाखवील. आपणापासून त्यांस सर्वकाळपर्यंत बाहेर घालवील आणि त्यांच्या वर्त्तणुकीला जें योग्य दुःख तें त्यांस मिळेल, असा कठोण व भयंकर दंड तो त्यांस करील.

माझ्या मुलांनो, देवानें आह्मांला नेम कशासाठीं दिल्हे याचीं कांहीं कारणें आतां तुह्मांला समजलीं. जसा देव तसेच त्याचे नेम न्यायी व पवित्र व चांगले आहेत. हे पाळावे ह्मणून योग्य आहे, असें तुमचें मन तुह्मास साक्ष देतें. तर नेम मोडणें हें पाप आहे. पुरुष व स्त्रिया व लेंकरें यांस पापिष्ठ व स्वार्थीक बुद्धि आहे, ह्मणून तीं देवाच्या आज्ञा मोडितात. त्यांच्या पापिष्ट बुद्धीला देवाच्या आज्ञा विरुद्ध आहेत. आपल्या संपूर्ण जिवानें व सामर्थ्यानें व अंतःकरणानें देवावर प्रीति करावी आणि जसी आपणावर तसी दुसऱ्यांवर प्रीति करावी अस्या त्या आज्ञा आहेत. जेणेंकडून दुसऱ्याचें अनहित होईल तें करून आपलेंच हित पाहावें असी जो पाप्याची इच्छा तिला हे नेम आड येतात. त्यास दुसऱ्याची कांहीं चिंता नाहीं, ह्मणून या नेमांचा पाप्याला कंटाळा आहे, आणि त्याप्रमाणें चालण्यास तो मान्य नाहीं. देवाच्या न्यायी व चांगल्या सत्तेंत राहण्यास तो नाकबूल आहे. असें असतां माझ्या मुलांनो, तुह्मी पापी आहां याविषयीं कांहीं संशय राहिला नाहीं. तुह्मी कशावरून पापी आहां आणि तुमचें पाप कोणत्या प्रकारचें आहे, हें तुह्मांला समजतें. तर आतां पापाच्या पश्चात्तापाविषयीं आपण जें बोलणार आहों त्याविषयीं तुह्मी चिंता धरावी असी माझी इच्छा आहे, कारण कीं खरा पश्चात्ताप ह्मणजे काय हें तुह्मी पक्कें जाणावें आणि अंतःकरणांत त्याचा अनुभव घ्यावा, याचें मोठें अगत्य आहे. कां ह्मणाल, तर आपण विचार केला त्याप्रमाणें जर पाप फार दुष्ट आहे तर त्यापासून आपण मोकळें होण्याची सर्वांपेक्षां मोठी काळजी तुह्मी धरावी. पश्चा-

त्तापशिवाय तुह्मी पापापासून कधीं मोकळे होणार नाहीं, असें दे-
वानें आपल्या शास्त्रांत निक्षून सांगितलें आहे. आतां खरा पश्चात्ताप
ह्मणजे काय आहे, याचा विचार आपण करूं. परंतु पहिल्या संभा-
षणांत ज्या गोष्टी आपण बोललों त्यांतील कांहीं अगोदर तुह्माला
सुचविल्या पाहिजेत.

चि०— कोणत्या, आई? आपण खेदाच्या निरनिराळ्या प्रकाराविषयीं
बोललों तेव्हांच्या काय?

आ०— होय. खेदाचे दोन प्रकार आपण बोललों, याची आठवण तुह्मा
सर्वांला असेल, जें करावयाचें नव्हतें तें केलें त्यामुळें आह्मास दुःख
लागतें किंवा लागेल ह्मणून भय वाटतें, तेव्हां जो खेद होतो असा एक
प्रकार; आणि दुसरा प्रकार असा आहे कीं जें करावयाचें तें केलें
नाहीं त्यामुळें आह्मास दुःख लागतें किंवा लागेल ह्मणून भय वाटतें,
तेव्हां जो खेद होतो तो.

ना०— गेल्या उन्हाळ्यांत मामाचा पैका ज्यानें चोरून नेला तो माणूस
तुला ठाऊक आहे, आई. आतां तो बंदिशाळेंत आहे, आणि त्याला
फार खेद होत असेल असें वाटतें.

आ०— तसेंच मला वाटतें, माझ्या मुला. तो कैदेंत आहे आणि त्याला
सक्त मजूरी केली पाहिजे, आणि कोणासीं बोलण्याची मोकळीक नाहीं,
यावरून त्याला खेद असेल. त्यानें पैका चोरून नेला ह्मणून त्याला
खेद होतो, असें तुला वाटतें कीं काय?

ना०— असें वाटतें, आई. त्यानें पैका चोरला नसता तर बंदिशाळेंत
पडला नसता.

आ०— त्यानें अगोदर कधीं चोरी केली, असें कोणाला ठाऊक आहे
काय?

भ०— बहुत वेळ चोऱ्या केल्या असें तो कबूल झाला, हें म्या ऐकिलें;
परंतु अगोदर तो कोणाला सांपडला नव्हता.

आ०—कोणाला कळणार नाहीं असें जेव्हां तो समजला, त्या वेळेस चो-

री केल्यामुळें त्याला खेद झाला, असें तुला वाटतें कीं काय, नाना ?

ना०— नकळे, आई; पण त्याला खेद झाला नाहीं असें बहुतकरून वाटतें, कारण कीं झाला असता तर त्याने पुढें चोरी केली नसती.

आ०— त्याने तुझ्या मामापासून पैका चोरून नेल्यावर, जेथें तो काम करीत होता त्या भूमींत तो पैका सांपडला, आणि त्याचा वहीम आला त्या वेळेस त्याला खेद झाला असें तुला वाटतें काय?

ना०— झाला, असें वाटतें; कारण कीं मला बंदिशाळेंत टाकतील, असें त्या वेळेस त्याला भय वाटूं लागलें.

आ०—त्या वेळेस जो त्याला खेद झाला किंवा आतां जो खेद त्याला आहे ह्मणून तुला वाटतें, त्यावरून चोरी करणें हें पाप आहे ह्मणून त्याला वाटलें, असें समजावें कीं काय? पैका चोरून नेला हें वाईट केलें असें तुझ्या मामाजवळ कबूल करावयाला व त्याची क्षमा मागायाला तो तयार आहे. असें त्यावरून समजावें कीं काय? ज्यांपासून त्याने आजपर्यंत चोरी केली त्या सर्वांजवळ क्षमा मागायाला व शक्तीप्रमाणें सर्वांची फेड करायाला तो तयार आहे, असें त्यावरून समजावें कीं काय? चोरी करावयाजोगा प्रसंग आला आणि तो कोणाला कळणार नाहीं असें त्याला वाटलें, तरीं तो फिरून चोरी करणार नाहीं, असें समजावें कीं काय ?

ना०— असें वाटत नाहीं, आई; कारण कीं त्याला बंदिशाळेंत टाकल्यावर त्याने चाकू चोरला आणि त्यामुळें त्यानी त्याला तीन दिवस कोठडींत टाकून त्याला पाणी व कोरडी भाकर खावयास दिल्ही, असें म्या ऐकिलें.

आ०— तर त्याचा खेद कांहीं उपयोगी नाहीं. तो अझून चोरटा आहे. त्याला दंड झाला ह्मणून तो खेद करितो दुसऱ्याच्या हिताकडे त्याचें लक्ष्य नाहीं, आणि सरकारच्या कायद्याकडेहि नाहीं. जर कोणाला कळणार नाहीं असें त्याला वाटलें, तर तो फिरून कायदा मोडील.

म०—त्याला जो खेद होतो त्याचा आणि खऱ्या पश्चात्तापाचा फार भेद आहे, असें मला वाटतें, आई.

आ०—हेंच मी सांगणार होतें, माझ्या मुला. सांगितल्यावांचून तुझ्या मनांत आलें ह्मणून मला संतोष आहे. जो खरा पश्चात्ताप त्यापेक्षां हा खेद फार वेगळा आहे, हें खरें. जर तूं देवाच्या आज्ञा मोडितोस, आणि आज्ञा मोडणाऱ्यांस जो दंड त्यानें नेमला आहे त्याविषयीं मात्र जर तुला भय वाटतें, पण दुसऱ्या प्रकारचा खेद तुला होत नाहीं, तर तुला आपल्या पापाचा खरा पश्चात्ताप झालाच नाहीं. आपण वाईट केलें ह्मणून तुमच्या मनांत वाटतें, असें त्या खेदावरून दिसत नाहीं. तूं देवावर प्रीति करितोस किंवा त्याच्या आज्ञा पाळून त्यानें गौरव करूं इच्छितोस, असें त्यावरून दिसत नाहीं. आणि तूं मनापासून खुशीनें त्याच्या आज्ञेंत राहावें असें कबूल आहेस, हें दिसत नाहीं, आणि दुसऱ्याचें हित व्हावें असी तुझी इच्छा आहे, असेंहि त्यावरून कांहीं दिसत नाहीं; कारण कीं जर तुला असी इच्छा असती तर मनुष्य चांगले व सुखी होण्यासाठीं जे नेम देवानें लावून दिल्हे आहेत त्यांप्रमाणें तूं चालतास.

संभाषण ७.

आ०— माझ्या मुलानो, मनांत खरा पश्चात्ताप झाला नसला तरी पापाविषयीं एक प्रकारचा खेद होतो, असें आपण काल बोललों, या खेदाविषयीं महादूला कांहीं प्रश्न करावे, असी माझी इच्छा आहे.

मा०— कोणते, आई ?

आ०—माझ्या आज्ञा मोडिल्या ह्मणून तुला कधीं कधीं खेद झाला बरें?

म०— होय, आई.

आ०— तर तुला कशावरून खेद होता, हें मला सांग.

म०— म्या वाईट केलें हें मला ठाऊक होतें, आणि आई मजवर रागें भरेल आणि कदाचित् मला शिक्षा करील असें भय धरिलें, यावरून असें दिसतें.

आ०—जसें तुला भय वाटलें होतें तसें मी तुजवर रागें भरलें आणि

कधीं कधीं तुला शिक्षा केली कीं नाहीं, बरें? माझा राग गेल्यावर आणि तुला शिक्षा मिळाल्यावर मग तुला कसें वाटलें?

म०— मला समाधान वाटलें. माझी खोडी व तुमचा राग यांचा कधीं कधीं लौकर विसर पडला. कधीं कधीं त्यांची आठवण थोडा वेळ राहिली, आणि फिरून असें कधीं करणार नाहीं, असा मनांत निश्चय केला.

आ०— असा निश्चय तूं कां केलास?

म०— तूं माझ्यावर रागावसील आणि फिरून शिक्षा मिळेल असें समजलों, ह्मणून.

आ०—कुटुंबावर जी योग्य सत्ता व कुटुंबाचा बंदोबस्त व सुख होण्यासाठीं जे नेम लाविले त्यांविषयीं तूं काळजी बाळगीत नाहींस, असें त्यावरून स्पष्ट दिसतें; याचा कधीं विचार तूं केलास कीं काय? आणि यावरून माझ्या आज्ञा मोडण्याचा तुला खेद झाला कीं काय?

म०— असा विचार व खेद मला झाला नाहीं, असें वाटतें.

आ०— माझ्या आज्ञा मोडल्या तर मी तुला शिक्षा करीन असें जरी म्या सांगितलें नसतें तरी तें वाईट आहे, असा विचार तूं कधीं केलास काय? आणि यावरून माझ्या आज्ञा मोडण्याचा तुला खेद झाला होता कीं काय?

म०— असा विचार व अनुभव मला झाला, हें माझ्यानें सांगवत नाहीं.

आ०— अणखी एक गोष्ट, माझ्या मुला; कधीं कधीं असें झालें कीं तूं माझ्या आज्ञा मोडिल्या आणि त्यामुळें शिक्षेचें भय धरिलें, पण तुझी खोडी देवाशिवाय व तुझ्या शिवाय दुसऱ्या कोणाला कळत नाहीं, कांहीं काळ गेल्यावर तुला असें वाटलें कीं हें कोणाला कळणार नाहीं, मग दुष्टपणानें आईच्या आज्ञा मोडिल्या, असा तुला खेद झाला कीं काय?

म०— मला थोडासा खेद झाला, खरें; पण कदाचित् प्रगट होईल आणि मला शिक्षा मिळेल, असें जेव्हां भय धरिलें त्या वेळेच्या खेदासारिखा नाहीं, असें मला कबूल करणें भाग आहे.

आ०— तुह्माला कधीं कधीं कांहींच खेद झाला नाहीं, आणि मागील खोडी समजण्यांत आली नाहीं, आणि आतांहि कळणार नाहीं, असा विचार करून फिरून तसेंच केलें.

म०— खरें, आई.

आ०— नाना, चिमणे; जें महादूनें आपणाविषयीं सांगितलें तें तुह्मालाहि लागतें, याविषयीं मला संशय नाहीं. माझा राग व शिक्षा यांचें भय धरून तुह्मी माझ्या आज्ञा मोडण्याचा कधीं कधीं खेद केला, आणि तुह्माला खेद होण्याचें मुख्य कारण हेंच होतें. या प्रकारचा खेद तुह्माला झाला, तरी माझ्या आज्ञा तुमच्या स्वच्छंदाला जेव्हां अडखळा करतील तेव्हां त्या मोडण्याची तुह्माला आवड आहे. असा खेद तुह्माला आहे, तरी खोडी प्रगट होणार नाहींत असें समजून फिरून तुह्मी तशाच कराल. या प्रकारचा खेद आणि खरा पश्चात्ताप यांचा भेद फार आहे, असें तुह्मी समजावें.

म०—परंतु आई, देवाचा राग व पापामुळें जो दंड त्यानें सांगितला त्याचें भय धरणें वाईट आहे कीं काय?

चि०—हेंच माझ्या मनांत आलें होतें, आई.

आ०—हें वाईट नाहीं. माझ्या मुलांनो, असें भय धरणें वाईट असतें तर पापामुळें जो दंड देवानें सांगितला आहे तो आह्मी चुकवावा ह्मणून त्यानें आपल्या शास्त्रांत आह्मास इतकें सांगितलें नसतें. त्या दंडाकडून तुह्माला सर्वकाळचें दुःख व यातना होईल, याकरितां तुह्मी त्याजपासून पळून जावें, ह्मणून देवानें भय दाखवून सांगितलें आहे. अणखी पाप सोडावें आणि त्याचा खेद करावा आणि येशू ख्रीस्त जो पश्चात्ताप आणि पापाची सुटका देण्यासाठीं अधिकारी आणि तारणारा नेमला आहे त्याजवर विश्वास ठेवावा आणि जसी त्यानें देवाची इच्छा पाळिली तसी तुह्मी पाळावी, याविषयीं देव तुह्माला आग्रहानें सांगतो, यासाठीं कीं तुह्मी आकाश लोकांत जाऊन सर्वकाळचें सुख भोगावें. आपापल्या पापाचा खेद करितांना आपणावि-

षयीं व दुःखांपासून आपल्या सुटण्याविषयीं व आपल्या हिताविषयीं तुझी चिंता करावी, हें जर वाईट असतें तर त्यानें असा आग्रह केला नसता. परंतु यापेक्षां अणखी केलें पाहिजे हें तुझाला दाखविण्यासाठीं म्या यत्न केला. शिक्षेच्या भयामुळेंच जर तुझाला पापाविषयीं खेद झाला तर पापाचा खरा पश्चात्ताप तुझाला झाला नाहीं. खेद होण्याला त्यापेक्षां दुसरें चांगलें कारण पाहिजे.

आतां घटकाभर असी एक गोष्ट समजा, कीं एक बिचारा लाहान मुलगा ज्याला कोणी आईबाप व आप्तविषय नाहीं, तो भुकेला व हिंवलेला असा महादूला रस्त्यांत अढळला. तेव्हां मी महादूला ह्मणतें, तूं या अनाथाला आपल्या घरीं आण, आणि त्याचा संभाळ कर, आणि त्याला बापासारिखा हो. मग तो तसें करितो, आणि काकानें महादूला जो पैका दिल्हा त्यांतून कांहीं घेऊन त्या मुलासाठीं कापडें व पुस्तकें जीं पाहिजेत तीं विकत घेतो. आतां तो लाहान मुलगा फार संतुष्ट आहे, आणि आह्माजवळ राहण्याचा त्याला फार आनंद आहे. दुबळ्याचें नांव बाळू असें समजा. त्यानें चांगलें वर्त्तावें व आज्ञांप्रमाणें चालावें, याची महादूला फार हौस आहे. मी महादूला ह्मणतें कीं, तूं बाळूला आपल्या सत्तेंत चालीव, या प्रकारेंहि तूं त्याला बापासारिखा हो. हा विचार महादूला बरा वाटतो आणि हिंमत धरून त्याप्रमाणें तो करूं लागतो. हा प्रकार कांहीं दिवस बरा चालतो, पण एक्या गोष्टीमुळें आडचण पडती. आतेनें सुंदर चित्रांचें पुस्तक महादूला दिल्हें होतें. पुढल्या शनवारच्या संध्याकाळीं तुझाला दाखवीन, असें महादूनें चिमणी व नाना व बाळू यांस सांगितलें. चित्रें पाहण्याचें बाळूला फार नवल वाटलें. आणि पूर्वीं त्यानें कधीं कधीं चित्रें खराब केलीं, आणि हुकूम मोडून कधीं पुस्तकें काढिलीं असें महादूला ठाऊक आहे ह्मणून तो बाळूला सांगतो कीं, नवें चित्रांचें पुस्तक काढूं नको; जर काढसील तर दोन दिवस जेवणासाठीं केवळ कोरडी भाकर व पाणी मिळेल. ज्या खोलींत चित्रांचें पुस्तक आहे तींत एका वेळेस बाळू गेला, परंतु त्याशिवाय दुसरा कोणी नाहीं. त्याच्या मनांत असें येतें कीं, आतां

चित्रें पाहायाला संधी चांगली आहे, आणि पाहावीं असी त्याची फार इच्छा आहे; परंतु असें केलें तर आज कोरडी भाकर आणि पाणीच मिळेल हेंहि त्याच्या मनांत येतें आणि त्याला वाईट वाटतें, कारण कीं आज कांहीं पक्वान्न होणार आहे असें त्यानें ऐकिलें होतें. पुस्तक घेतलें तर वाईट आहे हेंहि त्याच्या मनांत येतें. आपण अगोदर पुस्तक खराब केलें आणि हें पुस्तक फार मोलाचें आहे याचाहि कदाचित् नाश होईल, हें मनांत आलें. महादू मजवर ममता करितो यास्तव मी त्याच्या आज्ञा मानाव्या हें योग्य आहे, हेंहि त्याच्या मनांत येतें. तें पुस्तक पाहूं नये असें जें महादूनें सांगितलें तें योग्यच आहे, आणि ज्या वेळेस महादू मला व दुसऱ्या लेंकरांला दाखवील तेव्हां एकदम सर्वांनी पाहावें हें चांगलें आहे, असी मन साक्ष देतें. परंतु पाहण्याची इच्छा फार आहे आणि ती वाढत वाढत जाती. महादूला मानावें असें मन आपणाला सुचवितें, पण हें ऐकत नाहीं. तो पुस्तक काढितो आणि चित्रें पाहायाला चुलीजवळ बसतो. तें पुस्तक मोठें आहे आणि नीट धरीत नाहीं, ह्मणून हातांतून निसटून विस्तवांत पडतें. काढितो आहे इतक्यांत थोडें बहुत जळलें, आणि कित्येक चित्रांचा नाश झाला, बहुतकरून सर्व चित्रें कांहीं खराब झालीं. इतक्यांत महादू आंत येतो, बाळू फार घाबरून उचकतो, आणि जें केलें त्याला तो कबूल आहे; आणि यामुळें किती खेद झाला हें तो अश्रू ढाळून महादूला सांगतो.

आतां पाहा, माझ्या मुलानो; महादूला राग आला, आणि आज कोरडी भाकर व पाणीच मिळेल व पक्वान्न अंतरेल ह्मणूनच बाळूला खेद होतो, असें समजा. शिक्षेचें भय व चिंता त्याला आहे, आणि खेद करण्याचें हेंच कारण आहे. महादू आपला धनी आहे, आपल्यावर ममता करितो, आणि त्याची योग्य आज्ञा मोडून ग्या वाईट केलें ह्मणून त्याला खेद होतो, असें नाहीं. अशा मोलवान पुस्तकाचा नाश केला यामुळें जें महादूला दुःख झालें यावरून बाळूला खेद होतो, असें नाहीं. दुसऱ्या लेंकरांला चित्रें पाहण्याची

जी आशा होती ती तुटली यामुळें खेद झाला, असें नाहीं. आपला वाईट स्वभाव दुसऱ्यास दाखविला ह्मणून त्याला खेद झाला, असें नाहीं. त्यानें दुसऱ्या लेंकरांस वाईट मार्ग दाखविला आणि यावरून तींहि कदाचित् आईबापांच्या आज्ञा मोडितील ह्मणून त्याला खेद झाला, असें नाहीं. परंतु आज कोरडी भाकर व पाणीच मिळेल व पक्वान्न अंतरेल, यामुळेंच त्याला खेद होतो. पाहा, महादू; तुझी आज्ञा मोडून त्यानें फार मोलवान पुस्तकाचा नाश केला याविषयीं असा खेद करावा, हें तुला कसें वाटतें.

म०—ज्याचें म्यां इतकें पालण केलें त्यानें जर असें केलें तर हा मुलगा फार दुष्ट आहे आणि माझे उपकार अगदीं मानीत नाहीं, असें वाटेल खरें, आई?

ना०—म्यां तर कोरडी भाकर व पाणीच आठवड्यापर्यंत दिल्हें असतें.

चि०—म्यां असें कांहींच केलें नसतें, पण त्याला लागलेंच घरांतून हांकून दिल्हें असतें, आणि पुढें त्याची वहिवाट कांहींच ठेविली नसती.

आ०—नाना, चिमणे; तुह्मी जें आतां सांगितलें त्यांत तुमचा स्वभाव चांगला दिसत नाहीं. त्या मुलानें वाईट केलें खरें, परंतु त्यानें पुस्तक घेतलें किंवा संभाळ न करितां त्याचा नाश केला याकडे तुह्मी लक्ष्य द्यावें, असें माझ्या मनांत नव्हतें, पण त्याचा खेद कोणत्या प्रकारचा होता हें तुह्मी पाहावें, असें माझ्या मनांत होतें. तो खेद केवळ स्वार्थ बुद्धीचा होता, आणि त्यावरून त्याचें मन कांहीं सुधारलें, असें दिसत नाहीं. अपराध गुप्त राहील असें जर निश्चयें वाटेल तर तो फिरून करणार नाहीं, असेंहि यावरून दिसत नाहीं. अशा स्वार्थ बुद्धीचा जो खेद तो तुह्मी सर्वांनी वाईटच मानिला हें बरें केलें परंतु नाना व चिमणी यांच्या स्वाधीन तो मुलगा असता तर त्याचें फार वाईट केलें असतें.

आतां पाहा, माझ्या मुलांनो; पापामुळें जो दंड देवानें सांगितला आहे त्याच्या भयामुळेंच जर तुह्मी पापाचा खेद करितां, तर तो खेद

स्वार्थ बुद्धीचा आहे, असें या सर्व गोष्टीवरून दिसतें; अशा कंटाळ्यावरून तुमचें मन सुधारलें आहे, असें दिसत नाहीं. जर देवानें धमकी देऊन पापामुळें कांहीं दंड सांगितला नसता किंवा आपलें पाप देवाला कधींहि सांपडणार नाहीं असा जर भरवसा तुह्माला असता, तर पुढें पाप करितांना तुह्मी राहिलां नसतां. परंतु आतां आपलें संभाषण रोजच्यापेक्षां अधिक झालें; उद्यां संध्याकाळीं ही गोष्ट फिरून धरूं.

संभाषण ८.

आ०—महादू, गेल्या आठवड्यांत ज्या पोरानें तुझा चेंडू चोरून नेला ह्मणून ज्याविषयीं तुला वहमा होता त्यानें आज चेंडू आणून दिल्हा.

म०—आपण चोरून नेला ह्मणून तो कबूल झाला कीं काय, आई?

आ०—होय, म्या चोरून नेला ह्मणून मला फार खेद वाटतो असें त्यानें सांगितलें, आणि मला माफ करावें व कोणाला सांगूं नये, ह्मणून त्यानें काकळूत केली.

ना०—या कामाविषयीं त्या पोरानें खरा पश्चात्ताप केला असें मला वाटतें.

आ०—केला नाहीं, असें माझ्यानें ह्मणवत नाहीं; पण याविषयीं मला फार संशय आहे.

म०—कां बरें?

आ०—पापाविषयीं कोणी कबूल झाला ह्मणून त्यानें खरा पश्चात्ताप केला, असा नेम नाहीं. त्या पोरानें अगोदरहि आपले अपराध असेच कबूल केले होते, असें म्या ऐकिलें. आपणासीं दुसऱ्यांच्या वागण्यावरून जेव्हां त्याला समजतें कीं आपला वहमा त्यांस आला असेल, आणि बहुतकरून आपला अपराध उघडकीस येईल, तेव्हां

आपण काय करावें, असा तो विचार करूं लागतो. दोष उडविण्यासाठीं सर्व गोष्टीविषयीं आपण नाकबूल व्हावें असा कधीं कधीं तो निश्चय करितो, हें मला ठाऊक आहे. हा उपाय चालणार नाहीं, परंतु आपलें कपट खचीत दिसण्यांत येईल, असें त्याला कधीं कधीं भय वाटतें. तेव्हां दंड चुकविण्यासाठीं आपले अपराध कबूल करावे, असा तो निश्चय करितो. तर पाहा, म्या चेंडू चोरून नेला असें कबूल केलें तेव्हां त्याच्या मनांत असा विचार जर होता, तर त्याला कांहीं खरा पश्चात्ताप नव्हता, असें तुह्मा सर्वांला समजतें. त्याचें मन सुधारलें, असें नाहीं. अपराध सांपडणार नाहीं असें त्याला वाटलें तर तो फिरून चोरी करणार नाहीं, असें नाहीं.

चि०—परंतु आई, आह्मी वाईट केलें तर नाकबूल होऊं नये, पण तुझ्याजवळ लौकर कबूल व्हावें असें त्वां आह्माला शिकविलें.

आ०—असेंच शिकविलें, माझ्या मुलो; आणि तुह्मी असें करावें हें योग्य आहे. आणि त्या पोरानें आज कबूल केलें हें, बरें केलें. ज्याच्या तुह्मी आज्ञा मोडिल्या किंवा ज्या कोणाचें तुह्मी वाईट केलें त्याजवळ तें कबूल करणें, हें खऱ्या पश्चात्तापाचें योग्य फळच आहे. तथापि खरा पश्चात्ताप झाल्यावांचून कोणी कदाचित् तसें करितील. आणि तसेंच बहुतकरून आज त्या पोरानें कबूल केलें. कबूल करणें हें खऱ्या पश्चात्तापाचें फळ आहे किंवा नाहीं, हें त्यांच्या हेतूवरून समजावें. माझ्या मुलांनो, आमचे अपराध खचीत कळूं येतील, असें भय धरून वेळोवेळ तुह्मी माझ्याजवळ कबूल झालां, असें मला वाटतें. अपराध कबूल केले तर शिक्षा कमी होईल किंवा अगदीं चुकेल, असें तुमच्या विचारांत आलें. अपराध प्रगट होण्याचें तुह्माला भय वाटत नव्हतें, त्या वेळेसहि तुमच्या मनाला खुरखूर कधीं लागली असेल. तुह्मी वाईट केलें असें तुह्माला ठाऊक होतें ह्मणून तुह्माला दुःख वाटलें. अपराध कबूल केल्यानें दुःख कमी होईल असा तुह्मी विचार केला. मग अपराध कबूल

पाळाव्या ह्मणून योग्य आहे, आणि जो आपणाविषयीं फार दयाळू व सहनशीळ, अशा देवाविरुद्ध ग्या पाप केलें, ह्मणून त्याला कदाचित वाटत नसेल. आपलें दुष्ट अंतःकरण देवासीं वैरयुक्त आहे असेंहि त्याला वाटत नसेल. आपण दोषी व निरूपायी व दुःखी असतां येशू ख्रीस्ताच्या नावाने देवाच्या कृपेचाच आश्रय करावा, आणि पापापासून सुटका पावण्यासाठीं व आपण देवाला पसंत होण्यासाठीं येशू ख्रीस्तावरच विश्वास ठेवावा, याची त्याला गरज वाटत नसेल. देवावर प्रीति करावी व त्याच्या आज्ञा पाळाव्या याचा प्रारंभ निश्चय आहे, असें त्याला वाटेल. पण तो निश्चय दुसऱ्या भावना व हेतु यांमुळें उत्पन्न झाला असेल. परंतु त्या भावना व ते हेतु कोणत्याहि प्रकारचे असोत जर आतां सांगितलेल्या भावना व हेतु मनांत अगदीं नाहींत, तर तो निश्चय कितीहि दृढ असला तथापि त्यांत खरा पश्चात्ताप नाहीं. या गोष्टीविषयीं लोकांला फसण्याची फार जागा आहे. महादू, तूं रोगी होतास त्या वेळेस जो निश्चय केलास त्याविषयीं तूं फसलास ह्मणून भय आहे. तूं निरोगी असतोस त्या वेळेसहि आपलें अंतःकरण कसें आहे याविषयीं काळजी धरून आपली परीक्षा केलीच पाहिजे, कारण कीं शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, अंतःकरण सर्वांपेक्षां कपटी व अतिशय दुष्ट आहे. आतां, नाना, तुला एक प्रश्न करितें. कधीं कधीं जेव्हां तूं वाईट केलेंस आणि माझ्या रागाचें भय धरिलेंस तेव्हांच असें फिरून कधीं करणार नाहीं ह्मणून पक्का निश्चय केलास कीं नाहीं?

ना०—होय, आई, बहुत वेळां.

आ०—असा पक्का निश्चय केल्यावर तुला कसें वाटलें?

ना०—मला फार बरें वाटलें, कारण कीं एकाएकींच मी चांगला मुलगा होईन आणि पुढें असें कधीं करणार नाहीं, असें माझ्या मनांत होतें.

आ०—असा निश्चय केला हें फार बरें केलें, असें तुला वाटलें कीं नाहीं?

ना०—मला असें वाटलें ह्मणून तुला कशावरून कळलें, आई? म्या तर तुझ्याजवळ कधीं सांगितलें नाहीं.

आ०—त्या वेळेस वाईट केल्यामुळें तुला वास्तवीक खेद झाला कीं काय?

ना०—पहिल्याने मला खेद झाला आई, कारण कीं तुला कळेल ह्मणून मला भय होतें. परंतु तो निश्चय केल्यावर माझा खेद कांहींसा कमी झाला, असें वाटतें.

आ०—बरें, नाना; तूं आपला निश्चय कसा पाळलास?

ना०—चांगला पाळला नाहीं, असें कबूल करणें भाग आहे, आई.

आ०—अरे माझ्या मुला, आजच्या संभाषणाच्या शेवटीं जें मी सांगणार तें त्वां व दुसऱ्या लेंकरानी कधींहि विसरूं नये, असी माझी इच्छा आहे. देव जो सुज्ञ व पवित्र व न्यायी व चांगला आहे त्याच्याविरूद्ध पाप केल्यामुळें मनोभावाने पश्चात्ताप झाल्यावांचून देवावर प्रीति करण्याचा व त्याच्या आज्ञा पाळण्याचा निश्चय कांहीं उपयोगी नाहीं. अणखी आपण दोषी व निरूपायी व दंडी ठरलेले आहों ह्मणून पापाची क्षमा पावण्यासाठीं व देवासमोर पसंत पडण्यासाठीं येशू खीस्त जो आपला एकच तारणारा त्याजवर खरा विश्वास ठेवल्यावांचून तो निश्चय तुह्माला उपयोगी पडणार नाहीं. अणखी आपल्या शक्तीने असा निश्चय केला तर तुह्माला उपयोगी होणार नाहीं आपलें मन पालटावें व निश्चय पाळण्याची शक्ति व्हावी, ह्मणून येशू खीस्ताकडून देवापासीं पवित्र आत्मा मागितला पाहिजे. तसें प्रभूकडून व त्याच्या शक्तिबळाकडून प्रबळ व्हा, ह्मणजे सकाळचे ढग व पाहटेचें दहिंवर जें थोडा वेळ राहतें मग नाहींसें होतें तसा तुमचा निश्चय होणार नाहीं.

संभाषण ९.

आ०— नाना, पुस्तकखान्यांतून चित्रांचें मोठें पुस्तक काढण्यामुळें म्या तुला धमकाविलें, याला एक महिना झाला तेव्हांपासून हात लाविला नाहींस, असें वाटतें.

ना०— लावला नाहीं, आई.

चि०— पण आज त्याने शिंपल्यांच्या पेटींत हात घातला होता.

आ०— नीट लावून ठेवण्यासाठीं म्या केवढा श्रम केला हें तुला ठाऊक होतें, माझ्या मुला. ते अस्ताव्यस्त झाले नसले, तर बरें.

चि०— झालेच आहेत, आई. शिंपले काढून तो खेळत बसला होता. आतां फिरून नीट लावून ठेवण्यासाठीं तुला पुष्कळ वेळ लागेल.

आ०— चित्रांचें पुस्तक काढिल्याने तुझी आज्ञा मोडिली यामुळें मला फार खेद झाला, असें त्वां मला सांगितल्यावर हें कसें केलेंस, नाना?

ना०— शिंपले घेऊं नको, असें मला सांगितलें नाहीं, आई.

आ०— तें खरें, पण चित्रांच्या पुस्तकाला हात लावूं नको, ह्मणून ध्रम-कावयाचें जें कारण त्यावरूनच शिंपल्याच्याहि पेटीला हात लावूं नये, हें समजायाचें होतें. म्या तुला सांगितलें कीं, पुस्तकखान्यांतील सर्व ठाकठिकीने ठेवावें असी माझी फार इच्छा आहे; आणि ज्याला त्याला हात लावायाची तुझा खोड आहे ह्मणून मला श्रम होईल असें मला भय आहे, हेंहि तुला सांगितलें.

ना०— शिंपले काढले ह्मणून मला खरेंच फार दुःख वाटतें.

आ०— याविषयीं दुःख वाटतें ह्मणून पुस्तकखान्यांतील जिनसांला हात लावण्याची खोड जाईल कीं काय?

ना०— जाईल, असें वाटतें, आई.

आ०— बरें पाहूं, माझ्या मुला. परंतु आपल्या वर्त्तणुकीवरून हें सम-जावें कीं एक प्रकारची खोडी करणें सोडिलें तथापि तुला खरा पश्चा-त्ताप झाला, असा नेम नाहीं. चित्रांचें पुस्तक काढण्यामुळें जर तुला खरा पश्चात्ताप झाला असता, तर तूं शिंपल्याच्या पेटीला हात लावला नसतास. तसेंच माझ्या मुलानो, तुह्मी कांहीं प्रकारें देवाविरूद्ध पाप करणें सोडिलें ह्मणून त्याविषयीं खरा पश्चात्ताप झाला, असें तुह्माला वाटत असेल. परंतु तुह्मी दुसऱ्या प्रकारचें पाप करीत जातां तर तो खरा पश्चात्ताप कसा ह्मणावा? लेंकरूं एका प्रकाराने आईबापाच्या

आज्ञा मोडायाचें सोडतें तरीं दुसऱ्या बहुत प्रकारानी आज्ञा मोडीत जातें, तेंव्हां त्या एका गोष्टीविषयीं त्याला खरा पश्चात्ताप झाला याचें कांहीं प्रमाण नाहीं, असें तुह्मी सर्वांनी समजावें; अणखी जों जों तुह्मी वाढतां तों तों बहुत गोष्टीविषयीं तुमची आवड बदलेल. गोट्या खेळणें सोडून द्यावयाचें नानाला फार अवघड आहे. जर कांहीं कारणावरून मी त्याला मना करतें तर ही आज्ञा त्याला फार कठीण वाटेल, आणि ती मोडण्याविषयीं त्याला मोह पडेल, असें मला भय वाटतें. परंतु तो अठरा वर्षांचा झाल्यावर जर असी आज्ञा दिल्ही तर मोडण्याचें कांहीं भय राहणार नाहीं; परंतु जसी नानाला हल्लीं गोट्या खेळावयाची आवड आहे तसी अठरा वर्षांच्या मुलांस दुसऱ्या गोष्टीविषयीं आवड आहे त्या सोडाव्या ह्मणून त्यांस अवघड वाटेल आणि त्यांविषयीं आईच्या आज्ञा मोडण्याचा कदाचित् त्यांला मोह पडेल. तर माझ्या लेंकरानो, ज्या खोडीची तुह्माला पूर्वीं आवड होती ती उडाली ह्मणूनच तुह्माला कदाचित् वाटेल कीं, मला माझ्या वाईट वर्त्तणुकीचा खरा पश्चात्ताप झाला, कारण कीं म्या खुशीनें सोडिली, असें तुह्मी न समजावें. वय वाढल्यावरून किंवा निराळे प्रसंग पडल्यावरून बहुत लोक या गोष्टीविषयीं फार फसतात. जस्या लेंकरांच्या तस्या प्रौढ मनुष्यांच्या आवडीच्या गोष्टी पालटतात. आतां पाहा, रोगामुळें कोणी माणूस आपल्या खोलींत निजून राहिला, आणि बाहेर जायाचें नाहीं असें त्याला ठाऊक आहे. त्याला कदाचित असें वाटेल कीं, आदितवारीं घोड्यावर बसून फिरायाला जावसाची जी आपल्याला आवड होती ती अगदीं सोडून दिल्ही आहे, आणि त्याविषयीं आतां खरा कंटाळा आला असें देखील त्याला वाटत असेल. परंतु तो बरा झाल्यावर त्याचा कंटाळा हा पापाचा खरा पश्चात्ताप आहे किंवा नाहीं, हें दिसून येईल. अणखी जीं पुस्तकें आदितवारीं वाचूं नयेत तीं आपल्या खोलींत वाचून पहिल्याप्रमाणें शाबाथ मोडितो, तर मला खरा पश्चात्ताप झाला असें मनांत आणायाला तो कसा धजेल? जर एका पापाविषयीं खरा पश्चात्ताप होतो तर सगळ्या पापाविषयींहि पश्चात्ताप होईल, हें कधीं विसरूं नका, माझ्या मुलानो. तुह्मी देवाच्या सर्व आज्ञा पाळाव्या व सर्व पाप सोडावें ह्मणून जर नेहमी

यत्न व प्रार्थना करीत नाहीं, तर एक पाप सोडण्यामुळें त्याचा खरा पश्चात्ताप झाला, याविषयीं कांहींच प्रमाण नाहीं. जो पश्चात्ताप म्या आतां सांगितला तो एका प्रकारचा खोटा पश्चात्ताप आहे. लाहान व मोठे यांमध्यें हा फार आहे, हें तुह्मी विसरूं नये.

म०— आई म्या खोडी केल्यावर कधीं कधीं आपणावर फार रागें भरतों. मी किती मूर्ख व दुष्ट झालों, असें माझ्या विचारांत येतें. मजविषयीं तुला वाईट वाटतें त्यामुळें मला दुःख होतें तसें माझ्याविषयीं मला वाईट वाटून यावरूनहि दुःख होतें.

आ०— यावरून माझ्या मुला, मन आपल्या वाईटपणाविषयीं कसी साक्ष देतें हें समजावें. या भावनांला स्वदोषानुग्रह ह्मणतात. आपल्या मनाच्या साक्षीकडून तूं आपले दोष समजून घेतोस. जसें कोणी तुझे दोष जाणून तुझ्या पदरीं घालितो तसें तुझें मन तुझ्या पदरीं दोष घालितें.

म०— हा खरा पश्चात्ताप आहे कीं काय?

आ०— जेथें खरा पश्चात्ताप असतो तेथें स्वदोषानुग्रह आहेच. पण जेथें पश्चात्ताप नाहीं तेथेंहि कधीं कधीं आढळतो. जे पापांत घटले नाहींत ते जेव्हां मनाच्या साक्षीविरूद्ध करितात तेव्हां हा स्वदोषानुग्रह त्यांस फार होतो. याचें फळ खरा पश्चात्ताप असावा. कारण कीं पाप स्वतां पाप्याला खेदित करितें, आणि तेणेंकडून पापी आपणाला त्रास देतो असें होतें, तर यावरून पाप किती भयंकर आहे हें दिसतें. जे पश्चात्ताप केल्यावांचून मरतात आणि निराशेच्या स्थानांत टाकिले जातात ते आपणाला अतिशय दुःख देतील, हेंहि त्यावरून दिसतें. देवाचें नेमशास्त्र जें पाप्याला दोषी ठरवितें तें किती पवित्र व न्यायी व चांगलें आहे, हें त्यावरून दिसतें. बरें व वाईट याचा वास्तविक व मोठा भेद आहे ह्मणून तें नेमशास्त्र लाविलें होतें. हा भेद पाप्याच्याहि अनुभवास येतो. पापापासून सुटावें व देवासमोर पसंत पडावें ह्मणून पाप्याला किती उत्कंठित झालें पाहिजे, हें त्यावरून दिसतें, कारण कीं जर पापी मनुष्य

देखील आपलें पाप पाहून आपणावर इतका दोषारोप आणितो आणि आपल्या दिसण्यांत लाजतो, तर तो देवाच्या दिसण्यांत कसा आहे? देव जो परमपवित्र व निष्कलंक, ज्याच्या पाहण्यांत पाप फार ओंगळ आहे, त्याच्यासमोर तो कसा दिसेल? तथापि हा स्वदोषानुग्रह किती जरी कडू व दुःखयुक्त आहे, तरी खरा पश्चात्ताप झाल्याशिवाय कदाचित् हा होत असेल. यहूदा जो दुष्ट व अनुपकारी शिष्य ज्याने ख्रीस्ताला परस्वाधीन केलें, त्याच्या अनुभवास हा स्वदोषानुग्रह फार आला असेल, हें त्याच्या आचरणावरून दिसतें. आपल्या प्रभूला परस्वाधीन केलें याचा परिणाम काय झाला, ह्मणजे ख्रीस्त मरणदंडी ठरला हें पाहून त्याने पश्चात्ताप केला, आपण फार दुष्टाई केली हें त्याला वाटलें, आणि त्याविषयीं त्याला खेद झाला, आणि आपण ख्रीस्ताला परस्वाधीन केलें नसतें तर बरें होतें, असें त्याला वाटलें; तथापि हा पश्चात्ताप चांगल्या प्रकारचा नव्हता. मला अवकाश असता तर शास्त्रांत जे दोन प्रकारचे पश्चात्ताप सांगितले ते म्या तुह्माला सहज दाखविले असते. एक यहूद्याच्या सारिखा आहे, ह्मणजे पापाकडून लाज व देवाचा राग आहे असें समजून मन पालटल्यावांचून जो खेद होतो तो. पाप स्वतां वाईटच आहे ह्मणून त्याचा द्वेष किंवा देवावर प्रीति करणें किंवा त्याच्या आज्ञा मानणें हें त्या खेदांत कांहीं नाहीं. शास्त्रांत जो दुसऱ्या प्रकारचा पश्चात्ताप सांगितला आहे त्याविषयीं मी पुढें सांगेन. "यहूद्याने मुख्य याजक व वडील यांजवळ ते तीस रुपये परत देऊन ह्मटलें, निर्दोषी रक्त परस्वाधीन केल्याने म्या पाप केलें आहे. तेव्हां ते बोलले तें आह्मास काय? तूं जाण. मग तो ते रुपये देवळांत टाकून निघाला, आणि जाऊन गळफांस घेतला." पापाविषयीं स्वदोषानुग्रहाचें हें किती चांगलें उदाहरण आहे. तथापि यांत कांहीं खरा पश्चात्ताप नव्हता. खरा पश्चात्ताप असता तर यहूद्याने वेगळा स्वभाव दाखविला असता, आणि मूर्खासारिखा होऊन देवाची एक उघडी आज्ञा मोडून त्याने आपला जीव घेतला नसता; परंतु देवासमोर व मनुष्यांसमोर नम्र आचरण करण्यासाठीं

व येशू व त्याचा धर्म यांविरुद्ध जें केलें त्याचा परिहार करण्यासाठीं लागावें, असी इच्छा धरिली असती. माझ्या लेकरांनो, स्वदोषानुग्रह ह्याविषयीं आपण आतां बोललों हा खरा पश्चात्ताप आहे असें समजून फसण्याची मोठी जागा आहे. स्वदोषानुग्रहांत दुःख आहे, तें दुःख लागल्याने आपण बरें झालों, असें तुह्माला वाटत असेल. हें दुःख पापाचा दंड आहे, आणि हें सोसल्याने पाप गेलें आणि त्याची क्षमा झाली, असें तुह्माला वाटत असेल. परंतु हा स्वदोषानुग्रह खरा पश्चात्ताप नाहीं हें तुह्मी विसरूं नये. जे गुण नुस्त्या स्वदोषानुग्रहांत आहेत त्यांपेक्षां अणखीहि पाहिजेत. याविषयीं तुह्मी फसूं नका. खऱ्या पश्चात्तापाशिवाय जो स्वदोषानुग्रह त्याचें उदारण यहूद्याची गोष्ट आहे, हें उदारण ध्यानांत ठेवा.

संभाषण १०.

आ०— माझ्या मुलांनो, ही गोष्ट फार लांब आहे, असें तुह्माला वाटत असेल; पण तुह्मी कंटाळवाणे होऊं नका. हें तुह्माला विस्तारून सांगायाला कदाचित फिरून असा प्रसंग येणार नाहीं, कारण कीं आयुष्याचा भरवसा नाहीं; आणि मला खचीत वाटतें कीं, येशू ख्रीस्त जो तारणारा त्याची सर्वकाळीक कृपा कसी मिळेल हें तुह्माला दाखविणें यासारिखें मला अगत्याचें दुसरें काम नाहीं. त्याला शरण जावें आणि पश्चात्ताप करून त्यावर विश्वास ठेवावा, असा त्याची कृपा मिळण्याचा तुह्माला एकच उपाय आहे. तर खरा पश्चात्ताप काय आहे हें तुह्माला समजावें, आणि हें तुह्माला दाखविण्यासाठीं म्या प्रयत्न करावें, याचें कितो अगत्य आहे. अगे चिमणे, कालच्या दिवसीं तां रागारागानें नानाची गाडी मोडिली ह्मणून त्याबद्दल तूं आपलें सर्वांहून चांगलें पुस्तक त्याला दिल्हेंस, असें त्यानें मला सांगितलें.

चि०— मी त्याजवर रागें भरून त्याची गाडी मोडिली ह्मणून मला खेद झाला. पुस्तक म्या त्याला खुशीनें दिल्हें, आणि माझी क्षमा क-

रावो असें त्याजवळ मागितलें, हेंहि त्यानें तुझ्याजवळ सांगितलें कीं काय, आई ?

आ०— होय, सांगितलें. परंतु माझ्या मुली, जें वाईट त्वां केलें त्याची फेड करावी आणि क्षमा मागावी ही एक गोष्ट आहे; आणि वाईट केलें असतां चांगल्या हेतूनें खेद करावा हो दुसरी गोष्ट, या दोन गोष्टींमध्यें फार अंतर आहे.

चि०— जर बरें करितें तर हें कोणत्या हेतूनें केलें याची चिंता कशाला करावी, आई?

आ०— जर तुमचा हेतु चांगला नसला तर तुमचें करणें ईश्वराच्या दृष्टींत चांगलें होणारच नाहीं. आई मला शिक्षा करील असें भय धरिलेंस ह्मणूनच जर आपल्या भावाची गाडी रागानें मोडिल्याचा तुला खेद झाला, तर तुझा हेतु केवळ स्वार्थबुद्धीचा होता. तुझ्या मनाला पालट झाला आहे, किंवा माझ्या कळण्यांत येणार नाहीं असें समजलें असतां तूं रागानें फिरून असें करणार नाहींस, हें त्यावरून दिसत नाहीं. त्याप्रमाणें त्याची गाडी मोडिल्याची फेड करून आपलें मन शांत व्हावें अस्या हेतूनें जर पुस्तक देऊन क्षमा मागितली, तर हा हेतु केवळ स्वार्थबुद्धीचा होता. तुला असें वाटलें असेल कीं, या उपायानें मनाची खुरखूर नाहींसी होईल, आणि वाईट आचरणाचा विसर पडेल, आणि याविषयीं मला पुढें दुःख होणार नाहीं, कारण कीं म्या त्याची नुकसान केली त्यापेक्षां अधिक भरून दिल्हें. अणखी असें मनांत आलें असेल कीं, म्या फेड केली आणि क्षमा मागितली ह्मणून माझी आई मला शाबास ह्मणेल, आणि जें झालें तें विसरून जाईल, अशावरून आईचें धमकावणें व बोध करणें व आपल्या मनांतील खुरखूर हीं सर्व चुकतील, असें तुला वाटलें असेल. जर अस्या हेतूनें त्वां आपल्या भावाला पुस्तक देऊन त्याजवळ क्षमा मागितली, तर तुझे विचार व भावना यांत खरा पश्चात्ताप कांहींच दिसत नाहीं. माझ्या मुलांनो, पापाचा कांहींच पश्चात्ताप केल्यावांचून अस्या स्वार्थीक हेतूनो वाईट आचरणाची फेड करतां येईल, आणि देवा-

पासों सुटकाहि मागतां येईल. पापामुळें देवाचा जो राग तुह्मावर आहे तो असी फेड केल्याने व श्रम केल्याने व बाहेरून देवाच्या कांहीं आज्ञा पाळण्याने उतरेल, आणि आमचो फार करून शिक्षाहि चुकेल, असें तुह्माला वाटत असेल. देवाचा जो अपमान आपल्याकडून घडला त्याची देखील फेड करूं, असी आशा तुह्मी कदाचित् धराल; आणि जें फार आवडतें तें सोडिल्याने आणि जें करायाला बहुत दिवस व श्रम लागतात तें केल्याने आपण देवाचे जे अन्याय केले त्यांचे उतराई झालों, असें तुह्माला वाटत असेल. अस्या उपायाने आमचें मन शांत होईल, आणि आमच्या पापिष्ट आचरणामुळें पुढें आह्माला दुःख होणार नाहीं, असें तुह्माला वाटत असेल. पण जो पश्चात्ताप देवाला आवडतो तो हा नाहीं ह्याला कोणी कोणी तर पश्चात्ताप ह्मणतात; आणि देवाच्या आज्ञा मोडिल्या त्याची फेड कांहीं अवघड व त्रासीक कर्म केल्याने किंवा आपल्या आंगीं कांहीं दुःख सोसिल्याने होईल, असें देखील समजतात. असें कांहीं कर्म केल्याने पुण्य घडवून देवाची कृपा मिळेल, असें त्यांस वाटतें. माझ्या मुलानो, तुह्मी प्रौढ झाल्यावर वर सांगितलेल्या कल्पना व वासना आतांपेक्षां तुमच्या मनांत येण्या जोग्या आहेत. त्या खरा पश्चात्ताप आहेत असें वाटून फसण्याची मोठी जागा आहे. आतांहि माझ्या सेवेंत ह्या कुटुंबांतील अधिकारांत देखील तुह्माला अस्या कांहीं कल्पना व वासना आहेत. ज्या हेतूनें चिमणीने आपल्या भावाची फेड करून क्षमा मागितली, त्यावरून हें दिसतें, देवाची किंवा मनुष्यांची फेड करणें व क्षमा मागणें यांत तुमचे हेतु काय आहेत, यांकडे लक्ष्य द्या, माझ्या मुलानो. ते हेतू जर चांगले आहेत तर ते प्रीतीच्या योगानें होतील, आणि देवाची व मनुष्यांची प्रीति तुमच्या मनांत होईल. देव ज्ञानी व पवित्र व न्यायी व चांगला आहे, ह्मणून तुह्मी त्याला मानण्याची आवड धराल. आणि देव जो मनुष्यांला सुखी करावयास इच्छितो त्यासारिखे होऊन दुसऱ्यांचें बरें करावें, ह्मणून तुह्मी आवड धराल. देवाच्या आज्ञा मोडून किंवा दुसऱ्याचें वाईट करून जर

तुह्मी देवाविरुद्ध पाप केलें, तर वर सांगितलेल्या प्रीतीच्या योगानें तुह्मी त्या पापाचा पश्चात्ताप कराल. देवाजवळ क्षमा मागाल आणि मनुष्यांजवळहि क्षमा मागून शक्तीप्रमाणें फेड करून हा पश्चात्ताप दाखवाल. या गोष्टीवरून असें दिसतें कीं पवित्र आत्म्याकडून तुमचें मन पालटलें पाहिजे. देव व मनुष्य यांजवर प्रीति केल्यावांचून आपल्या पापाची फेड होण्याचे किती जरी उपाय केले तरी त्यांत कांहीं खरा पश्चात्ताप नाहीं. कोणतीं तरीं जीं सत्कर्मे झालीं आहेत तीं अश्या प्रीतीपासून नसलीं,तर त्यांत कांहीं खऱ्या पश्चात्तापाचें लक्षण नाहीं. या गोष्टीविषयीं करिंथकरांस पहिल्या पत्राच्या तेराव्या अध्यायांत प्रेषित जो पाऊलस त्यानें काय सांगितलें तें ऐका. "जर मी आपलीं सगळीं द्रव्यें दरिद्र्यांला पोसण्यास देतों, आणि मी जाळला जावा ह्मणून आपलें शरीर देतों परंतु जर मला प्रीति नाहीं, तर मला कांहीं लाभ होत नाहीं." ही प्रीति होण्यासाठीं तुमचें हृदय पवित्र आत्म्याकडून नवें उत्पन्न झालें पाहिजे.

म०—खरा पश्चात्ताप ह्मणजे काय हें आह्मांला केव्हां सांगसील, आई?

आ०—मी थोड्या वेळानें सांगेन. जो पश्चात्ताप खरा नाहीं त्याविषयीं म्या तुह्मांला विस्तारून सांगितलें आहे; येणेंकरून खरा पश्चात्ताप कोणता आहे हें तुह्मांला उघड दिसेल, असें वाटतें. कांहीं दिवसांपासून जें मी तुह्मांला विस्तारानें सांगत आलें आहें, तें हें संभाषण संपविल्या अगोदर संक्षेपानें फिरून सांगतें, ह्मणजे तुमच्या मनांत ठसेल, आणि जें मी तुह्मांला पुढें शिकविणार आहें तें समजावयाला तुह्मी तयार व्हाल. देवानें अपराध्यांस जो दंड सांगितला त्यामुळेंच जर तुह्मी आपल्या पापाचा खेद केला तर तुह्मांला पापाचा खरा पश्चात्ताप झाला नाहीं. जर देवानें पापामुळें दंड सांगितला नसता किंवा आपलें पाप देवाला कळणार नाहीं असें समजण्याची जागा असती, तर पाप करीत जावें असी जर तुमची बुद्धि आहे, तर यावरून असें दिसेल कीं पापाचा खरा पश्चात्ताप तुह्मांला झाला नाहीं. आपण देवाच्या दिसण्यांत दोषी आहों असें समजून त्याच्यासमोर पाप

कबूल केलें, तरी तुमच्या मनांत खरा पश्चात्ताप झाला असा नेम नाहीं. हें केवळ दंडाच्या भयामुळें झालें असेल. आह्मी कबूल झालों, आतां देवाचा जो राग आह्मावर आहे तो उतरेल आणि आमचा दंड कमी होईल किंवा चुकेल, असी आशा तुह्माला असेल. परंतु जर केवळ याच हेतूनें तुह्मा आपलें पाप देवासमोर कबूल करितां, तर यावरून तुह्माला खरा पश्चात्ताप झाला असें दिसत नाहीं. पाप सोडून देवावर प्रीति करूं व त्याच्या आज्ञा मानूं, असा जो दृढ निश्चय मात्र त्यापेक्षां खरा पश्चात्ताप वेगळा आहे. देव जो ज्ञानी व पवित्र व न्यायी व चांगला आहे, त्याविरूद्ध आह्मी पाप केलें, असें समजून जो मनापासून खेद होतो त्याकरून जर असा निश्चय झाला नाहीं, तर तो निश्चय कांहीं उपयोगी नाहीं. येशू ख्रीस्त आमचा एकच तारणारा असा मनापासून भरंवसा नाहीं, तर तो निश्चय कांहीं उपयोगी नाहीं. अणखी जर आपल्या शक्तीनें केला असला, तर उपयोगी नाहीं. तुमचा स्वभाव पालटावा व हा निश्चय पाळण्याची शक्ति यावी ह्मणून निश्चय करितांना येशू ख्रीस्ताच्या नावानें देवाजवळ पवित्र आत्मा मागितला पाहिजे. तुह्मी एका प्रकारें पाप करणें सोडिलें ह्मणून त्याचा खरा पश्चात्ताप झाला, असें तुह्माला कदाचित् वाटेल; परंतु जर दुसऱ्या प्रकारें तुह्मी पाप करीत जातां तर खरा पश्चात्ताप झालाच नाहीं. एका पापाचा त्रास आला त्याबद्दल दुसरें धरिलें इतकेंच यांत झालें. एका पापाविषयीं जर खरा पश्चात्ताप झाला तर सर्व पापांविषयीं होईल. सर्व पाप सोडण्यासाठीं व देवाच्या सर्व आज्ञा पाळण्यासाठीं जर नेहमी यत्न व प्रार्थना करीत नाहीं, तर एक पाप सोडल्यावरून त्याचा खरा पश्चात्ताप झाला, असें कांहीं दिसत नाहीं. खरा पश्चात्ताप झाल्यावांचून यहूद्यासारिखा मोठा व तीक्ष्ण स्वदोषानुग्रह तुह्माला होत असेल. तुह्मी देव व मनुष्यें यांपासीं क्षमा कदाचित् मागाल व दुसऱ्यांचे जे अन्याय तुह्मी केले त्यांची फेड कराल, आणि आमच्या सत्कर्मांनी आमचें मन शांत होईल, असीहि आशा कदाचित् धराल, तरी पापाचा खरा पश्चात्ताप केला याचें प्रमाण नाहीं.

संभाषण ११.

आ०—माझ्या मुलानो, खरा पश्चात्ताप काय आहे याचा पक्का विचार करायाला आपण आतां तयार आहों. आपण हा विचार करीत असतां तुह्मी हें ध्यानांत ठेवावें कीं, जे पापाचा खरा पश्चात्ताप करितात त्या सर्वांच्या कल्पना व भावना एकसारिख्याच किंवा एका क्रमाने होतात असें नाहीं. जे पापाचा खरा पश्चात्ताप करितात त्यांच्या कित्येक कल्पना व भावना मी तुह्माला उघडून सांगेन. हा पश्चात्ताप जेव्हां प्रथम त्यांच्या मनांत होतो तेव्हांच त्या सर्व कल्पना व भावना त्यांस होतात, असा नेम नाहीं. परंतु पुढें केव्हां तरी त्यांस त्या होतील, आणि उत्तरोत्तर वाढतील. कोणा कोणांस दुसऱ्यांपेक्षां ह्या कल्पना व भावना लवकर होतात, आणि जो क्रम मी सांगणार आहें त्याच क्रमाने होतात असेंहि नाहीं. कोणा कोणाला ह्या कल्पना व भावना उघड आणि दृढ होतात. अणखी कोणी कोणी आपल्या पापाचा पश्चात्ताप करितात, तेव्हां दुसऱ्यांपेक्षां परलोकीच्या दंडाचें भय त्यांस अधिक होतें. देवाच्या भयंकर क्रोधापासून, आणि परलोकीं जो क्लेश अपश्चात्ताप्यास भोगावा लागतो त्यापासून आपण मुक्त व्हावें असो उत्कंठा खरा पश्चात्ताप करणाऱ्यांमध्यें एखाद्याला फार होती. त्या उत्कंठेवरून त्यांचा पश्चात्ताप मनोभावाने झाला नाहीं, असें ह्मणवत नाहीं; कारण कीं असी उत्कंठा खऱ्या पश्चात्तापांत वेळोवेळ होती. आणि ज्या दुसऱ्या कल्पना व भावना मी सांगणार आहें त्यांत ही उत्कंठा मिसळली आहे.

कोणी आपल्या पापाचा पश्चात्ताप करितात त्या वेळेस त्यांस परलोकीच्या दंडाचें भय थोडेंच असतें, आणि कित्येकांस कांहींच नसतें; परंतु परलोकीं जें सुख त्याची त्यांस फार उत्कंठा असती. जगाकडून सुख होत नाहीं हें त्यांस ठाऊक आहे, आणि पापाचा पश्चात्ताप करून व येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून देवाला शरण जावें असें प्रीतीचें व दयेचें आमंत्रण आपणास आहे, आणि जो कोणी या मार्गाने येईल त्याला देव अंगीकारील आणि त्याला आपल्यासमोर सर्वकाळपर्यंत

परम सुखी करून ठेवील, असो त्याने धैर्ययुक्त वचनें दिल्हीं आहेत, हें त्यांस ठाऊक आहे.

परलोकीच्या सुखाची त्यांस इच्छा आहे ह्मणून त्यांचा पश्चात्ताप मनापासून नसेल, असें ह्मणवत नाहीं; कारण खऱ्या पश्चात्तापांत ही इच्छा अधिक उणी नेहमी असती, आणि ही दुसऱ्या कल्पना व भावना यांत मिसळली आहे. खरा पश्चात्ताप करणाऱ्याचें लक्ष परलोकीचा क्लेश चुकवावा किंवा परलोकीचें सुख मिळवावें याकडेच केवळ नसतें; तर आपल्या हितापेक्षां दुसऱ्या व भारी गोष्टीकडे त्याचें चित्त ओढलेलें असतें, आणि त्याविषयीं त्याची फार उत्कंठा असती. तो देवाकडे चित्त देऊन त्याविषयीं नवीन कल्पना करितो, असी कीं त्याने मला उत्पन्न केलें आणि तो मला वांचवितो आणि जें मला प्राप्त झालें तें सर्व त्यापासून मिळालें आहे, ह्मणून पूर्णपणाने देवाची प्रीति व सेवा करावी. असो प्रीति व सेवा न करून आपण वाईट केलें आणि असें करायाला आपणास कांहीं निमित्त नव्हतें, हें त्याच्या अनुभवास येतें. आपला दुष्टपणा व स्वार्थबुद्धि यामुळेंच आपण तसें केलें, हें त्याच्या अनुभवास येतें. आपल्या अंतःकरणांतील अभिमान व हट्ट यांत मोठा दोष आहे असें कबूल करून तो मनापासून मोठा खेद करितो. तो आपल्या स्वछंदाला जिंकून ईश्वराच्या इच्छेला मान्य होतो. जसें लेंकरूं शिक्षेच्या भयामुळें आपल्या बापाच्या इच्छेला मानितें तसें जबरीने नव्हे; परंतु खुशीने, पूर्णपणाने व हर्षाने देवाला मानावें असी इच्छा धरून तो झटतो, आणि यासाठीं येशूला शरण जाऊन साह्य मागतो. तो सर्व प्रकारें देवाच्या इच्छेला मान्य होतो. मला पवित्र करून आकाशाकडे नेण्यासाठीं देवाने आपल्या इच्छेप्रमाणें मला चालवावें असें तो कबूल आहे.

देवाने मजवर अतिशय दया केली, असें तो मानितो. माझ्या आकाशांतील बापापासून मला किती सुखें व उपकार मिळाले आहेत, असें तो मागल्या आयुष्याकडे दृष्टि लावून पाहतो. ज्यांवर हे उपकार थोडे किंवा अगदीं नाहींत असे किती असतील बरें?

त्यापेक्षां आपली अवस्था बरी व्हावी ह्मणून आपण योग्य नव्हतो असें त्यास वाटतें; आणि दुसऱ्यापेक्षां आपली अवस्था अधिक वाईट झाली नाहीं ह्मणून तो आश्चर्य करितो, कारण कीं कसें आचरण करावें हें जसें म्या जाणिलें तसें दुसऱ्या कित्येकांस ठाऊक नाहीं. देवाच्या ज्या उपकारांचा म्या थोडा उपयोग केला ते देवानें हिरून न घेतां व माझ्या पापांत मला मरूं न देतां माझें फार सहन केलें. आणखी वधस्तंभीं मरण्यासाठीं देवानें आपला प्रिय पुत्र पाठविला यासाठीं कीं जे कोणी त्याजवर विश्वास ठेवितात त्या सर्वांनी क्षमा व तारण पावावें, यांत देवानें मजवर व दुसऱ्या पाप्यांवर मोठी व चमत्कारिक प्रीति दाखविली. जो प्रिय व दयाळू तारणारा, जो पाप्यांचा मित्र व आश्रय, जो नरकवासापासून सोडविणारा व परिपूर्ण व सर्वशक्तिमान उद्धारणारा असा येशू त्याच्या ऐकण्यांत आला आहे. त्याला शरण जावें, त्याजवर विश्वास ठेवावा, त्याकडून तारण पावावें आणि आतांपासून सर्वकाळपर्यंत सुखी व्हावें, ह्मणून त्याला वेळोवेळ आमंत्रण व बोध व आग्रह झाला होता. देवाच्या या सर्व उपकाराविरुद्ध आणि ख्रीस्ताच्या या सर्व कृपेविरुद्ध म्या पाप केलें असें त्याला वाटतें. जसा आतां तसा अगोदर आपला दोष त्याला कधींहि वाटला नव्हता.

मी फार हट्टी व अनुपकारी पापी असा होतों, हें त्याच्या अनुभवास येतें. तो आपल्या अनुपकारीकपणाविषयीं खेद करितो आणि तें देवाजवळ कबूल करितो. जसें लेंकरूं आपल्या प्रिय बापाला रागाविलें असतां नम्रबुद्धीनें व खिन्न हृदयानें त्याकडे फिरायाला इच्छितें त्यासारिखा त्याचा अनुभव होतो. आणि आपल्या आकाशांतील बापानें दाखविलेल्या मार्गानें त्याकडे फिरतो. मी देवाकडे फिरत असतां जर येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवीत नाहीं ह्मणजे मी देवासमोर पसंत होण्यासाठीं येशूनें जें केलें व सोसिलें त्यावर मी पूर्ण भरवसा ठेवीत नाहीं तर देव मला अंगिकारणार नाहीं, असें त्याला ठाऊक आहे. तो त्याप्रमाणें येशूवर भरवसा ठेवितो, आणि तो फार दोषी आहे तरी ख्रीस्ता-

कडून देवाचीं जीं वचनें त्यांवर विश्वास ठेवितो, आणि त्याच्या दयेवर टेंकून मनांत आणितो कीं आतां तरी आपल्या पापाचा मोठा खेद व्हावा, कारण कीं माझ्या पापामुळें येशूला दुःख सोसून मरण पावण्याचें अगत्य पडलें. त्याला आपला दोष फार मोठा दिसतो. आपण किती वेळ येशूला नाकारीत व देवाची कृपा तुच्छ मानीत आलों, हें जेव्हां तो मनांत आणितो तेव्हां त्याचें अनुपकारीकपण त्याला फार वाईट दिसतें. त्यामुळें पश्चात्ताप व अश्रुपात, कण्हणें व मोठा आत्मशोक करणें यांचें योग्य कारण आहे, असें त्याला वाटतें.

खरा पश्चात्ताप करणारा देवावर लक्ष ठेवून त्याच्या आज्ञांविषयीं नवी भावना करितो. त्या देवासारिख्या पवित्र व न्यायी व चांगल्या आहेत, आणि देवानें अश्या आज्ञा कराव्या आणि जे प्राणी त्यानें उत्पन्न केले त्या सर्वांनी त्याचा मान व सेवा करावी हें योग्य व उत्तम आहे, असें तो पाहतो. त्या आज्ञा देऊन देवानें मोठे उपकार केले, आणि जर सर्व माणसें त्या पाळतील तर तीं सर्व प्रीतीचें एक मोठें कुटुंब असीं होतील, आणि तीं देवाची प्रीति व सेवा व एकमेकांवर प्रीति करून व एकमेकांस चांगले व सुखी पाहून आनंद करितील असें तो पाहतो. त्या आज्ञा न पाळितांना मी फार स्वार्थी व दुष्ट होतों, असें त्याच्या अनुभवास येतें. त्या अवघड आणि आपलें सुख व समाधान याला नेहमी आडव्या येतात, असें त्याला पहिल्यानें वाटलें होतें; परंतु आतां त्याच्या अनुभवास असें आलें कीं मला व दुसऱ्यासहि सुख होण्यासाठीं आणि परमार्थाच्या व शांतीच्या मार्गांत मला चालविण्यासाठीं जे उपाय पाहिजेत ते ह्या आज्ञा आहेत. त्या आज्ञा मोडिल्यानें मी न्यायेंकरून दोषी ठरलों. त्याचा दंड चुकविण्यासाठीं येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवावा, असी एकच आशा राहिली आहे, असें त्याच्या अनुभवास येतें. त्यानें देवाच्या आज्ञा अगोदर मोडिल्या होत्या ह्मणून तो खेद करितो, आणि त्याच्या मनापासून असी मोठी इच्छा आहे कीं यापुढें देवाची सर्व इच्छा

समजून ती खुशीनें व मान्यतेनें पाळावी. माझ्या लेंकरानो, खरा पश्चात्ताप काय आहे, याचा विचार उद्यां संध्याकाळीं अणखी करूं.

संभाषण १२.

म०— आई, काल जें आह्मास त्वां सांगितलें त्यावरून असें दिसतें कीं, जो खरा पश्चात्ताप करितो त्याच्या कल्पना व भावना यांचा फार पालट झाला पाहिजे.

आ०— खरें, माझ्या मुला; परंतु या पालटाविषयीं तुला अणखी सांगावयाचें आहे, त्यावरून तर तो पालट खचीत मोठा व आश्चर्यकारक असें तुला वाटेल.

खरा पश्चात्ताप करणारा पापाविषयीं नव्या कल्पना करितो तें फारसें वाईट नाहीं, असें त्याला पूर्वीं वाटलें होतें. तें हलकें आहे, असें त्याच्या मनांत आणि कदाचित् बोलण्यांतहि आलें होतें, किंवा दुष्ट लोकांच्या रीतीप्रमाणें त्याविषयीं त्यानें थट्टा देखील केली असेल; आणि कदाचित् जर त्याच्या मनांत विचार कधीं आला असला तरी तें पवित्र व न्यायी अस्या देवाविरूद्ध आहे असें नव्हे, परंतु पापामुळें जो दंड सांगितला तो आपणाला कदाचित् प्राप्त होईल अस्या प्रकारें त्याचा विचार होता. त्यानें आपणाला काय फळ प्राप्त होईल हेंच मात्र लक्षांत आणिलें. परंतु आतां त्याला पाप फार वेगळें दिसतें. तें देवाविरूद्ध ह्मणून फार वाईट आहे, असें तो समजतो. आपलीं सर्व पापें देवाविरूद्ध झालीं, असें त्याला वाटतें; कारण कीं देवावर व मनुष्यांवर प्रीति करावी अस्या ज्या दोन मोठ्या आज्ञा देवानें आह्मास लावून दिल्ह्या, आणि त्या नेहमी पाळाव्या ह्मणून आह्मी बांधलों आहों, असें असतांहि त्यानें त्यांचा भंग केला. म्या दुसऱ्यांचें वाईट केलें किंवा त्यांचें बरें करायाला झटलों नाहीं यांत मोठा दोष आहे खरें, तथापि म्या देवाविरूद्ध पाप केलें त्यांत जो माझा दोष

तो त्यापेक्षां फार मोठा आहे, असें त्याच्या अनुभवास येतें. जर सर्व माणसें माझ्यासारिखें देवाविरूद्ध पाप करीत जातील तर किती भयंकर अनर्थ, ह्मणजे देवाचा मोठा अपमान आणि सर्व प्राणिमात्रांमध्यें किती गोंधळ, गडबड व दुःख होईल, हें त्याच्या दिसण्यांत येतें. देवाच्या सत्तेला अडवावें आणि मनुष्यांस दुःख द्यावें असे जे अनर्थ ते घडविण्याचा स्वभाव मला आहे हें माझ्या पापावरून दिसतें, असा त्याला अनुभव होतो, यामुळें तो मोठ्या खेदानें व्याकुळ होतो, आणि आपलें पाप देवाविरूद्ध आहे ह्मणून तो खेद करितो. त्याच्या पापामुळें दुसऱ्यांला जो अपकार झाला त्याविषयीं तो रडतो. माझी चाल पाहून दुसऱ्यांला पाप करायाला संवड झाली, आणि कदाचित् सर्वकाळच्या नाशाकडे त्यांस न्यावयाला मी कारणहि झालों असें समजून तो अतिशय दुःखित होतो. या सर्व गोष्टींत त्याला पापाचा मोठा द्वेष आहे. पापामुळें जर कांहींच दंड सांगितला नसता तथापि पाप सर्वांहून वाईटच आहे असें समजून त्याचा द्वेष केला असता. त्याच्या मागील पापी भावना व वर्त्तणुकी यांचा त्याला कंटाळा आहे, आणि त्याची आठवण करून त्याला लाज होती, आणि त्याच्या मनाला खातें. पापानें मला कितो भ्रष्ट केलें, आणि देवाच्या प्राण्यांला मजकडून कांहींच उपयोग झाला नाहीं पण उलटा अपकार मात्र झाला, आणि भक्तिमान व पवित्र माणसांकडून सन्मान पावण्यास मी किती अयोग्य आहें, आणि माझ्यासारिखे जे भ्रष्ठ आणि निरूपयोगी आहेत त्यांच्याबरोबर सर्वकाळपर्यंत नरकांत वस्तों करायाला पाठविला जाण्यास मी किती योग्य, असा त्याचा अनुभव होतो.

तो दुसऱ्यांच्याहि पापाचा द्वेष करितो, आणि त्यांपासून त्यानो मोकळें व्हावें असें तो इच्छितो. ज्या समयीं माझ्यासारिखा सर्व लोक पापाचा द्वेष करितील, आणि मी व ते त्याला जिंकितील, आणि जसी आकाशांत तसी पृथ्वीवरहि देवाची इच्छा चालेल, असा समय येण्याची तो उत्कंठा धरितो. आपलें पाप झांकून ठेवावें असी खरा पश्चात्ताप करणाऱ्याची इच्छा नाहीं, परंतु मी किती दोषी

आहे हें समजून घ्यावयाला तो मान्य आहे. त्याच्या खोडी त्याला कोणी केवळ सांगाव्या या गोष्टीला तो अगोदर फार नाखुशी होता. परंतु आतां देवाविरुद्ध जे त्याचे लाहान व मोठेहि अपराध ते ऐकून घ्यावयाला तो तयार आहे. बोध व धमकावणें तो नम्रतेने ऐकतो. आपण कोणत्या प्रकारें चूक किंवा पाप केलें तें समजून घ्यावें आणि त्यामुळें रडावें, असी त्याची इच्छा आहे, आणि असें करायाला तो देवाजवळ शक्ति मागतो. तो देवाजवळ आपलीं पापें कबूल करितो, तो कांहींच झांकीत नाहीं. तो फुटक्या व चेंचलेल्या हृदयाने आणि फार नम्रतेने व खेदाने आपलीं पापें कबूल करितो. देव किती निष्पापी व पवित्र आहे हें तो जाणतो, आणि कबूल करितांना क्षमा व कृपा पावण्यासाठीं ख्रीस्ताकडून देवाची जी दया आहे तिजवर पूर्ण भरवसा ठेविला पाहिजे, असें त्याच्या अनुभवास येतें.

खरा पश्चात्ताप करणाऱ्यास दुसऱ्यांच्या सुखाविषयीं नव्या व पहिल्यापेक्षां फार वेगळ्या कल्पना होतात. पहिल्याने तो कदाचित आपल्या वर्त्तणुकींत कृपाळू व प्रीतिपात्र असा होता. तो कदाचित् साळसूद व न्यायी होता. कदाचित तो आपले मित्र व ओळखी यांस फार प्रिय होता; हा आह्मास समाधान व सुख करण्यास इच्छितो व यत्न करितो, असें कदाचित त्यांस वाटलें असेल. परंतु त्यांच्या वास्तविक सुखासाठीं म्या अगदीं थोडी चिंता केली असें त्याला आतां वाटतें. होय, त्यांची कांहींच चिंता केली नाहीं असें तो समजतो, कारण कीं केवळ त्यांच्या इहलोकीच्या सुखाविषयीं चिंता केली परंतु परलोकीं त्यांची पवित्रता व सुख याविषयीं कांहींच चिंता केली नाहीं. अणखी फारकरून आपल्या मित्रांचें मात्र समाधान व सुख याविषयीं चिंता केली, आणि तीहि तेणेंकरून आपल्यालाच सुख होईल असें समजून केली. जे आपले मित्र व ओळखीचे नाहींत त्यांचें बरें करण्यासाठीं आपलें कांहीं द्यावें, किंवा आपण थोडी बहुत अडचण सोसावी, असें त्याच्या भावनेंत किंवा वर्त्तणुकींत कांहींच दिसून आलें नाहीं.

मी या सर्व गोष्टींत किती स्वार्थी होतों. माझ्या वर्त्तणुकींत मला देवाचा व तारणाऱ्याचा व परलोकाचा किती विसर पडला, आणि देवावर प्रीति करून त्याच्या आज्ञा पाळण्या यांत जें वास्तविक सुख आहे तें दुसऱ्यास मिळावें ह्मणून यत्न करायाला मी अगदी निष्काळजी राहिलों, हें तो आतां पाहतो. दुसऱ्यांचें सुख, शरीराचें केवळ नव्हे परंतु आत्म्याचेंहि, इहलोकींचें असें केवळ नव्हे परंतु विशेषेंकरून परलोकींचें, तें शोधावयाला देवानें मला जगांत ठेविलें, असें तो जाणतो. तो येशूख्रीस्ताकडे लक्ष देतो. येशू लोकांचें कल्याण करायाला कसा फिरला, आणि तेणेंकरून त्यानें देवाची इच्छा कसी पाळिली, आह्मा सर्वांस आचरणाचा कित्ता दाखविला, हें तो मनांत आणितो. त्या कित्याप्रमाणें न आचरल्यामुळें मी दोषी झालों असें त्याच्या अनुभवास येतें, आणि त्याविषयीं तो फार खेद करितो. पूर्वी दुसऱ्यांस वास्तविक सुख मिळावें ह्मणून आपण कांहींच केलें नाहीं, परंतु केवळ आपल्याच हिताचा शोध करितांना वय घालविलें असें पाहून तो शोक करितो.

त्याच्या अनुभवास असें येतें कीं, त्या सर्व गोष्टींत दुसऱ्यांचें जें करायाचें होतें त्याविषयीं मी उणा होतों असें केवळ नव्हे, परंतु देवाविरुद्ध म्या पाप केलें, कारण कीं दुसऱ्यांचें बरें करण्यांत म्या आपलें आयुष्य खर्चावें ह्मणून देवानें मला वांचविलें. आणि दुसऱ्यांचें बरें करण्यासाठीं देवानें मला शक्ति व सामग्री दिल्ही आहे आणि त्याविषयीं मला आज्ञाहि दिल्ही आहे. आणि दुसऱ्यांचें बरें करणें हें आपल्यास सुख होण्याचा उत्तम उपाय आहे असी त्याच्या मनानें त्याला साक्ष दिल्ही. जे दुसऱ्यांचें बरें करीत होते त्यांस पाहून त्याला वेळोवेळ शिकवणूक झाली; आणि माझ्यापेक्षां त्यांची चाल किती चांगली व नामी व सुखदायक आहे, असें त्यानें पाहिलें. माझ्या मागल्या वासना व आचरण यांत स्वार्थबुद्धि, नीचपण, दुष्टपण व देवाविरुद्ध पाप हीं होतीं, असें त्याच्या अनुभवास येतें; आणि शक्तीप्रमाणें दुसऱ्यांचें बरें करण्यासाठीं यापुढें आपलें आयुष्य घालवावें, असें तो आपल्या सर्व मनानें इच्छितो. आपलें कुटुंब किंवा आपले

सोयरे व मित्र व ओळखी यांचें केवळ नव्हे, परंतु ज्या कोणालाहि आपला उपयोग पडेल त्या सर्वांचें बरें करावें, असें तो इच्छितो. जे त्याजवर कृपा करितात व त्याचें बरें करायाला इच्छितात त्यांचेंच केवळ नव्हे, परंतु त्याचे जे शत्रू असतील त्यांचेंहि, आणि ज्यांच्यानें त्याच्या कृपेची कधींहि फेड होणार नाहीं, आणि जे त्याचे उपकार मानणार नाहींत, आणि जे त्याच्या उपकाराबद्दल त्याला अपकार देखील करितील त्यांचेंहि बरें करावें, असें तो इच्छितो.

म०— आह्मा सर्वांच्या वासना अस्या असत्या तर आमचें कुटुंब फार सुखी असतें असें मला वाटतें, आई.

आ०— होय, तें खरेंच, माझ्या मुला; आणि सर्व मुलांच्या व आईबापांच्या वासना अस्या असत्या तर सर्व कुटुंबें सुखी असतीं; आणि सर्व लोकांच्या वासना अस्या झाल्या असत्या तर गांव, शहरें, देश व जग किती सुखी असतें. अरेरे, माझ्या प्रिय लेंकरानों; तुमच्या वासना अस्या झाल्या नाहींत. तुमचें मागील वय थोडें कां असेना, तरी त्याजकडे लक्ष लावा. तुमच्या रोजच्या वहिवाटीचें कोणतें प्रयोजन होतें, तें पाहा. काय प्राप्त होण्यासाठीं तुह्मी झटलां? तुह्मी सकाळीं उठतांच आज अमुक करावयाचें ह्मणून मनांत आणीत होतां, तें काय? आणि तें कशासाठीं करावें ह्मणून मनांत आणिलें? दिवस लोटत असतां हें करण्याचें किंवा तें करण्याचें तुह्मी कांहीं उपाय योजिले होते, आणि ते उपाय सिद्धीस नेण्यासाठीं दुसऱ्यांचें साह्य मिळविलें असेल. आणि उद्यांसाठीं किंवा पुढल्या वर्षासाठीं तुह्मी उपाय योजिले असतील. ते उपाय सिद्धीस नेण्यासाठीं तुह्मी आपला जीव लाविला असेल; आणि ते सिद्धीस आले ह्मणजे आह्माला फार सुख प्राप्त होईल असी वाट पाहिली असेल. तुमचे उपाय चालले नसतील, तेव्हां तुह्मी फार निराश झालां असाल. तर या सर्व गोष्टींत तुमच्या कल्पना व भावना व बोलणें व करणें हें कशासाठीं? आपल्यासाठीं किंवा दुसऱ्यासाठीं? आपल्याच सुखासाठीं किंवा दुसऱ्यांच्याहि सुखासाठीं? जर तुह्मी प्रत्येक मनापासून या प्रश्नांचें उत्तर द्याल तर तुह्माला असें वाटेल कीं, आमची स्वा-

थंबुद्धी व पाप याचा पश्चात्ताप केला पाहिजे; आणि पवित्र आत्म्याच्या साह्याने आह्मी देवाची व येशूची प्रीति करावी आणि दुसऱ्यांवर प्रीति करून शक्तीप्रमाणें बरें करायाची आह्माला इच्छा असावी ह्मणून आ-ह्मास ख्रीस्ताला शरण गेलेंच पाहिजे.

संभाषण १३.

आ०— माझ्या मुलांनो, दुसऱ्यांस वास्तविक सुख होण्यासाठीं आपण झटलों नाहीं यावरून खरा पश्चात्ताप करणाऱ्याला किती खेद होतो, हें कालच्या संभाषणाच्या शेवटीं तुह्माला दाखविलें. दुसऱ्यांस ग्या किती अपकार केले हेंहि तो ध्यानांत आणितो. जेणेंकरून दुसरीं माणसें देवाची उपेक्षा व अपमान करतील आणि तारणाऱ्याला नाकारितील आणि पापमार्गांत चालत जातील अश्या गोष्टी त्याने त्यांच्या देखतां सांगितल्या व केल्या असतील. त्याने त्यांसीं कपट करून त्यांला ठक-विलें असेल; नाहींतर जसें आपणासीं दुसऱ्यानी वर्त्तावें ह्मणून त्याने इच्छिलें तसें तो दुसऱ्यासीं वर्त्तला नसेल. त्याने परक्याचा माल फुकट घेतला असेल, कदाचित् चोरला असेल, किंवा जें उसनें घेतलें तें योग्य वेळेस परत दिल्हें नसेल. त्याने बुद्धिपूर्वक किंवा निष्काळजी होऊन दुसऱ्यांच्या मालाची नुकसान केली असेल. तो कपटाने किं-वा कारणावांचून किंवा आपली स्वार्थी व दुष्ट वासना तृप्त होण्यासाठीं दुसऱ्यांविषयीं वाईट बोलला असेल. दुसऱ्यांविषयीं वाईट बोलला अ-सेल. दुसऱ्यासीं वहिवाट करण्यांत निर्दय होऊन रागाने किंवा दांड-गाईने किंवा अभिमान व तिरस्कार यांकडून त्यांसी वर्त्तला असेल. तो आपले आईबाप व शिक्षक व वडील यांसीं योग्य रीतीने वर्त्तला नसेल. त्याने त्यांस मानिलें नसेल, आणि कदाचित् अपमान देखील केला अ-सेल. त्याने त्यांच्या आज्ञा मोडून त्यांस फार उपद्रव दिल्हा अ-सेल. या सर्व वर्त्तणुकींविषयीं आणि दुसऱ्या प्रकारेंहि जेणेंकरून दुसऱ्यांचें वाईट केलें त्याविषयीं तो गंभीरपणाने विचार करितो.

या प्रकारें मी किती दोषी झालों असें तो पाहतो. त्याच्या

अनुभवास असें येतें कीं, म्या मनुष्याविरूद्ध असें केवळ नव्हे परंतु देवाविरूद्ध पाप केलें, कारण कीं देवाने असी आज्ञा दिल्ही कीं जसी आपणावर तसी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर, आणि जसें दुसऱ्यानी आपणासीं वर्त्तावें ह्मणून तूं इच्छितोस तसें त्यां दुसऱ्यांसीं वर्त्तावें, तो देवासमोर नम्र होऊन आपलें पाप पदरीं घेतो, आणि त्याचा खेद करितो. आतांपासून असें करूं नये परंतु दुसऱ्याचें सुख, माल, अब्रू, व इच्छा, हीं म्या आपल्यासारिखीं मानावीं, ह्मणून तो प्रार्थना करितो. परंतु इतक्यानेच आपण कृतार्थ झालों, असें तो ह्मणत नाहीं. तर ज्यांस अपकार केला त्याविषयीं आपण काय करावें, हें समजण्यासाठीं प्रार्थना करितो, आणि जे ज्ञानी व भक्तिमान आहेत त्यांचा सल्ला घेतो. दुसऱ्यांचे जे अन्याय केले ते कबूल करावे ह्मणून जेव्हां त्याला समजतें तेव्हां तो ताबडतोब जाऊन मोकळ्या मनाने व पूर्णपणें कबूल करितो, आणि नम्रतेने क्षमा मागतो, आणि तसेंच तो शक्तीप्रमाणें फेड करण्याची काळजी करितो. दुसऱ्यांचा माल व वदीम याची जर त्याने नुकसान केली तर तो भरून देतो. जर दुसऱ्यांची अब्रु घेतली असेल, तर हें कारणवांचून घडलें आणि त्याविषयीं मला खरा खेद झाला आहे, असें दुसऱ्यांदेखता कबूल करायाला तो संधि पाहतो. आपलें दुष्ट आचरण व बोध यांकडून दुसऱ्यांच्या जीवाची जी हानी झाली असेल ती टळावी, ह्मणून तो काळजी करितो. त्यांबरोबरच्या मागल्या वहिवाटींत आपल्यापासून जी चूक व पाप घडलें असेल तें कबूल करायाला तो त्यांची सोबत धरून संधि पाहत असतो, आणि त्यान पापाचा कंटाळा करून देवाकडे फिरावें आणि तारणाऱ्यावर भरंवसा ठेवून त्याच्या सेवेंत लागावें, ह्मणून तो त्यांस आग्रह करितो.

माझ्या लेंकरानो, खऱ्या पश्चात्तापाच्या या लक्षणाविषयीं तुह्मी चित्त लावून विचार करावा आणि खरा पश्चात्ताप करणाऱ्याच्य

ड्या भावना व जीं कार्यें म्या आतां तुह्मास सांगितलीं तीं तुह्माला झालीं पाहिजेत, हें तुह्मी समजावें असी माझी इच्छा आहे. तुह्मी प्रत्येकाने आपलें आचरण आणि ओढ यांकडून आपल्या भावाला किंवा बहिणीला किंवा दुसऱ्या कोणत्या लेंकराला वाईट वासना धरायाला किंवा वाईट काम करायाला वळविलें कीं नाहीं? अस्या बहुत उदाहरणांची तुह्माला आठवण होईल कीं नाहीं? जसें दुसऱ्या लेंकरानी तुह्मासीं करावें ह्मणून तुह्मी इच्छितां त्याप्रमाणेंच तुह्मी आपल्या लाहानस्या देवघेवींत त्यांसीं केलें कीं काय? ठकविण्यासारिखें कांहीं तुह्मी कधीं केलें नाहीं कीं काय? न पुसतां दुसऱ्यांचा माल घेऊन तुह्मी खर्चिला किंवा ठेविला किंवा हरविला असें कधीं झालें नाहीं कीं काय? बुद्धिपूर्वक किंवा निष्काळजी होऊन दुसऱ्यांच्या मालाची नुकसान करूं नये ह्मणून तुह्मी सावध राहिलां कीं काय? तुह्मी दुसऱ्यांविषयीं नेहमी यथायोग्य बोललां कीं काय? दुसऱ्यांविषयीं तुह्मी लबाड बोललां किंवा त्यांची चाल अधिक वाईट करून दाखविली अस्या उदाहरणांची तुह्माला आठवण आहे कीं नाहीं? तुह्मी आपल्या बोलण्यांत किंवा वहिवाटींत दुसऱ्यांसीं वारंवार निर्दय झालां कीं नाहीं? आणि तुह्मी कधीं कधीं रागें भरलां किंवा मारामारी देखील केली कीं नाहीं? तुह्मी आपले आईबाप व शिक्षक किंवा वडील, ज्यांचें तुह्मी मानून ऐकावें ह्मणून योग्य आहे, त्यांजकडे तुह्मी वांकड्या दृष्टीने कितीदां पाहिलें आणि अयोग्यतेने कितीदां बोललां व वर्त्तलां आणि तेणेंकरूच त्यांस किती दुःख व उपद्रव दिल्हा असेल, हें मनांत आणा. या सर्व गोष्टी तर देवाविरूद्ध पापें आहेत. जसजसे तुह्मी त्यांविषयीं दोषी आहां तसतसा त्यांचा पश्चात्ताप करावा, आणि ख्रीस्ताच्या नावाने देवासमोर क्षमा मागावी. अणखी ज्यांचें तुह्मी वाईट केलें त्यांजवळहि क्षमा मागितली पाहिजे आणि त्यांचे जे अपराध तुह्मी केले त्यांची फेड शक्तीप्रमाणें केली पाहिजे. हें सर्व मनांत ठेवा, माझ्या मुलानो, आणि तेणेंकरून खरा पश्चात्ताप ही किती मोठी व भारी गोष्ट आहे हें समजा.

खरा पश्चात्ताप करणाऱ्याचें अणखी एक नेहमीचें लक्षण आहे. जसीं बोलण्यांत व आचरणांत पापें आहेत तसीं कल्पना व वासना यांतहि पापें आहेत, असें तो पाहतो. अणखी जें अगोदर त्याला फारकरून सुचलें नव्हतें तें त्याला अढळतें, ह्मणजे माझ्या बोलण्यांत व आचरणांत जे माझे गुण दिसतात त्यांखेरीज देवाच्या दिसण्यांत फार अधिक आहेत. देवाचे नेम अंतःकरणासंबंधी आहेत, ह्मणून कल्पना व वासना नीट असाव्या हेंच त्यांचें तात्पर्य आहे, असें तो पाहतो. दुसऱ्यांला ज्या न कळाव्या ह्मणून तो इच्छितो, आणि आपल्या सख्या मित्राला देखील सांगायाला लाजतो, अस्या दुष्ट कल्पना व वासना आपल्याला किती झाल्या, हें तो पाहतो. बोलण्यांत व करण्यांत ज्या प्रगट करायाला धैर्य होत नाहीं, आणि ज्यांविषयीं त्याच्या मनानें त्याला धमकाविलें, अस्या त्याला किती कल्पना व वासना झाल्या याची तो आठवण करितो. त्याच्या दुसऱ्या कल्पना व वासना ह्मणजे गर्व, पोकळ प्रतिष्ठा, हेवा, क्रोध, कुरकूर, असमाधान इत्यादि अस्या आहेत. त्या उत्पन्न झाल्या तेव्हां त्यांविषयीं त्याला विशेष चिंता नव्हती. परंतु त्या पापरूप होत्या, असें तो आतां पाहतो. अस्या दुष्ट कल्पना व वासना बाळगून आपण वाईट करायाला अधिक सिद्ध होतों, आणि माझ्या सर्व कल्पना व वासना नीट झाल्या तर माझें बोलणें व करणें हींहि नीट होतील, कसें तो पाहतो. देव परम पवित्र व निष्पापी आहे, यास्तव अपवित्र कल्पना व वासना याचा त्याला मोठा तिरस्कार येईल; तर माझा तिरस्कार केवढा व कितीदा झाला असावा, असें तो समजतो. असी आठवण करून तो नम्र व फार खिन्न होतो. ज्या वेळेस मजविषयीं दुसऱ्यांला बरें वाटलें त्या वेळेस देखील मी देवाच्या दिसण्यांत किती दोषी होतों, हें त्याच्या अनुभवास येतें. त्याच्या गुप्त कल्पना, वासना, उद्देश, इच्छा, भय, आशा, व मनाच्या सर्व प्रवृत्ति यामध्यें त्याचा पश्चात्ताप संचरतो. अंतःकरण शुद्ध व्हावें ह्मणून तो उत्कंठा धरितो, तो पवित्र आत्मा मागतो यासाठीं कीं आपल्या सर्व कल्पना व वासना यांस

संचारण व्हावें आणि आपणाला शक्ति व साह्य मिळावें, असें कीं आपण सर्व पाप मनापासून घालवावें आणि देवाला ज्या अप्रिय आहेत किंवा मनुष्यांमध्यें प्रगट करण्याचें भय वाटतें अस्या कांहींच कल्पना व वासना मनांत न याव्या.

मनांतील आणि आचरणांतील असीं कित्येक संवयीचीं पापें आहेत हें खरा पश्चात्ताप करणाऱ्याला समजतें. माझ्या मुलांनो, तुमची गोष्ट तसीच आहे, हें तुह्माला ठाऊक आहे. जें आतां केलें पाहिजे ह्मणून मी नानाला सांगतें त्याची टाळाटाळ करायाला तो खेळानें सहज वळविला जातो, आणि त्यामुळें त्याला किती धमकावावें लागतें हें तुह्माला ठाऊक आहे. आणि चिमणीची मोठी खोड असी आहे कीं, दुसऱ्यांचें उणें काढावें; महादूची असी कीं, आपण कुटुंबाचा धनी आहों असा आव दाखवून निर्दयपणानें आणि डौलानें आपला भाऊ व बहीण यांजला हुकूम करावा. प्रौढ मनुष्यांसहि संवयीचीं पापें आहेत. जों जों तुह्मी वाढतां तों तों ही गोष्ट तुह्माविषयीं खरी आहे असें तुह्माला दिसेल. जर तुह्मी अस्या पापांचा खरा पश्चात्ताप केला तर त्यांस अगदीं जिंकावें हें मोठें काम आहे, आणि हें करण्यासाठीं पवित्र आत्म्याचें साह्य देवाजवळ नेहमी मागितलें पाहिजे, असें तुह्माला समजेल. खरा पश्चात्ताप करणारा आपल्या संवयीच्या पापांमुळें देवाजवळ नम्र होतो. तो फार खेद करून तीं कबूल करितो. जसीं तीं आतां दिसतात तसीं अगोदर कधीं दिसलीं नाहींत, ह्मणून तो आश्चर्य करितो. असलीं सर्व पापें आपणाला प्रगट व्हावीं, आणि तीं देवाविरूद्ध आहेत आणि त्यांकडून आपलें व दुसऱ्यांचें अनहित होतें असें अनुभवास यावें, ह्मणून तो प्रार्थना करितो. ख्रीस्तावर विश्वास ठेवून आणि पवित्र आत्म्याचें साह्य नेहमी व मनोभावानें मागून, तो हीं पापें देवाच्या शक्तीनें जिंकूं लागतो. खरा पश्चात्ताप झाल्यावर जेव्हां असलीं पापें करण्याची प्रवृत्ति होती तेव्हांपासूनच तो हें काम करूं लागतो. तीं पापें कल्पनेंतील किंवा बोलण्यांतील किंवा आचरणांतील असलीं

तरी तो असें करितो. ही इच्छा व प्रार्थना, आणि संवयीचीं पापें जिंकायाला प्रयत्न यांवांचून खरा पश्चात्ताप व्हावयाचा नाहीं.

म्या आतां सांगितलें तें लक्षांत ठेवा, माझ्या लेंकरानो, आणि कधींहि विसरूं नका. मला खरा पश्चात्ताप झाला असें वाटतें, म्हणून नाना मला सांगेल, तथापि आपला खेळ कितीहि प्रिय व मोहक असेल. तो लागलाच सोडून माझ्या आज्ञा पाळायाला झटत नाहीं, असें जर त्याच्या आचरणावरून दिसतें, तर त्याला खऱ्या पश्चात्तापाचा अनुभव कांहींच झाला नाहीं, असें दिसेल. आणि माझ्या पापाचा खरा पश्चात्ताप झाला असें जर चिमणी मला सांगेल, परंतु दुसऱ्यांचें उणें काढण्याची आपली खोड पहिल्याप्रमाणें दाखवीत जाईल, तर तिची केवढी चूक दिसून येईल. आणि मला खरा पश्चात्ताप झाला असें जर महादूला वाटेल, परंतु पहिल्यासारिखेंच निर्दयपणानें व डौलानें आपल्या बहिणींस व भावांस हुकूम करीत जाईल, तर खरा पश्चात्ताप काय आहे तो त्याच्या अनुभवास आला नाहीं, हें निःसंशय दिसेल संवयीचीं पापें जिंकावयाला उत्कंठा व प्रार्थना व यत्न हीं खऱ्या पश्चात्तापाचीं नेहमीचीं फळें आहेत. आणि त्यांस जिंकण्याकडून तो पश्चात्ताप दिसून येईल, कारण कीं तीं जिंकायाला देव कृपा करून पश्चात्ताप्यांस निश्चयें शक्ति देईल.

संभाषण. १४.

आ०— माझ्या लेंकरानो, खरा पश्चात्ताप करणारा आपलीं संवयीचीं पापें जिंकितो, त्याविषयीं मागल्या संभाषणांत जें म्या सांगितलें त्याशिवाय तुह्मी दुसऱ्या एका मोठ्या गोष्टीची आठवण करावी, असी माझी इच्छा आहे. सर्व पाप सोडावें आणि अंतःकरणाची व वर्त्तणुकीची पूर्ण सुधारणूक करायाला आतांच आरंभ करावा, असा निश्चय खरा पश्चात्ताप करणारा देवाच्या शक्तीनें करितो, हें खऱ्या पश्चात्तापाचें चांगलें व अचूक प्रमाण आहे. खरा प-

श्चात्ताप करणारा, मी केवढा पापी आहें, ह्मणून समजतो, आणि त्यामुळें तो देवासमोर किती नम्र होतो आणि आपल्या दोषाविषयीं तो किती खेद करितो हें तुह्मी पाहिलें. त्याला पश्चात्ताप हो-ण्याच्या वेळेपर्यंत त्याचें पाप वाढत आलें, त्याच्या कल्पना त्याच्या भावना त्याचें बोलणें त्याचें आचरण, हीं सर्व पापयुक्त होतीं, तीं पापें वहिवाटीनें किती बळावलीं. पश्चात्ताप फार दृढ आणि म-नापासून झाला, तर तेणेंकरून एका दिवसांत एका घटकेंत ए-का क्षणांत तें सर्व नाहींसें होईल काय? अरेरे असें होणार नाहीं, हें खरा पश्चात्ताप करणाऱ्याला लौकर कळतें. त्याला मोठें कार्य करायाचें आहे ह्मणजे मोठा शत्रू जिंकला पाहिजे, आणि मरणा-पर्यंत पापाविरूद्ध झटलें पाहिजे. तो देवाजवळ पवित्र आत्म्याचें साह्य मागून लौकर झटूं लागतो. तो मनोभावानें शास्त्र वाचून आणि आपल्या मनाची परीक्षा करून उजेडाचा शोध करितो. तो जीव लावून मेहनतीनें सुधारणुकीच्या कामांत शिरतो, आणि त्याची सुधारणूक चालू झाली असें सर्वांच्या लक्षांत येतें. ती इतकी स्पष्ट आणि आश्चर्ययुक्त आहे कीं, ती त्यांपासून झांकलेली राहत नाहीं. त्याच्या भावना त्याचें बोलणें त्याची वर्त्तणूक यां-चा मोठा पालट झाला, हें त्याच्या कुटुंबाला आणि त्याच्या शेजा-ऱ्याला उघड दिसतें. त्याच्या भावना व वर्त्तणुकी यांमध्यें पूर्वी जो स्वार्थ, गर्व, निर्दयपण, दोष दृष्टि, अकस, खुनस, जबरदस्ती, अन्याय, छटपणा, हलकेपण, या सर्वांविषयीं त्याला खचीत खेद झाला, असें तो वेगळ्या वासना व वर्त्तणुकी केल्यानें दाखवितो. तो दिव-सानुदिवस अधिक परोपकारी व नम्र व सर्वांसीं कृपाळू असा होतो. साधेल तितकी दुसऱ्याविषयीं चांगली कल्पना काढितो. दुसऱ्याचें वाईट उघडकीस आणावयाचें अगत्य न पडल्यास तें उघ-डकीस न आणावें ह्मणून फार संभाळितो. वाईट करण्यापेक्षां वाईट सोसून घ्यावें हें त्याला बरें वाटतें. जे त्याचें वाईट करितात त्यांची तो क्षमा करितो, आणि त्यांचें बरें करायाला झटतो. तो आपल्या देण्याघेण्यांत कोणासीं अन्याय करीत नाहीं. तो आपल्या सर्व वहिवाटींत कोणाला भुलथाप देत नाहीं. जसें आपणासीं दुस-

त्यानें वर्त्तावें ह्मणून तो इच्छितो तसा तो दुसऱ्यासीं वर्त्ततो. एखाद्या गोष्टींत त्याकडून कधीं कधीं अधिक उणी चूक घडती, परंतु तिजमुळें तो पश्चात्ताप करितो आणि पुढें आपल्यापासून असें घडूं नये ह्मणून झटतो. ख्रीस्तावर जो त्याचा विश्वास आहे त्याकडून त्याला साह्य होतें. त्याच्या वासना व आचरण यांमध्यें जी सर्व प्रकारें सुधारणूक ती वर्षोंवर्षीं महिन्या महिन्यांत रोज रोज अधिक उघड दिसती. त्याच्या पश्चात्तापाविषयीं त्याची सुधारणूक प्रमाण आहे. खरा पश्चात्ताप झाल्यावर जर कोणी जगेल आणि आपली सुधारणूक दाखवायाला संधि सांपडेल तर ती दिसण्यांत येईलच येईल. अस्या पश्चात्तापाशिवाय दुसरा जो पश्चात्ताप दिसतो तो कपटी व खोटा आहे.

माझ्या लेंकरानो, जर मला तुह्मांतील कोणी सांगेल कीं, मला आपल्या पापाचा खरा पश्चात्ताप झाला असें वाटतें, तर या गोष्टीचें प्रमाण पटावें ह्मणून मी तुमच्या सर्व वासना व वर्त्तणुका यांच्या सुधारणुकीकडे पाहीन. तुह्मी दिवसंदिवस अधिक कृपाळू व ममताळू व उदार होतां, आणि दुसऱ्यांस चांगले व सुखी करायाला अधिक चिंता करितां, आणि त्यांसाठीं आपलें सुख व समाधान सोडायाला अधिक खुशी आहां, असें जर माझ्या दिसण्यांत येत नाहीं; आणि माझ्या आज्ञा पाळायाला दिवसंदिवस अधिक मान्य आहां आणि शक्तीप्रमाणें मला संतोषित करायाला आणि कुटुंबाचा बंदोबस्त करण्यांत मला साह्य करायाला तुह्मी अधिक इच्छा धरितां असें जर माझ्या दिसण्यांत येत नाहीं; आणि तुह्मी दिवसंदिवस दुसऱ्या सर्वांसीं अधिक उपकारिक असून कांहीं प्रकारें जसी आपणावर तसी त्यांवर प्रीति करितां असें जर माझ्या दिसण्यांत येत नाहीं; तर तुह्मी आपल्या पापाचा पश्चात्ताप केला असा मला कांहींच भरंवसा येणार नाहीं. आह्मी आमच्या पापाचा मोठा खेद केला आणि तें देवाजवळ कबूल करून क्षमा मागितली आणि योग्य रीतीनें चालावयाचा निश्चय केला, याविषयीं तुह्मी मला कितीहि सांगितलें तरी त्या

सर्वांवरून तुह्माला खरा पश्चात्ताप झाला असें नव्हे, परंतु तुमच्या मनाला दहशत आहे इतकेंच मला समजेल. खरा पश्चात्ताप झाला हें समजायाला जो नेम मी आतां सांगितला तोच येशूख्रीस्तानें सांगितला, ह्मणजे त्यांच्या फळांवरून तुह्मी त्यांस ओळखाल. झाड कसें आहे हें त्याच्या फळांवरून तुह्मी समजतां. जर फळ वाईट आहे, तर झाड वाईट आहे, जर फळ चांगलें आहे तर झाड चांगलें आहे, असें तुह्मी ह्मणतां. अंतःकरणांत आणि बोलण्यांत आणि आचरणांत खऱ्या पश्चात्तापाचें चांगलें फळ झालें पाहिजे. जसें मोठ्या गोष्टींत तसें लाहान गोष्टींतहि ह्मणजे तुमच्या रोजच्या सर्व वहिवाटींत झालें पाहिजे. जसें तुमच्या प्रार्थनेंत आणि देवाची सेवा करायाला तुमचे जे प्रयत्न त्यांत व ख्रीस्ताचें राज्य जगामध्यें वाढवायाला जे तुमचे प्रयत्न त्यांत तसें कुटुंबांत आणि प्रपंचांत झालें पाहिजे.

पश्चात्ताप खरा किंवा खोटा हें समजावयाचें तुह्माला ज्ञान व्हावें ह्मणून अणखी कांहीं गोष्ट सांगावयाची आहे. खरा पश्चात्ताप करणाऱ्याला जगण्याचें एक नवें प्रयोजन उत्पन्न झालें आहे, असें कीं आपल्याकडून सर्वांनी सुमार्गांत यावें. या कारणासाठींच ख्रीस्त जगांत आला, आणि हें कार्य सिद्धीस नेल्यानें देवाचें गौरव होईल आणि सर्व माणसें सुखीं होतील, असें तो जाणतो. आणि असेंहि जाणतो कीं जर धर्मशास्त्र सर्व लोकांस दिल्हें जाईल आणि जर ते प्रीति करून मानितील, तर हें जग आतांपेक्षां फार वेगळें होईल, ह्मणजे ज्याचा धनी ख्रीस्त आहे अस्या बहीण भावंडाचें एक मोठें कुटुंब, ज्यांत सर्व ख्रीस्ताला अनुसरून मानितील आणि एकमेकांस चांगले व सुखी करायास झटतील, असें होईल. हें त्याच्या लक्षांत आणि अनुवास पूर्वीं कधीं आलें नव्हतें, ह्मणून तो आश्चर्य व खेद करितो. तो ख्रिस्ती लोकांमध्यें राहिला होता आणि जगांत ख्रीस्ताचें राज्य चालावें ह्मणून त्यानी जें केलें तें त्यानें थोडें बहुत जाणिलें होतें, त्या चांगल्या व मोठ्या कामांत ज्या अनेक मंडळ्या सादर आहेत त्यांविषयीं त्याला ठाऊक होतें, ध-

मांची वृद्धि झाली लोकांच्या अंतःकरणांत पवित्र आत्मा घातला गेला आणि पश्चात्ताप करायाला व ख्रीस्तावर विश्वास ठेवायाला पापी माणसें ओढलीं गेलीं, असें त्यानें ऐकिलें होतें. मिशनेरी लोक दुसऱ्या देशांत काय करितात आणि मूर्त्तिपूजक आपल्या मूर्त्ति व खोटे धर्म सोडून खऱ्या देवाची भक्ति कशी करितात आणि तारणाऱ्यावर विश्वास कसा ठेवितात, हें त्यानें कदाचित् वाचिलें होतें. हीं चांगलीं मोठालीं व गौरवयुक्त कार्यें मला कांहीं आवडलीं नव्हतीं ह्मणून माझें अंतःकरण कितो स्वार्थी व पापिष्ट होतें, हें आतां लक्षांत येऊन त्याच्या अनुभवास येतें. मनुष्यांचें सार्थक व सर्वकाळचें कल्याण यासाठीं त्यानें कांहींच चिंता केली नव्हती, असी आपली स्वार्थबुद्धि व निष्काळजी यांविषयीं तो खेद करितो. आपण मोठा दोषी असें तो देवाजवळ कबूल करितो. तो आतां सावध होऊन प्रार्थना करायाला व येशूची सेवा करायाला आरंभ करितो. लोकांचें बरें करायाला व ख्रीस्ताचें राज्य जगांमध्यें चालवायाला ज्या परोपकारिक अनेक मंडळ्या स्थापिल्या आहेत त्यांस तो शक्तीप्रमाणें उदारपणें पैसा देतो. त्या मंडळ्यांचें साह्य करायाला स्वतांहि खपतो, आणि त्यांजवर देवाचा आशीर्वाद असावा ह्मणून आग्रहानें नित्य प्रार्थना करितो.

अणखी पाप्यांस ख्रीस्ताकडे वळवावें, ह्मणून तो आपल्या कुटुंबांत शेजाऱ्यांत व मित्रांत आणि आपल्या गांवामध्येंहि झटतो. तारण पावण्यासाठीं काय केलें पाहिजे यांविषयीं त्यांसीं बोलण्याची आणि पश्चात्ताप करायाला व येशूवर विश्वास ठेवण्याला त्यांस आग्रह करण्याची तो संधि पाहत असतो. देवानें त्यांस आपला पवित्र आत्मा द्यावा आणि आपली प्रीति व सेवा करायाला त्यांस ओढावें ह्मणून तो रोजरोज त्यांची आठवण करून विनंती करितो, आणि दुसऱ्यांच्या अंतःकरणांत ख्रीस्ताचें राज्य चालवें ह्मणून तो दुसरा एक उपाय ह्मणजे आपलें चांगलें आचरण याकडूनहि झटतो. आपल्याला ख्रीस्ताचा स्वभाव आहे आणि रोजची वहिवाट व प्रपंच अस्या लाहान गोष्टींत दुसऱ्यासीं कृपाळू व उदार असून

आपण त्याचें बरें करायाला इच्छितों, असें दाखवायाला तो झटतो. आपण सर्व वहिवाटींत मनाचा मोकळा निष्कपट व यथार्थ असावें, ह्मणून तो मोठी काळजी करितो. दुसऱ्यांला ठकावें यापेक्षां दुसऱ्याकडून ठकलें जावें हें त्याला बरें वाटतें. आणि जसें आपणासीं दुसऱ्यानी वर्त्तावें ह्मणून आपण इच्छितों तसें तो मनापासून दुसऱ्यासीं वर्त्तता. गरीबांचें साह्य करायाला रोग्यांचा समाचार घ्यावयाला अनाथांची मैत्री करायाला आणि दुसऱ्यांचें इहलोकीं समाधान व सुधारणूक व पापविरहित सुखहि वाढवायाला तो तयार आहे.

जर अंतःकरणांत व आचरणांत पश्चात्तापाचीं असीं फळें थोडीं बहुत होत नाहींत तर तो पश्चात्ताप खऱ्या प्रकारचा नाहींच. प्रसंगानुसार बरें करावें आणि ख्रीस्ताच्या शुभवर्त्तमानाकडून जें कल्याण त्याची लोकामध्यें वृद्धि व्हावी असी इच्छा खरा पश्चात्ताप करणाऱ्यामध्यें दिसून येईलच येईल, दिवसानुदिवस ती इच्छा अधिक दिसून येईल, आणि याप्रकारें तो ख्रीस्तासारिखा होत जाईल. ख्रीस्तानें पृथ्वीवर असतां मनुष्यांचें दैहिक आणि आत्मिक कल्याण करण्यानें देवाची इच्छा पाळावी ह्मणून सर्व गोष्टींचा त्याग केला.

आणि माझ्या प्रिय लेंकरानो, तुह्माला जर आपल्या पापाचा खरा पश्चात्ताप झाला तर हीच इच्छा तुमच्या मनांत होईल. ख्रीस्ताचें राज्य सर्व जगांमध्यें चालावें ह्मणून तुमची इच्छा व प्रार्थना होईल, आणि जें करायाचें तें तुह्माला जसजसें कळूं येईल आणि करायाला जसजसी सामग्री मिळेल तसतसें तुह्मी कराल. दुसऱ्यांचें बरें करायाला तुह्मी झटाल, तेणेंकरून तुह्माला ख्रीस्ताचा स्वभाव आहे असें त्यांस समजेल. आणि तुमच्या वर्त्तणुकीवरून ते तारणाऱ्यावर विश्वास ठेवायाला आणि त्याची प्रीति व सेवा करायाला ओढले जातील.

मला पापाचा पश्चात्ताप झाला असें तुह्मांतील कोणी मला सांगेल, तथापि आमच्या कुटुंबांत देवाचें राज्य चालण्याची तो कांहीं चिंता धरीत नाहीं असें जर माझ्या दितण्यांत येईल, तर तो फार

फसला असें मला समजेल. ज्याला आपल्या पापाविषयीं मोठा खेद झाला आणि आपणाला तारणारा सांपडला आहे ह्मणून जो विशेषेंकरून देवाचे उपकार मानितो, असा जो खरा पश्चात्ताप करणारा तो आपल्या भावांच्या व बहिणींच्या व मित्रांच्या तारणाविषयीं कांहीं काळजी धरणार नाहीं आणि त्यांस ख्रीस्ताकडे नेण्यासाठीं प्रार्थना व त्यांसीं संभाषण करणार नाहीं, हें किती असंभाव्य आहे हो गोष्ट ध्यानांत ठेवा, माझ्या लेंकरानो, आणि तेणेंकरून खरा पश्चात्ताप काय आहे हें तुह्मी पक्कें समजावें.

संभाषण १५

आ०— आतां आमच्या विचाराची समाप्ती जवळ आली, माझ्या मुलानो. तुह्मी इतकें चित्त लाविलें हें पाहून मला आनंद झाला आहे. अणखी थोडा वेळ मजकडे चित्त लावा.

म०— सर्व आयुष्यभर पश्चात्ताप करीत गेलें पाहिजे, असें तुझ्या सर्व सांगण्यावरून मला दिसतें, आई.

आ०— जो कोणी आपल्या पापाचा खरा पश्चात्ताप करूं लागतो तो आपलें कांहीं पाप राही तोंपर्यंत करीत जाईल, कां कीं पश्चात्ताप करण्याचें जें कारण तें शेवटपर्यंत आहेच. जे देवाला प्रीतीनें मानितात व जे मानीत नाहींत त्या दोघांचें पाप एकसारिखेंच देवाला कंटाळवाणें आहे, आणि जसें मोठ्या गोष्टींत तसें लाहान गोष्टींतहि. पश्चात्ताप एकाएकीं किंवा थोड्या वेळानें घडेल, आणि आपल्या पापाचा खेद एकवेळ पूर्णपणें झाल्यावर फिरून त्याविषयीं खेद कधीं करण्याची गरज नाहीं, असें कोणाकोणाला वाटतें हें दिसतें. ही केवढी चूक आहे हें तुह्माला समजेल, माझ्या लेंकरानो. जर तुह्मांतील कोणीएकानें काल माझी आज्ञा मोडिली आणि त्याविषयीं त्याला खरा खेद झाला आणि तो माझ्याजवळ क्षमा मागतो, तर आज फिरून माझ्या आज्ञा मोडिल्यास त्याला खेद करणें व क्षमा मागणें याची गरज नाहीं कीं काय? होय

होय, खरा पश्चात्ताप करणारा, आपल्याकडून पाप घडल्यास, विशेषेंकरून आपल्या पापाविषयीं खेद करायाला तयार आहे, कारण कीं पाप किती वाईट आहे हें तो जाणतो. आपण मोहित होऊन देवाचे उपकार व दया यांविरुद्ध पाप केलें, असें जेव्हां तो समजतो, तेव्हां देवाची व तारणाऱ्याची जी आश्चर्ययुक्त प्रीति ह्मणजे आपल्या मागील पापाची क्षमा करण्यांत जो दया देवानें ख्रीस्ताकडून आपणाला दाखविली, तिजवरून त्याला मोठा खेद होतो.

आपण पापांत पडण्याच्या केवढ्या संकटांत आहों हेंहि त्याच्या अनुभवास येतें, हें तर खऱ्या पश्चात्ताप्याचें दुसरें लक्षण आहे. देवानें मला सोडून दिल्हें असतें तर मी वारंवार अधिक पाप करीत चाललों असतों. मी पाप करायाला घटून सर्वकाळाच्या नाशापर्यंत गेलों असतों, असें खरा पश्चात्ताप करणारा समजतो. माझे दोष व संकटें समजायाला पवित्र आत्म्यानें माझे डोळे ह्मणजे माझ्या मनाचे डोळे उघडिले, आणि ह्या देवाकडे फिरून आपल्या पापाचा पश्चात्ताप करावा आणि प्रभु येशूख्रीस्तावर विश्वास ठेवावा ह्मणून त्याच आत्म्यानें मला मोठें पराक्रम व प्रेरणा यांकडून न वळविलें, असें तो जाणतो. आपण खऱ्या तारणाऱ्याचा विश्वासू भक्त असतां जें योग्य तें करायाला त्याच आत्म्याचें साह्य व शक्ति पाहिजे, असें त्याच्या अनुभवास येतें. सर्व पाप आणि सर्व मोह जिंकायाला आपल्याला झटलें पाहिजे, तथापि आपली शक्ति कमी आहे असें त्याच्या अनुभवास येतें. तरी तो पाऊलसाप्रमाणें ह्मणतो कीं ख्रीस्तानें मला बळाविल्यावरून मी अवघ्यांस शक्तिमान आहें. हें ईश्वरी साह्य तो नेहमी मागतो. देव माझा आश्रय आहे असा त्याचा अनुभव आहे, आणि असें असतां जेव्हां आपणामध्यें शक्ति आहे असें समजून देव आपला आश्रय आहे याचा त्याला विसर पडूं लागतो, त्याच वेळेस मोहाचें फार प्राबल्य आहे आणि मला पापांत पडण्याचें सर्वांहून मोठें संकट आहे, असें त्याला वाटतें. त्या गोष्टीवरून त्याला शाहाणपण येतें

आणि तो दिवसंदिवस आग्रहानें अखंड प्रार्थना करितो, यासाठीं कीं आपल्या मनांतील सर्व पवित्र कल्पना व वासना व इच्छा व मनोदय यांत आपण देवाच्या आत्म्याकडून शक्तीनें बळाविलें जावें. अणखी तो आपल्या सर्व संकटांत व मोहांत देवाचीं वचनें आठवितो, तीं असीं कीं जे ईश्वरावर आशा ठेवितात ते आपली शक्ति नवी करितील. भिऊं नको, कारण कीं मी तुजपासीं आहें. उदास होऊं नको, कां तर मी तुझा देव आहें, मी तुला बळावीन, होय तुझे साह्य करीन, होय मी आपल्या सात्विकपणाच्या उजव्या हातानें तुला उद्धरीन.

खऱ्या पश्चात्तापाचें अणखी एकच अचूक लक्षण सांगावयाचें आहे, असें कीं पापाची क्षमा होण्यासाठीं व देवासमोर पसंत पडण्यासाठीं ख्रीस्तानें जें केलें व सोसिलें त्याजवर पूर्ण भरवसा ठेवणें. मागल्या पापाची फेड आपल्या पश्चात्तापाकडून देवाजवळ करवत नाहीं, असें खरा पश्चात्ताप करणाऱ्याच्या अनुभवास येतें. क्षमा तर देवाच्या कृपेशिवाय व्हावयाची नाहीं, असें त्याला ठाऊक आहे. आपण क्षमा पावण्यास पात्र आहों, किंवा पश्चात्ताप केल्यानें क्षमा पावण्यास कांहीं योग्य केलें, असें समजून त्याच्यानें क्षमा मागवत नाहीं. कारण कीं देवापासून जरी कांहींच उपकार न मिळाला किंवा जरी आपल्या पापाबदल जो दंड देवानें सांगितला तो पूर्ण भोगावयाचा असेल, तरी त्याला पश्चात्ताप केलाच पाहिजे. कोणी चोरी किंवा घात असें फार वाईट कर्म केल्यावर अस्या अपराधाचा जो दंड कायद्यांत सांगितला तो सोसिला तरी त्यावरून त्याला पश्चात्ताप केला पाहिजे कीं नाहीं? माझ्या मुलानो, तुह्मी वाईट केलें असतां जरी तुह्माला त्याचा खेद झाला ह्मणून वाटलें, आणि मी असें फिरून कधींहि करणार नाहीं असें तुह्मी वचन दिल्हें, तरी तुह्माला कधीं कधीं शिक्षा करावी लागली, हें तुह्माला ठाऊक आहे. तुह्माला खेद झाला, ह्मणून तुह्माला शिक्षा न करावी हें योग्य असें नाहीं किंवा तुह्माला शिक्षा केली ह्मणून मजकडून कांहीं वाईट किंवा अन्याय घडला असें-

हि नाहीं. तुह्माला खेद झाला असतांहि म्या दंड केला येणेंकडून मी निर्दय झालें असें देखील नाहीं. तुह्माला खेद झाला आणि पुढें बरें करूं ह्मणून तुह्मी वचन दिल्हें, तथापि कुटुंबाचें बरें व्हावें ह्मणून तुह्माला शिक्षा केलीच पाहिजे, असें माझ्या दिसण्यांत आलें असेल. जर म्या तुमची कधीं क्षमा केली असेल तर ती तुह्मावर दया झाली असें समजा. तुह्माला खेद झाला ह्मणून तुह्मी क्षमा मागायाला अधिकारी झालां किंवा मागायाला योग्यच आहां असें नाहीं.

देवाकडून पापाची क्षमा होणें हें कृपेचेंच कार्य आहे. ही कृपा त्यानें पाप्याला जरी कधीं दाखविली नसली तरी आह्मास कुरकूर करायाला जागा नाहीं. तुह्मी वाईट केल्यावर मी तुह्माला शिक्षा करितें तर तुह्मास कुरकूर करायाला जागा नाहीं. कुटुंबाच्या कल्याणासाठीं शिक्षा केली पाहिजे, असें माझ्या लक्षांत आलें असेल. जे देवाच्या आज्ञा मोडितात त्या सर्वांस क्षमा व दया दाखविल्यावांचून शिक्षा करावी, हें त्यानें उत्पन्न केलेल्या प्राण्यांचा सर्व समुदाय ह्मणजे त्याचें मोठें कुटुंब याच्या कल्याणासाठीं केलें पाहिजे, असा जर त्याचा संकेत असला तर तो अन्यायी किंवा निर्दय आहे असी कुरकूर करायाला आह्मास जागा नाहीं. परंतु देवानें आपला न्याय आणि सत्ता हीं स्थीर राखून आह्मा पाप्यांवर दयाहि करावी असा उपाय त्यानें योजिला, तो असा कीं त्याचा पुत्र येशू खीस्त वधस्तंभीं मरण पावला. त्याच्या मरणामुळें देवाला आमच्या पापाची क्षमा करवती. हें तो धर्मशास्त्रांत आह्मास सांगतो, आणि असें सांगतो कीं, आह्मी जर त्याच्या वचनावर विश्वास ठेवितों आणि आपल्या पापाविषयीं खरा खेद पावून येशू खीस्त आमचा एकच तारणारा असा त्यावर विश्वास ठेवितों, तर तो आमची क्षमा करील. अणखी याच उपायानें देव दया करील, असें तो आह्मास खचीत सांगतो. हें सांगायाला देवाला मोठें कारण आहे, ह्मणजे त्याचें ज्ञान, न्याय, पवित्रता व चांगलेंपण यांमुळें देवानें ह्याच उपायानें आह्मावर दया करावी दुसऱ्या उपायानें करूं नये, याचें अगत्य आहे. तर ही गोष्ट आह्मा-

ला समजलो आणि तारण पावण्यासाठीं प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवावा ह्मणून देवानें आह्मास आज्ञा दिल्ही, असें असतां माझ्या लेंकरांनो, ख्रीस्त आमचा एकच तारणारा असा विश्वास ठेविल्यावांचून तुमच्यानें आपल्या पापाचा खरा पश्चात्ताप करवणार नाहीं, हें तुह्मी समजावें. या गोष्टीविषयीं जर तुह्मी देवाच्या आज्ञा मानीत नाहीं आणि त्याच्या अंकित होत नाहीं, तर जेणेंकरून तुह्मी देवाच्या आज्ञा मोडिल्या आणि त्याची सत्ता अडविली अश्या दुसऱ्या कार्यांचा तुह्मी खरा पश्चात्ताप कसा कराल?

ह्या ही गोष्ट विस्तारून सांगितली आहे, यासाठीं कीं ती तुमच्या मनांत ठसून कधींहि विसरली जाऊं नये कीं, आपल्या पापाची क्षमा होण्यासाठीं व देवासमोर पसंत पडण्यासाठीं ख्रीस्तावर पूर्ण विश्वास ठेविल्यावांचून आपल्या पापाचा खरा पश्चात्ताप तुमच्यानें करवत नाहीं. जो खरा पश्चात्ताप करणारा तो असा भरवसा ख्रीस्तावर नेहमी ठेवितो. पापाचें वाईटपण समजल्यावरून असाच तारणारा पाहिजे असें त्याला दिसतें, आणि अश्या तारणाऱ्याच्या मरणाकडून पाप किती वाईट आहे हेंहि दिसतें. अश्या तारणाऱ्याचें किती अगत्य आहे हें आपल्या दोषाच्या अनुभवावरून त्याला दिसतें, आणि त्या तारणाऱ्याच्या मरणावरून आपले दोष किती मोठे हेंहि त्याला दिसतें. तो त्या तारणाऱ्याला अव्हेरून त्याजवर विश्वास ठेवायाला अगदी अमान्य होता हें त्याचें सर्वांहून मोठें पाप आहे आणि त्यावरून त्याच्या मनांतील गर्व व हेंकडपण उघड दिसतें. या पापाचा पश्चात्ताप केल्यावांचून खऱ्या पश्चात्तापाचा थोडा तरी अनुभव त्याला कसा होईल? आणि ज्या तारणाऱ्याला इतकेवेळ अव्हेरिलें त्याला शरण जाऊन आपल्या संपूर्ण हृदयानें त्याजवर विश्वास ठेविल्यावांचून तो या पापाचा पश्चात्ताप कसा करील? त्यावर तो असा भरवसा ठेवितोच. देवाच्या आज्ञा मानण्याचा व सत्तेंत राहण्याचा व त्यावर प्रीति करण्याचा जो स्वभाव त्याच्या पश्चात्तापावरून दिसतो

तोच स्वभाव तारणाऱ्यावर विश्वास ठेविल्यावरून दिसतो. पश्चात्ताप आणि विश्वास हे बरोबर राहतात. जसजसा एक दृढ होतो तसा दुसराहि होईल जो कोणी पापाचा त्याग करून देवाची प्रीति करितो व त्याची आज्ञा पाळितो त्याच्या अंतःकरणांत ते दोघे एकत्र राहतात. पापाच्या खऱ्या खेदावरून तो ख्रीस्ताला शरण गेला, तो त्या तारणाऱ्याला यासाठीं शरण गेला कीं, तेणेंकरून आपली जी देवावर प्रीति व त्याच्या सत्तेला मानणें हें दाखवावें. तो त्या तारणाऱ्याला यासाठीं शरण गेला कीं, तेणेंकरून असल्या मोठ्या दयेचे उपकार आपण मानितो हें दाखवावें आणि त्या तारणाऱ्याला यासाठींहि शरण गेला कीं, तेणेंकरून आपल्या पापाची क्षमा पावून त्यापासून सुटकाहि मिळवावी, आपल्या राहिलेल्या पापाच्या अस्याच खेदावरून खरा पश्चात्ताप करणारा ख्रीस्ताला नेहमी शरण जातो, कारण तो जाणतो कीं, या आयुष्यांतलें कर्त्तव्य व संकट व परीक्षेचे प्रसंग यांतून पार पडण्यासाठीं जें ईश्वरी साह्य पाहिजे तें केवळ ख्रीस्तामुळें आणि ख्रीस्ताकडून मिळवायाचें आहे. ख्रीस्तानें त्याला बळाविल्यावरून तो अवघ्यांस शक्तिमान आहे. तो देवाची भक्ति करूं लागला तेव्हांपासून त्यानें ख्रीस्तावर विश्वास ठेविला, आणि आकाशाकडील सर्व मार्गांमध्यें तो ख्रीस्ताच्याबरोबर राहतो. त्याला आशा आहे कीं, मरणकाळीं मला शांति होईल, कारण कीं ख्रीस्त माझ्याबरोबर राहील. आणि पुढें आपल्या सर्व भक्तांसाठीं जागा सिद्ध करायाला जेथें तो गेला अस्या पवित्र व सुखी लोकांमध्यें त्या तारणाऱ्याची समक्षता व प्रीति भोगावी, असी त्याची आशा आहे.

संभाषण १६.

आ०—माझ्या प्रिय लेंकरानो, आलीकडे जीं तुमचीं माझीं संभाषणें झालीं त्यांत, खरा पश्चात्ताप काय आहे, हें तुह्माला उघडून सांगायाला मला चांगली संधि सांपडली, ह्मणून मी देवाचे उपकार

गानितें. इतकी लांब एखादी मौजेची गोष्ट ऐकिली असती तर आह्मांला फार अधिक गोड लागली असती असें तुमच्या मनांत आलें असेल, परंतु याच गोष्टीनें तुह्मी संतुष्ट व्हाल असी माझी आशा आहे. तरुणांस व लेंकरांस मौजेच्या पुष्कळ गोष्टी असल्या, आणि विशेषेंकरून त्यांच्या हातांत मौजेचीं पुष्कळ पुस्तकें दिल्हीं असलीं, तरी ज्या गोष्टी वजनदार व समजायाला दीर्घ विचार केला पाहिजे अस्या गोष्टींकडेहि त्यांचें लक्ष लागू करण्याचें अगत्य आहे. विचार करणें आणि कधीं कधीं फार खोल विचार करणें, यावांचून तुमच्या मनाची सुधारणूक व्हावयाची नाहीं आणि तुह्मांला उपयोगी विद्या मिळावयाची नाहीं. ज्यांत देवाच्या कांहीं गोष्टी आहेत अस्या नुस्त्या कथा वाचून तुह्मांला ईश्वरी ज्ञान होणार नाहीं. ईश्वरी ज्ञान शिकण्यासाठीं चित्त देऊन दीर्घ विचार करायाला व त्याचें मनन करायाला व तें समजून घेण्यासाठीं यत्न करायाला तुह्मास मान्य झालें पाहिजे. पश्चात्तापाच्या गोष्टींविषयीं तुह्मासीं इतकें बोलण्याचीं असीं कांहीं कारणें आहेत. ही गोष्ट जो उघडून सांगायाला लागेल त्याला फार एकाग्रतेनें विचार केला पाहिजे. आणि जे शिकतात त्यांसहि फार चित्त देऊन बारीक विचार केला पाहिजे, हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल असें मला वाटतें. माझे श्रम व तुमचें चित्त देणें निष्फळ होणार नाहीं, असी माझी आशा आहे. तुमच्या बुद्धीला व अंतःकरणाला देवापासून पवित्र आत्म्याची प्रेरणा झाल्यावांचून माझ्या शिकविण्याचा तुह्मांला कांहीं उपयोग होणार नाहीं, असें मला ठाऊकच आहे. म्या तुह्मांला जें शिकविलें त्याचा तुह्मांला उपयोग व्हावा, ह्मणजे तुह्मी आपल्या पापाचा खरा पश्चात्ताप करून प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवावा, ह्मणून देवानें तुह्मा सर्वांला पवित्र आत्मा द्यावा, असी माझी देवाजवळ विनंती आहे.

म०—आई, काल आह्मी सर्व लेंकरें बैठकीच्या खोलींत एकत्र होतों तेव्हां नानानें मला विचारिलें कीं, पश्चात्ताप करावयास माणसाला किती वेळ लागतो? मी त्याला ह्मटलें, मला ठाऊक नाहीं; चिमणी बोलली, ज्या कल्पना व वासना आईनें आह्मास सांगि-

तल्या त्या सर्व अनुभवास यावयाला फार वेळ लागेल, असें वाटतें. मलाहि तसेंच वाटलें. त्याविषयीं आह्मा सर्वांला कांहीं संशय होता ह्मणून आज संध्याकाळीं आईला विचारूं, असा आमचा ठराव झाला.

आ०— हा प्रश्न मला करावा असें तुमच्या मनांत आलें, ह्मणून मला संतोष झाला, माझ्या मुलांनो, याचें उत्तर द्यावयाला मी यत्न करीन. खरा पश्चात्ताप काय आहे, हें अनुभव घेऊन समजण्यासाठीं ज्या कल्पना व वासना ज्या तुह्मास सांगितल्या त्या सर्वच तुह्माला झाल्या पाहिजेत, असें माझें मत नाहीं. परंतु देवाविषयीं व ख्रीस्ताविषयीं योग्य भावना झाल्या पाहिजेत, आणि तुह्माला जर असी मनाची प्रवृत्ति झाली तर तेणेंकरून सांगितलेल्या सर्व कल्पना व वासना तुह्माला केव्हां तरी होतील. जर तुह्मी जगाल आणि आपलें कर्त्तव्य काय आहे हें समजण्यासाठीं योग्य रीतीनें विचार कराल, तर होतील. परंतु धर्मशास्त्राचें मनन करणें आणि उपदेश ऐकायाला जाणें आणि चांगलीं पुस्तकें वाचणें आणि ज्ञानी व भक्तिमान मनुष्यांसीं संभाषण करणें आणि आपलें अंतःकरण व आचरण यांची झडती घेणें, आणि आपणास शिकविण्यासाठीं व वळविण्यासाठीं पवित्र आत्मा देवापासीं मागणें, हे सर्व उपाय जर तुह्मी मनोभावानें करीत नाहीं, तर खरा पश्चात्ताप काय आहे हें आपण अनुभव घेऊन कधीं जाणिलें, याविषयीं तुह्माला संशय धरण्याचें तें मोठें कारण होईल. मागील संभाषणांत ज्या कल्पना व भावना तुह्मास सांगितल्या, त्या कधीं तरी तुह्माला झाल्याशिवाय, तुह्मी आपल्या पापाचा पश्चात्ताप केला व येशू ख्रीस्तावर विश्वास ठेविला, असें तुह्मी समजूं नये. ज्या क्रमानें ह्या कल्पना व भावना ज्या सांगितल्या त्याच क्रमानें तुह्माला कदाचित् होणार नाहींत. त्याच परिमाणानें किंवा त्याच उघडपणानें व दृढतेनें कदाचित् तुह्माला होणार नाहींत. आणि तुह्मी मोहित होऊन पापांत पडल्यावरून कधीं कधीं तुह्माला त्या कदाचित् अगदींच होणार नाहींत. परंतु त्या कोणत्या आहेत हें समजण्या पुरत्या त्या तुमच्या अनुभवास येतील. आणि तस्या क-

ल्पना व भावना मनांत धरिल्यानें तुह्मी उत्तरोत्तर ख्रीस्तासारिखे व्हाल असें तुमच्या लक्षांत येईल. जों जों तुह्मी वाढतां तों तों तुह्माला त्या अधिक होत जातील, आणि असें जर होत नाहीं तर खरा पश्चात्ताप काय आहे, हें अनुभवावरून तुह्मी कधींच कांहीं समजलां नाहीं हें खचीत वाटेल.

ना०—तूं जें आतां सांगितलेंस तें सर्व मला समजलें असें वाटतें, आई. परंतु पश्चात्ताप करायाला माणसाला किती वेळ लागतो, हें तूं आह्मास सांगितलें नाहीं.

आ०—थोडा दमधर, माझ्या मुला. या प्रश्नाचें उत्तर द्यावयाला मी तयारी करीत होतें, आणि आतांच उत्तर द्यावयाला मी यत्न करीन. नाना, तूं काल सकाळीं चिमणीपासून पुस्तक हिसकून घेतलेंस, तेव्हां तुला किती राग आला, याची तुला आठवण आहे कीं काय?

ना०—आहे, आई, आणि त्याचा मला खेद झाला, असें वाटतें.

चि०—इतका राग त्याला आला, असें म्या अगोदर कधीं पाहिलें नाहीं. तो मला कदाचित् मारील, असें मला वाटूं लागलें.

आ०—त्या पुस्तकाला हात लावूंच नको, असें प्रथम जेव्हां म्या सांगितलें तेव्हां त्वां माझें ऐकिलें कीं काय, नाना?

ना०—ठाऊक नाहीं, आई.

म०—ऐकिलें नाहीं, असें मला वाटतें. त्याला इतका राग होता आणि पुस्तक असें जोरानें हिसकीत होता कीं त्यानें ऐकिलें नाहीं, असें दिसून आलें.

ना०—परंतु थोड्या वेळानें ऐकूं लागलों, आई. तथापि तूं काय बोललास, हें पहिल्यानें मला बरोबर समजलें नव्हतें.

आ०—तुला समजलें तेव्हां माझें तुला काय ऐकूं आलें.

ना०—मला क्षणभर पुस्तकाविषयीं विसर पडला आणि त्वां जें ह्मटलें

त्याकडे कान दिल्हा, तेव्हां, नाना तूं पुस्तकाला हात लावूंच नको, असें म्यां तुझें ऐकिलें.

आ०—अस्या कामाविषयीं तुला लाज व कंटाळा यावा, आणि जर फिरून असें करसील तर तुला शिक्षा करावी लागेल, असें माझें पुढचें बोलणें ऐकिलेंस कीं काय?

ना०—ऐकिलें, आई.

आ०—तें पुस्तक हिसकणें सोडायाला, आणि माझें ऐकावें हें योग्य आहे असें मनांत आणायाला, आणि जें त्वां केलें त्याचा कंटाळा करायाला, तुला किती वेळ लागला?

ना०—जोंपर्यंत मी ऐकायाला थांबलों, आणि मला काय केलें पाहिजे याचा विचार केला, आणि तें पुस्तक अणखी न हिसकावें हें बरें आहे असें मनांत आणिलें, तितकाच वेळ लागला.

आ०—तसेंच आपल्या सर्व पापाविषयीं थांबून, आपले दोष व संकटें व कर्त्तव्य काय आहे याचा विचार करावा, आणि खऱ्या पश्चात्तापाचा अनुभव घ्यावा, आणि आपल्या पापाची क्षमा होण्यासाठीं व देवासमोर पसंत पडण्यासाठीं प्रभु येशू खीस्तावर विश्वास ठेवावा, हें योग्य आहे. असें करायाला तुला किती वेळ लागेल?

ना०— माझ्या भावना योग्य असल्या तर हें मला लौकर होईल, असें वाटतें आई?

आ०— बरें; तर तूंच आपल्या प्रश्नाचें उत्तर केलेंस. पश्चात्ताप करणें काय आहे हें जो कोणी समजतो आणि ज्याच्या भावना देवाविषयीं योग्य आहेत, त्याला पश्चात्ताप फार लौकर करितां येईल. त्याला आपल्या मागील सर्व पापाविषयीं खरा खेद होतो, आणि तीं सोडावीं असें तो इच्छितो. पवित्र व न्यायी व चांगला जो देव त्याविरुद्ध तीं घडलीं असें समजून तो त्यांचा द्वेष करितो. क्षमा पावण्यासाठीं तो येशू खीस्ताकडून देवाची कृपा मागतो आणि त्या तारणाऱ्यावर भरवसा ठेवितो. आपल्याला शिकविण्यासाठीं व आपलें साह्य करण्यासाठीं व

शक्ति देण्यासाठीं पवित्र आत्मा मागतो. आणि यापुढें आपण देवाची प्रीति व सेवा करावी ह्मणून तो मनापासून दृढ निश्चय करितो. तर ह्या कल्पना व भावना होण्यासाठीं जितका वेळ कोणाला लागतो, तितकाच वेळ त्याच्या अंतःकरणांत खऱ्या पश्चात्तापाचा अनुभव होण्यास लागतो. खऱ्या पश्चात्तापाचा उलगडा त्याला झाला नसल्यास तो काय आहे हें समजून घ्यावयाला त्याला अधिक वेळ लागेल खरें. खऱ्या देवाविषयीं व तारणाऱ्याविषयीं ज्याला कांहींच ठाऊक नाहीं, असा एखादा लाहान मुलगा जर आमच्या कुटुंबांत आला तर त्याला देवासंबंधी पश्चात्ताप काय व येशू ख्रीस्तावर जो विश्वास तो काय आहे हें त्याला समजून देण्यासाठीं मला फार वेळ लागेल; हें तुला ठाऊक आहे. परंतु हें समजल्यावर जरी तुमच्यासारिखें त्याला समजत नाहीं, तरीं तुला आतांच अस्या सर्व पापाविषयीं पश्चात्ताप करून ख्रीस्तावर विश्वास ठेविला पाहिजे, असें त्याला सांगायाला योग्य आहे. आणि देवाविषयीं त्याच्या भावना योग्य असल्या तर हें करायाला त्याला उशीर लागणार नाहीं. माझ्या लेंकरानो, तुह्मी देवाविषयीं योग्य भावना कां धरीत नाहीं? आपल्या पापाविषयीं खरा खेद कां करीत नाहीं? आणि ख्रीस्तावर भरवसा ठेवून आणि पवित्र आत्म्याजवळ साह्य व शक्ति मागून, आह्मी आतांपासून देवाची प्रीति व सेवा करूं, असा निश्चय कां करीत नाहीं? तुह्मी आज आतांच कां करीत नाहीं?

म०— आई, हें न करावें असी माझ्या ठायीं कांहिं अडचण आहे.

चि०— आणि तसी माझ्या ठायींहि, आई.

ना०— आणि माझ्या ठायीं.

आ०—अरेरे माझ्या मुलानो, देव इतका मोठा व चांगला असतां, त्याची प्रीति व सेवा न करावी, आणि प्रभु येशू ख्रीस्त इतका दयाळू व ममताळू तारणारा असतां त्याजवर विश्वास न ठेवावा, असी जी तुमच्या ठायीं अडचण ती काय आहे? ती अडचण तुमच्याच स्वार्थी व दुष्ट भावना व इच्छा हीच आहे. दुसरे चांगले व सुखी व्हावे असी इच्छा

व यत्न न करितां तुह्मी आपलीच प्रीति करून तुह्मी आपलेंच हित पाहतां. जेव्हां दुसऱ्यांचें सुख तुमच्या सुखाला व समाधानाला अडवितें, तेव्हां त्यांचें सुख कमी व्हावें किंवा नाहींसें देखील व्हावें, असी तुह्मास इच्छा होती. देवापेक्षां दुसऱ्या गोष्टीची प्रीति तुह्मी अधिक करितां, तथापि तुह्माला ठाऊक आहे कीं, देवाची प्रीति आपल्या सर्व अंतःकरणानें केली पाहिजे आणि जसी आपणावर तसी दुसऱ्यावर प्रीति केली पाहिजे. देवाच्या आज्ञा तुह्माला आवडत नाहींत. त्याच्या सत्तेला पूर्ण मान्य व्हावें हें तुह्माला गोड वाटत नाहीं, ह्मणून त्यासमोर आपण नम्र व्हावें आणि पश्चात्ताप करून त्याकडे फिरावें आणि ख्रीस्ताकडून त्याची कृपा मागावी, याविषयीं तुह्मी मान्य नाहीं; तुमच्याच स्वार्थी व दुष्ट भावना व इच्छा यांखेरीज दुसरी अडचण कांहीं नाहीं. मी तुह्माला फार उघड सांगतें, माझ्या लेंकरानो. असें सांगणें मला योग्य आहे. तुमचा दोष व संकट तुमच्या लक्षांत यावें, असी माझी इच्छा आहे. ज्याविषयीं आपण आतां बोललों त्याचा विचार करा. देवाची प्रार्थना करायाला तुह्मी एकांतीं जाल, तेव्हां विचार करा.

संभाषण १७.

आ०— माझ्या लेंकरानो, आपल्या कालच्या संभाषणाविषयीं तुह्माला कसें वाटतें, बरें?

ना०— काय करावें हें मला सुचत नाहीं, आई.

चि०— मरणाच्या अगोदर मी पश्चात्ताप करून येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवीन, असी मला आशा आहे.

म०— या गोष्टीविषयीं एक प्रश्न करावा, असी माझी इच्छा आहे.

आ०— कर, माझ्या मुला. तुह्मी प्रश्न करावे आणि शक्तीप्रमाणें म्या त्यांचें उत्तर द्यावें, याविषयीं मी नेहमी खुशी आहें, हें तुह्माला ठाऊक आहे.

म०— आई, पश्चात्ताप करायाला पवित्र आत्म्याचें साह्य देवापासीं म्या मागावें हें योग्य आहे कीं काय?

आ०— पाहूं, बरें. पश्चात्ताप न करावा ह्मणून तुझ्या स्वार्थी व दुष्ट वासना व इच्छा आडव्या येतात, हें लक्षांत आलें तुला अस्या वासना व इच्छा आहेत ह्मणून तूं दोषी आहेस. त्यांमुळें तूं फार अपराधी आहेस. तूं मोठ्या संकटांत आहेस. तूं देवावर आपल्या सर्व अंतःकरणानें प्रीति करीत नाहींस, आणि जसी आपणावर तसी दुसऱ्यावर प्रीति करीत नाहींस, ह्मणून तूं नेम शास्त्राकडून न्यायानें दंडी ठरलास. अणखी त्या सर्व गोष्टींविषयीं तुला खेद झाला नाहीं आणि ख्रीस्ताकडून जो तारणोपाय तो त्वां अंगीकारला नाहीं, ह्मणून तुझा अपराध वाढला आहे. त्वां पापांत राहून अपश्चात्तापी असावें आणि सर्वकाळच्या दुःखांत जावें, ह्मणून जर देव तुला सोडितो तर त्यानें मजविषयीं अन्याय केला असें तुला ह्मणतां येणार नाहीं. कारण कीं जर तूं आपल्या पापाचा कंटाळा करून आणि ख्रीस्तावर विश्वास ठेवून त्याला शरण जासील, तर तो तुला आतांच अंगीकारायाला तयार आहे. त्या मार्गांत जावें असें तूं निवडून घेत नाहींस परंतु अमान्य आहेस. तर तुझ्या पापाला जो योग्य दंड तो तुला जर प्राप्त होईल तर त्याविषयीं आपल्याशिवाय दुसऱ्या कोणावर दोष ठेववत नाहीं.

तर काय करावें? तुला पश्चात्ताप करून ख्रीस्तावर विश्वास ठेविला पाहिजे, नाहीं तर तुला तारण मिळणार नाहीं. तो तुला स्वतां केला पाहिजे. तुला स्वतां पश्चात्ताप केला पाहिजे आणि स्वतां ख्रीस्तावर विश्वास ठेविला पाहिजे. हें तुलाच केलें पाहिजे. जर दुसऱ्या कोणीएकानें केलें तर तूं केलेंसें होणार नाहीं. अरेरे हें न करायाला तुझ्या स्वार्थी व दुष्ट वासना व इच्छा आडव्या येतात. या सर्व गोष्टीला तूं मान्य आहेस. आणि मी दुबळा भ्रष्ट पापी निरुपायी आहें, असें तुला वाटतें. तूं तसाच आहे आणि जर देव तुजवर दया करीत नाहीं तर तुला कांहींच आशा नाहीं. तुझें साह्य

करायाला तो बांधला नाहीं, तथापि तुझें साह्य कदाचित् तो करील. पश्चात्ताप करायाला व ख्रीस्तावर विश्वास ठेवायाला जो तुझी अमान्यता, ती पवित्र आत्म्याकडूनच नाहींसी होईल. तो कदाचित् तुला पवित्र आत्मा देईल. तुझ्यासारिखे भ्रष्ट दुबळे व पापी, अश्या दुसऱ्या बहुतांस त्याने तो दिल्हा आहे. त्याची दया व कृपा फार मोठी आहे. तुला आई आहे, आणि तिने तुझें कर्त्तव्य काय आहे हें तुला सांगितलें, हें त्याच्याच कृपेने घडलें. तुझा दोष व संकट यांविषयीं तुझ्या मनांत विचार उद्भवला आणि देवाची प्रार्थना करायाला तुला इच्छा झाली, हें त्याच्याच पवित्र आत्म्याकडून झालें.

होय, माझ्या मुला, देवाला शरण जा आणि त्याचा पवित्र आत्मा माग. तुझा दोष व संकट अधिक स्पष्ट तुला दिसून यावें, झणून प्रार्थना केल्याने कदाचित उपाय होईल. होय, देवाला शरण जा आणि त्याचा पवित्र आत्मा माग. पापाचा पश्चात्ताप करायाला व प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवायाला, देवाची प्रार्थना करण्याच्या प्रसंगापेक्षां दुसरा कोणता प्रसंग चांगला आहे? होय, देवाला शरण जा आणि त्याचा पवित्र आत्मा माग. शरण जातोस, त्याच्या पायां पडतोस, एकाग्रतेनें कृपा मागतोस, इतक्यांत कदाचित् तुला पवित्र आत्मा दिल्हा जाईल. आणि तुझ्या सर्व पापांविषयीं आणि देवाकडून जे उपकार ते न मानिले याविषयीं पश्चात्ताप करून, आणि येशू ख्रीस्त तो माझा एकच तारणारा व आश्रय आहे असें समजून त्याजवर विश्वास ठेवून, तूं कदाचित् देवाच्या सत्तेला मान्य होसील. परंतु मी आपल्या प्रार्थनेकडून देवाची कृपा पावण्यास योग्य झालों, असें कल्पूं नको. जर तो तुजवर दया कराल तर तो तुझे चांगले गुण पाहून करील असें नाहीं, परंतु ख्रीस्ताने जें केलें व सोसिलें त्यामुळेंच तो खुशीने तुजवर दया करील. त्वां दुसरें कांहीं जरी केलें, तरी आपल्या पापाचा कंटाळा करून येशू ख्रीस्तावर विश्वास ठेविल्यावांचून तुला तारण प्राप्त व्हावयाचें नाहीं, असें देवाने निक्षुण सांगितलें, हेंहि मनांत ठेव.

म०— या गोष्टीचा विचार करितांना अद्यापि मला एक अडचण दिसती, आई.

आ०— ती कोणती, माझ्या मुला?

म०— पश्चात्ताप करायाला आणि ख्रीस्तावर विश्वास ठेवायाला जी अमान्यता ती पवित्र आत्म्याकडूनच नाहींसी होईल. असें आह्माला सांगितलेंस. तर माझ्याकडून कांहीं तरी होईल कसें? पश्चात्ताप करायाला मला पवित्र आत्म्यानें ओढिलें पाहिजे. आपल्या आपण मला पश्चात्ताप करवणार नाहीं. देव पवित्र आत्मा देईल तोंपर्यंत मला वाट वाहिली पाहिजे, आणि त्याच्या खुशोस येईल तेव्हां तो देईल.

आ०— त्यांत अडचण नाहीं, असें मी ह्मणत नाहीं, माझ्या मुला; आणि माझ्यानें त्याचा उलगडा होईल असेंहि ह्मणत नाहीं. दुसऱ्या बहुत गोष्टींत अडचणी आहेत, परंतु विश्वास न ठेवावा आणि कार्य न करावें याला त्या आड येत नाहींत. देव धान्य पिकवितो खरें, परंतु मनुष्यानी पेरल्यावांचून व राखणूक केल्यावांचून तें पिकास येत नाहीं. देव वारा सोडून तारवाचें शीड उभारितो आणि तारूं समुद्रावरून चालवितो, तथापि तांडेल व खलासी यांस मोठे श्रम केले पाहिजेत, नाहीं तर तारूं ठिकाणावर कधीं पोहंचणार नाहीं. देव आह्मास रोज रोज जगवितो. आह्मी त्याच्यानें जगतों हालतों व आहों. परंतु जिवाचा संभाळ करायाला आह्मास पुष्कळ उपाय केले पाहिजेत, नाहीं तर आह्मी लौकर मरूं. पश्चात्ताप करायाला व ख्रीस्तावर विश्वास ठेवायाला तुझी जी अमान्यता ती पवित्र आत्म्याकडूनच नाहींसी होईल खरी, परंतु पश्चात्ताप आणि विश्वास हीं तुलाच केलीं पाहिजेत. पश्चात्ताप करणें व ख्रीस्तावर विश्वास ठेवणें हें तुझेंच कार्य. तथापि पवित्र आत्मा हें करायाला प्रेरितो हें कसें आहे, याचा उलगडा माझ्यानें करवत नाहीं. कसें तरी पवित्र आत्मा हें करायाला तुला मान्य करितो.

घटकाभर समज कीं, तूं बापाच्या आज्ञा मोडून बहकलास

आणि अडचणीच्या व संकटाच्या रस्त्यांत पडलास. तूं उंच कड्यावर उभा राहिलास आणि जर पुढें पाऊल टाकसील तर तूं भयंकर दऱ्यांत पडसील. निघायाला एकच मार्ग आहे, असी वरून दयाळू वाणी तुला ऐकूं येतो. परंतु तो मार्ग धरायाला तूं मान्य नाहींस. तो मार्ग अरूंद व अडचणीचा आहे व तो भयंकर दिसतो. तो तुला अगदी आवडत नाहीं. जो तुला हाक मारितो तो तुझा बाप आहे. निर्भय मार्गांत शिरायाला तो तुला बोध करितो. तुझें साह्य करायाला तो आपला हात लांब करितो. जर तूं माझा हात धरून गच्च मिठी मारीत नाहींस आणि माझ्या शक्तीवर टेंकत नाहींस तर तूं नाश पावसील, असें तो तुला सांगतो. तूं आपलें सर्व बळ खर्चून शक्तीप्रमाणें प्रयत्न करीत नाहींस तर तूं नाश पावसील, असें तो तुला सांगतो. निर्भय मार्ग धरायाला तो तुला मान्य करितो. तूं आपल्या राजीखुशीने तो धरितोस. तो यत्न करितो आणि तूंहि यत्न करितोस, आणि त्यावरून तुझा नाश चुकला. जर त्याला वाटलें असतें तर त्याने तुझ्या अपराधाचें योग्य फळ जो नाश तो पावायाला सोडून दिल्हें असतें. खुशी नसती तर तो तुला बोलला नसता आणि तुला तारायाला त्याने आपला हात लांबविला नसता, तर तूं नाश पावला असतास. त्याने तुजवर दया केली आणि तुला तारिलें, तथापि तूं स्वतां यत्न करायाला जर मान्य झाला नसतास आणि यत्न केला नसतास, तर तूं तारला गेला नसतास. तर आपल्या पापाचा पश्चात्ताप करायाला आणि ख्रीस्तावर विश्वास ठेवायाला जर पवित्र आत्म्याकडून तूं मान्य झालास तर तुझी गोष्ट त्यासारिखीच होईल, असें मी ह्मणत नाहीं. पवित्र आत्मा हें कोणत्या रीतीने करितो, याचा उलगडा होत नाहीं. इतकेंच आह्मांला ठाऊक आहे कीं पापाचा पश्चात्ताप करणें व ख्रीस्तावर विश्वास ठेवणें हें तुझेंच कार्य आहे. तथापि तुझा स्वतंत्रपणा न मोडतां हें कार्य तूं करसीलच करसील, असें तो करितो. ही गोष्ट असी आहे, ह्मणून उपकार मानावा, माझ्या

मुला. परंतु हें कसें होतें याचा उलगडा करायाला ज्या अड-
चणी त्यांविषयीं तूं काळजी करूं नको; आपल्या आकाशांतील बा-
पाला शरण जा. शरण जाण्याची तुला किंचित् ओढ आहे कीं
काय? ती पवित्र आत्म्याकडून झाली आहे. तो इतक्यांत तुझें
साह्य करितो. त्याच्या साह्याची तुला गरज आहे हें समज. देवा-
जवळ शक्ति माग. तूं आपलीहि शक्ति खर्चावी. तूं आपल्या आ-
काशांतील बापाला शरण जा. त्यासमोर जीव लावून प्रार्थना
कर. त्याच्याजवळ आपलीं पापें कबूल कर. पवित्र आत्मा माग.
पश्चात्ताप करायाला व ख्रीस्तावर विश्वास ठेवायाला आपण ओढलें
जावें ह्मणून माग. पश्चात्ताप कर आणि ह्या तारणाऱ्यावर वि-
श्वास ठेव, ह्मणजे तुला शांति व आनंद प्राप्त होईल. ह्या गोष्टी
मी तुह्मा सर्वांस सांगतें, माझ्या प्रिय लेंकरांनो. निजते वेळेस
यांचा विचार करा.

संभाषण १८.

याप्रमाणें मायलेंकरांचीं संभाषणें समाप्त झालीं आहेत. वाच-
णाऱ्याला व ऐकणाऱ्याला देवाच्या कृपेकरून त्यांचा उपयोग व्हावा,
असो ग्रंथ कर्त्यांची आशा आहे. ज्याने हीं वाचलीं, तो तरूण
असो किंवा ह्मातारा असो, त्याला जर देवासंबंधी पश्चात्ताप आणि
प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास होण्याविषयीं अद्यापि चिंता उद्भवली
नाहीं, तर हें मोठें आश्चर्य. जर असा कोणी माणूस आहे तर
त्याने विचार करावा ह्मणून ग्रंथ समाप्तीच्या अगोदर अणखी
कांहीं गोष्ट सांगावी, असी ग्रंथकर्त्यांची इच्छा आहे.

माझ्या मित्रा, पापाचें जें वर्णन केलें तें खरें आहे ह्मणून तुला
वाटतें कीं नाहीं? सर्वांहून श्रेष्ठ व ज्ञानी व उत्तम, आणि सर्व प्राणि-
मात्रांपासून प्रीति व सेवा पावायाला पूर्ण अधिकारी, असा जो देव
त्याविरूद्ध पाप आहे, ह्मणून तें फार ओंगळ व स्वतां दुष्ट आहे कीं
नाहीं. देवाची प्रीति व सेवा करावी, ती केल्याशिवाय तूं राहतोस कीं

काय? सर्व प्राणी जे देवाचें मोठें कुटुंब, ज्याचा धनी तोच आहे, त्याचा बंदोबस्त व कल्याण होण्यासाठीं देवाच्या ज्या सत्तेची व अधिकाराची मोठी गरज आहे, त्याविरुद्ध पाप आहे; तर तें मोठें वाईट आहे कीं नाहीं. प्राणिमात्राच्या वास्तवीक कल्याणाविषयीं तुला कांहींच काळजी नाहीं, हें दाखविल्यावांचून तुझ्याने पाप करवेल कीं काय? अस्या दुष्ट स्वार्थबुद्धीचा दोष वाढत वाढत जावा, ह्मणून तूं कबूल आहेस कीं काय? ज्या देवाने तुजवर इतके उपकार केले त्या देवाविषयीं तुझें अघोर अनुपकारिकपण पापाकडून दिसतें, ह्मणून पाप मोठें वाईट आहे कीं नाहीं? त्वां देवाच्या आज्ञा मोडिल्या आणि त्याचे उपकार मानिले नाहींत, तथापि त्याने तुला जगविलें, यांत त्याची केवढी सहनता आहे, याविषयीं विचार कर. तुझी क्षमा व तारण व्हावें, ह्मणून त्याने आपला एकुलता व फार प्रिय पुत्र वधस्तंभावर मरण पावण्यासाठीं पाठविला, यांत देवाची केवढी प्रीति आहे, याविषयीं विचार कर. तुजवर त्या तारणाऱ्याची केवढी दया व ममता आहे, याविषयीं विचार कर. अस्या दयाळू बापाविषयीं व अस्या ममताळू तारणाऱ्याविषयीं तूं हें ओंगळ अनुपकारिकपण अणखी दाखवीत जासील काय? देवाचें गौरव व सत्ता स्थिर राहावी, आणि इहलोकीं परलोकींहि आमचें वास्तवीक कल्याण व्हावें ह्मणून त्याने ज्या दोन मोठ्या आज्ञा दिल्या, त्यांस पाप आडवें येतें, ह्मणून तें पाप मोठें वाईट आहे कीं नाहीं. त्या आज्ञा पाळिल्या असतां त्याच्या दुसऱ्या सर्व आज्ञा पाळिल्या जातील. त्या फार सोप्या व उघड आहेत; तूं लेंकरूं असतांहि तुला त्या समजतां येतील. "प्रभु जो तुझा देव त्यावर तूं आपल्या संपूर्ण हृदयाने आणि आपल्या संपूर्ण जीवाने आणि आपल्या संपूर्ण शक्तीने आणि आपल्या संपूर्ण बुद्धीने प्रीति कर, आणि जसी आपणावर तसी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर." ह्या आज्ञा योग्य आहेत कीं नाहींत? त्या सर्वप्रकारें ठीक आहेत कीं नाहींत? कितीहि विचार करून त्यांत कांहीं दोष आहे कीं नाहीं, हें पाहा. यापेक्षां त्या चांगल्या व्हाव्या ह्मणून

त्यांत काय अंतर करावें, ह्मगून तुला वाटतें? त्या आज्ञांप्रमाणें प्रीति करणें व योग्य सत्तेला मानणें, हें इहलोकीं देखील आमची शांति व कल्याण यांसाठीं फार अवश्य आहे, हें तुला दिसतें कीं नाहीं? ह्या दोन आज्ञा जर सर्व माणसें पाळतील तर सर्व कुटुंबें व गांव व शहरें व देश फार सुखी व शांत होतील; आणि ही सर्व जगवस्ती आकाशलोकासारिखी होईल, ही गोष्ट तुला कबूल केली पाहिजे कीं नाहीं? या दोन आज्ञांचा भंग हेंच या जगांतील सर्व दुष्टाई, क्लेश व दुःख यांचें कारण आहे कीं नाहीं? यांचा भंग फार मोठें वाईट आहे कीं नाहीं आजपर्यंत त्या आज्ञा तूं नेहमी मोडीत आलास, त्यांत तुझा केवढा दोष आहे.

पाप मनाला भ्रष्ट करितें, आणि पाप करण्यानें मी नीच व तुच्छ आहें असा अनुभव होतो, ह्मणून पाप मोठें वाईट आहे कीं नाहीं? होय, माझ्या मित्रा, जर तुझें मन कांहीं साक्ष देवें, तर पाप स्वतां तुच्छ व नीच आहे, आणि त्यावरून पापी आपल्या दिसण्यांत तुच्छ होतो, आणि देव व तारणारा आणि सर्व पवित्र व निर्दोषी प्राणी यांस पापाचा कंटाळा व तिरस्कार आहे, असें तुझ्या मनांत वागेलच वागेल. खऱ्या ख्रिस्त्यांची गोष्ट लक्षांत आणिली, तर ते पाप सोडून देवाची प्रीति व सेवा करीत असतां, आणि दुसऱ्यांचें कल्याण पाहत असतां, सर्वांहून उत्तम मार्ग धरितात, हें तुझ्या अनुभवास येईलच येईल; होय, वेळोवेळ आलें असेल. त्यांचा मार्ग शांतीचा व योग्य असें केवळ नव्हे, परंतु खऱ्या ज्ञानाचा व बहुमानाचा आहे, असें तुझ्या अनुभवास आलें असेल. पाप तुला या सुमार्गांतून बहकवितें, आणि तूं देवाविरुद्ध पाप करीत असतां तें तुला कंटाळा व तिरस्कार आणितें, ह्मणून तें मोठें वाईट आहे कीं नाहीं. पापाचा पश्चात्ताप जर केला नाहीं, आणि देवाच्या कृपेनें त्याची क्षमा झाली नाहीं, तर तें जीवात्म्याला सर्वकाळपर्यंत दुःखित व क्लेशित करील, ह्मणून तें मोठें वाईट आहे कीं नाहीं?

माझ्या मित्रा, तूं आपल्या अविनाशी जीवात्म्याविषयीं विचार कर.

अगणित वर्षें व युगें, होय सर्वकाळपर्यंत तो वांचेल. ज्या गांवांत तूं राहतोस त्यांतील सर्व घरें रेतीनें भरलीं असतां त्यांतून एका घरांतील रेती संपेपर्यंत एक एक रजःकण मुंगीप्रमाणें घेऊन दोनशें कोस दूर नेऊन टाकसील, इतकें आयुष्य जर देवानें तुला दिल्हें तर एकाच घरांतील रेती नेण्याला किती दिवस लागतील? त्याच्या वर्षांची संख्या तुझ्यानें करवणार नाहीं. अणखी जर तूं जगलास तर त्याप्रमाणें सर्व घरांतील रेती न्यावयाला तुला किती वेळ लागेल? पृथ्वीएवढा मोठा बारीक रेतीचा ढीग असतां त्यांतील एकएक रजःकण त्याप्रमाणें नेला तर, होय शेंकडों, हजारों, लाखों, असे रेतीचे ढीग असले, आणि लक्षावधि वर्षांनी एक एक रजःकण नेला, तर सर्व नेण्याला किती वर्षें लागतील? या गोष्टीचा विचार करायाला मन कुंठित होतें. असो, इतकीं वर्षें जीवात्मा जगेल असें केवळ नव्हे, परंतु इतक्यांत जगण्याचा आरंभ मात्र झाला आहे, असें होईल. इतका काळ उत्तरोत्तर हजारों, लक्षावधि वेळ जगेल, आणि तसाच जगत जगत असतां कधींहि मरणार नाहीं. जीवात्मा सर्वकाळपर्यंत जगेल.

परलोकीं जीवात्मा सर्वकाळपर्यंत किती दुःख किंवा सुख भोगील, याची तुला गणतीहि करवणार नाहीं. इहलोकींच्या आयुष्यापेक्षां जसें परलोकीचें आयुष्य अधिक होईल, तसें इहलोकीचें जें तुझें सुख किंवा दुःख त्यापेक्षां परलोकीं अधिक होईल. तर जीवात्म्याचें मोल तुझ्यानें ठरवणार नाहीं. तुला जर या जगाचें सर्व सुख, द्रव्य व सन्मान मिळेल, परंतु तुझा जीवात्मा गमावला, ह्मणजे देव व तारणारा व सर्व पवित्र प्राणी यांपासून दूर ठेवून आपल्यासारिख्या पापी व दुःखित प्राण्यांबरोबर राहायाला पाठविला, तर तुला काय लाभ होईल? पाप याचा जर पश्चात्ताप झाला नाहीं, आणि ख्रीस्ताकडून देवाच्या कृपेनें त्याची क्षमा झाली नाहीं, तर जीवात्मा, तुझा जीवात्मा याचा त्यावरून इतका नाश होईल. शास्त्रामध्यें देवानें हेंच सांगितलें. त्याचीं वचनें सर्वकाळपर्यंत सत्य आहेत. तो आह्माला फसविणार नाहीं. त्यानें

आपला निश्चय प्रगट केला, आणि तो पालटणार नाहीं. "देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं त्यानें आपला एकुलता पुत्र यासाठीं दिल्हा कीं, त्याजवर जो कोणी विश्वास ठेवितो त्याचा नाश न व्हावा, परंतु त्याला सर्वकाळचें जीवन व्हावें." "जो पुत्रावर विश्वास ठेवितो त्याला सर्वकाळचें जीवन आहे, आणि जो पुत्राला मानीत नाहीं तो जीवन पाहणार नाहीं, परंतु देवाचा राग त्यावर राहील." देव निर्दोषी, पवित्र, न्यायी व चांगला असतां त्याचा राग किती भयंकर होईल. तो राग जीवात्म्यावर राहील, जोंपर्यंत जीवात्मा जगेल तोंपर्यंत राहील. हें किती भयंकर आहे, माझ्या मित्रा, त्वां पश्चात्ताप केल्यावांचून मरावें आणि हा राग तुजवर यावा, ह्मणून तूं धजतोस कीं काय? आयुष्याचा कांहीं भरवसा नाहीं, आणि देव तुला कोणत्या वेळेस बोलावील याचा नेम नाहीं, असें असतां पुढें पश्चात्ताप करण्यावांचून राहायाला धजतोस कीं काय?

पाप जीवात्म्याचा सर्वकाळपर्यंत असा नाश करितें, ह्मणून तें मोठें वाईट आहे कीं नाहीं? पापाकडून तूं आतां त्या नाशाच्या दारासीं आहेस; आणि जर तूं पापाचा पश्चात्ताप करीत नाहींस, आणि ख्रीस्तावर विश्वास ठेवीत नाहींस तर त्यांत तूं खचीत पडसील. असें असतां पाप तुला मोठें वाईट आहे कीं नाहीं? पापाचें दुष्टपण आतां तुझ्या दिसण्यांत येऊं लागलें कीं काय? अरेरे तुला अझून अंधक दिसतें जसें त्याचें वास्तविक भयंकर रूप देवाला दिसतें तसें जर तुला दिसेल, तर तुझा दोष व संकट यांविषयीं तुला मोठी दहशत लौकर होईल. देव जो पवित्र व न्यायी त्याच्या दिसण्यांत पाप, तुझें पाप किती वाईट हें लक्षांत आणावयास तूं यत्न कर, माझ्या मित्रा. या पुस्तकांत त्वां जें वाचिलेंस त्याचें मनन कर, एकाग्रतेनें व एकांतीं त्याचें मनन कर. धर्मशास्त्रहि वाच. त्यांत पापाचा वाईटपणा तुला दिसून येईल. देवाला पापाचा केवढा कंटाळा आहे हें त्यांत दिसेल. पापापासून आणि त्याच्या भयंकर फळापासून तुला तारायाला ख्रीस्तानें आपला जीव देऊन केवढी प्रीति केली, हें तुला दिसेल. पश्चा-

त्ताप करायाला व ख्रीस्तावर विश्वास ठेवायाला तुला ओढण्यासाठीं जे सर्व हेतु ते तुला त्यांत सांपडतील. होणार क्रोधापासून पळावें, ह्मणून सार्वकालिक क्लेशाच्या सर्व दहशतीकडून त्यांत तुला भय दाखविलें आहे. देवाची कृपा अंगीकारावी, आणि परलोकीची सार्वकालिक पवित्रता व सुख यांसाठीं सिद्ध व्हावें, ह्मणून आकाशाच्या सर्व संतोषानी तुला त्यांत आमंत्रण केलें आहे.

ह्या फार भारी गोष्टीकडे एकाग्रतेनें चित्त द्यावयाला आज, या घटकेस, आतांच आरंभ करसील कीं नाहीं? धर्मशास्त्र वाचायाला, आणि आपल्या जीवात्म्याच्या कल्याणासंबंधी ज्या गोष्टी त्यांचें मनन करायाला तूं एकांतीं जासील कीं नाहीं? हें करायाला तुला काय अडचण? देवाला आतांच शरण जाऊन आपलें पाप मनापासून कबूल करावें, आणि आपल्या दोषामुळें फार पश्चात्ताप करून ख्रीस्ताकडून देवाची कृपा मागावी, आणि देवाची प्रीति व सेवा करायाला आणि त्याच्या चाकरींत तत्पर राहायाला पवित्र आत्म्याकडून त्वां ओढलें जावें ह्मणून त्याची प्रेरणा मागावी, या गोष्टीविषयीं तुला काय अडचण आहे? हें करायाला तुला कांहीं तरी इच्छा आहे कीं काय? तिला मान्य हो. कृपेचा आत्मा तुला ख्रीस्ताकडे ओढीत आहे. त्या आत्म्याला तूं आडविसील कीं काय? तो तुजपासून जावा आणि पहिल्यापेक्षां तुझें मन अधिक अंधक व तुझें अंतःकरण अधिक कठीण व्हावें, ह्मणून त्या आत्म्याला खेद देसील काय? देवाचें लेंकरूं होण्याची आणि ख्रीस्ताकडील वतन पावण्याची सर्व आशा सोडसील कीं काय? तूं आपल्या पापाच्या मार्गाकडे परतून आपल्या जिवात्म्याचें सर्वकाळचें तारण संकटांत घालसील कीं काय?

समाप्त.

मुंबईमध्यें अमेरिकान मिशन छापखान्यांत छापिलें.

सन १८४८.